CMYK





सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, १२ नोव्हेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक ३६२ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघकार्य हे अनेक तऱ्हेचे विरोध, अडथळे आणि खाचखळगे यांनी ग्रस्त आहे. या सर्व अडथळ्यांवर मात करीत परिस्थिती अनुकूल करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. म्हणूनच धैर्य राखा, संतोष ठेवा आणि कार्य समर्पित व्हा.

**- लक्ष्मणराव भिडे**

रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# दिल्ली बॉम्बस्फोटात पाच डॉक्टरांचा हात

अनंतनाग येथील डॉ. आदील अहमद, पुलवामा येथील मुज्जमिल शकील, लखनौ येथील डॉ. शाहीन शाहीद, हैदराबादमधील डॉ. मोहिद्दीन सैय्यद आणि कारममध्ये स्फोट घडविणारा मुख्य आरोपी उमर मोहम्मद या पाच डॉक्टरांचा याप्रकरणात समावेश असल्याचे आणि ते दहशतवादी संघटनेच्या संपर्कात होते, अशी प्राथमिक तपासात उघड झाली.

**प्राथमिक तपासातील माहिती**

## 'व्हाईट कॉलर्ड' दहशतवाद्यांचा कट

◆ **नवी दिल्ली, ११ नोव्हेंबर**

**राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळील मेट्रो स्टेशनच्या बाजूला झालेल्या बॉम्बस्फोटात दोन दिवसांपूर्वी उत्तरप्रदेशच्या फरिदाबाद येथून पकडलेल्या दहशतवादी मॉड्युलचा संबंध समोर आला. या मॉड्युलमधील पाचही दहशतवादी डॉक्टर आहेत.**



कारमधून जाताना डॉ. उमरचे सीसीटीव्हीत आलेले छायाचित्र

### तीन तास काय करीत होता?

बदरपूर मार्गे दिल्लीत आल्यानंतर, डॉ. उमरने कार लाल किल्ल्याच्या पार्किंगमध्ये तीन तास उभी ठेवली आणि तो तीन तासांत कोणाला भेटत होता? याचा पोलिस तपास करीत आहे. ज्या कारमध्ये स्फोट झाला ती कार दुपारी ३:१९ वाजता पार्किंगमध्ये पोहोचली आणि ६.२२ वाजता कार मेट्रो स्टेशनजवळ आणण्यात आली. या तीन तासांत उमर कोणाशी बोलला का? तो कोणाकडून सूचना घेत होता का? की तो कोणाच्या सूचनांची वाट पाहत होता? याची माहिती पोलिस घेत आहे.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, डॉ. परवेझ अन्सारी आणि डॉ. आदिल सहारनपूरचे रहिवासी आहेत. त्यामुळे परवेझ अन्सारी आणि यापूर्वी अटक केलेला डॉ. आदिल यांच्यात काही संबंध होते का याचा तपास सुरू आहे. डॉ. परवेझ अन्सारीच्या घरातून जप्त केलेली कार सहारनपूर आरटीओमध्ये नोंदणीकृत आहे. कारवर इंटिग्रल विद्यापीठाचा लोगो होता. स्फोटात अमोनियम नायट्रेट, इंधन तेल आणि डेटोनेटरचा वापर करण्यात आल्याची शक्यता आहे. कारमध्ये स्फोट घडविणारा डॉक्टर उमर मोहम्मद हा जैश-ए-मोहम्मद दहशतवादी मॉड्युलशी संबंधित असल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे. (वृत्तसंस्था)

### एनआयएकडे सोपविला तपास

बॉम्बस्फोटाचा तपास राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएकडे सोपविण्यात आल्याची माहिती मंगळवारी केंद्रीय गृहमंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनातून दिली. याप्रकरणाशी संबंधित असलेली माहिती जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश, दिल्ली आणि हरयाणा पोलिस एनआयएकडे सुपूर्द करणार आहे. याशिवाय एनएसजीदेखील याप्रकरणाची माहिती एनआयला देणार आहे. या घटनेत अनेक राज्यातून दहशतवादी मॉड्युल पकडण्यात आल्याने तपासाची व्याप्ती वाढली, त्यामुळे हा तपास एनआयकडे सोपविल्याचे निवेदनात म्हटले आहे.

### कार मालकाला पुलवामातून अटक

कार मालक तारिक हा जम्मू-काश्मीरच्या पुलवामा येथील रहिवासी असून, त्याला अटक करण्यात आली. तारिकने स्फोटात वापरलेली ह्युंदेई आय-२० कार उमर मोहम्मदला पुरवली होती. दहशतवादी मॉड्युलचा भाग असलेल्या त्याच्या सहकारी डॉक्टरांना अटक केल्यानंतर, उमर मोहम्मदने आपणही पकडले जाऊ शकतो या भीतीने दहशतवादी हल्ला केल्याचा संशय असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिस डॉ. उमरचा शोध घेत आहेत. दरम्यान, दिल्ली पोलिसांनी मंगळवारी सकाळी पहाडगंज येथील एका हॉटेलमधून चार जणांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे.

# हल्ल्यातील सूत्रधारांना सोडणार नाही : पंतप्रधान

## कट रचणाऱ्यांना किंमत चुकवावी लागेल

◆ **थिम्फू, ११ नोव्हेंबर**

राजधानी दिल्लीतील स्फोटात ज्या कुटुंबीयांनी आपल्या प्रियजनांना गमावले, त्यांच्याप्रती देशभरात संवेदना आणि हल्लेखोरांविरोधात संतापाची लाट आहे. या बॉम्बस्फोटात सहभागी असलेले आणि कट रचणारे सूत्रधार कोणालीही सोडले जाणार नाही, निष्पाप नागरिकांचे जीव घेणाऱ्यांना किमत चुकवावी लागेल असा इशारा मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला.



सोमवारी सायंकाळी राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळील मेट्रो स्टेशनसमोर कारमध्ये झालेल्या संपूर्ण देश हादरला. या घटनेत आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला, तर २० जण जखमी आहे. तपास यंत्रणा स्फोटात सहभागी असलेल्यांचा शोध घेण्यासाठी विविध राज्यांत छापेमारी करीत आहे. अशातच भुतानच्या दौऱ्यावर असलेल्या मोदी यांनी एका कार्यक्रमात दिल्लीतील स्फोटावर बोलताना म्हटले की, घटनेचा तपास करणाऱ्या सर्व तपास यंत्रणांशी आणि त्यात सहभागी असलेल्या सर्व प्रमुख लोकांशी मी सोमवारी रात्रभर संपर्कात होतो. तपास अधिकाऱ्यांना हल्लोखोरांवर कारवाई करण्याचा निर्देश दिला. मी आज जड अंतःकरणाने येथे आलो. दिल्लीत घडलेल्या भयानक घटनेने सर्वांना खूप दुःख झाले आहे. पीडित कुटुंबासोबत संपूर्ण देश त्यांच्यासोबत आहे. तपास संस्था या घटनेची जलद आणि सखोल चौकशी करीत आहेत आणि लवकरच अहवाल सार्वजनिक केला जाईल. मी देशवासीयांना खात्री देऊ इच्छितो की, देशातील प्रमुख संस्था घटनेची गांभीर्याने चौकशी करीत आहेत. तपास अधिकारी या कटाच्या तळाशी जातील आणि कटात सहभागी असलेल्या कोणालाही सोडले जाणार नाही. स्फोटामागे असलेल्या सूत्रधारांना किंमत चुकवावी लागेल आणि त्यांना कठोर शिक्षा केली जाईल. (वृत्तसंस्था)

# हल्लेखोरांना शोधून काढा, कुणालाही सोडू नका : शाह

◆ **नवी दिल्ली, ११ नोव्हेंबर**

राजधानी दिल्लीतील स्फोटासाठी जबाबदार असलेल्या एकएकाला शोधून काढा. कुणालाही सोडू नका. देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात असो, त्यांना शोधून काढा आणि कठोर शिक्षा करा, असा निर्देश मंगळवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उच्चस्तरीय बैठकीत अधिकाऱ्यांना दिला.



दिल्ली बॉम्बस्फोटाच्या तपासाचा आढावा आणि देशाच्या इतर भागांमधील सुरक्षा परिस्थितीची माहिती घेण्यासाठी शाह यांनी मंगळवारी दुपारी उच्चस्तरीय बैठक घेतली. त्यात केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन, गुप्तचर विभागाचे संचालक तपन डेका, दिल्लीचे पोलिस आयुक्त सतीश गोलछा आणि राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएचे महासंचालक सदानंद दाते उपस्थित होते, तर जम्म-काश्मीरचे पोलिस महासंचालक नलिन प्रभात आभासी पद्धतीने बैठकीला उपस्थित होते. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### सलग दुसऱ्या दिवशी बाजारात तेजी

**मुंबई :** भारतीय शेअर बाजार सकाळच्या सत्रातील घसरणीची भरपाई करीत हिरव्या रंगात स्थिरावला. सलग दुसऱ्या दिवशी बाजारात तेजी दिसून आली. निर्देशांकात ३३६ अंकांची वाढ झाली आणि तो ८३,८७१ वर बंद झाला. निफ्टीत ५७ अंकांची वाढ झाली. तो २५,६९५ वर बंद झाला. दुसऱ्या तिमाहींचे निकाल आणि इतर आर्थिक घडामोडींमुळे गुंतवणूकदारांनी बाजारात सकारात्मक प्रतिसाद दिला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका-भारत व्यापार कराराबाबत सकारात्मक विधान केल्याने गुंतवणुकदारांनी शेअर्स खरेदीत रस दाखवला.



### शिवसेना पक्ष, चिन्हावर आज निर्णायक सुनावणी

**नवी दिल्ली :** शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण या प्रतिकावरून सुरू असलेला राजकीय आणि कायदेशीर वाद आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. सर्वोच्च न्यायालय बुधवारी या प्रकरणावर अंतिम सुनावणी घेणार असून, संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या ऐतिहासिक खटल्याकडे लागले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेना नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह वापरण्याची परवानगी केंद्रीय निवडणूक आयोगाने दिली होती. मात्र, या निर्णयाला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. आता सर्वोच्च न्यायालय या याचिकेवर अंतिम निर्णय देणार असल्याने राज्याच्या राजकारणात मोठे बदल घडू शकतात. न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमल्या बागची यांच्या न्यायासनासमोर बुधवारी या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. न्यायालयात उद्धव ठाकरे गटाने दाखल केलेली मूळ याचिका आणि त्यासोबत सादर केलेले अंतरिम अर्ज यावर सुनावणी होईल. १२ नोव्हेंबरच्या कामकाज यादीप्रमाणे, या खटल्याला आयटम नंबर १९ वर स्थान देण्यात आले आहे. पक्षचिन्ह आणि अपात्रता या दोन्ही मुद्यांवरील याचिका एकत्र ऐकली जाण्याची शक्यता आहे.

# दहशतवाद्यांचे लक्ष्य होते संघाचे लखनौतील कार्यालय

## गुजरातमध्ये अटक केलेल्या दहशतवाद्यांची कबुली

◆ **अहमदाबाद, ११ नोव्हेंबर**

गुजरात एटीएसने अटक केलेल्या तीन दहशतवाद्यांच्या चौकशीत महत्त्वाचे खुलासे झाले आहेत. एटीएसचे अधीक्षक शंकर चौधरी यांनी सांगितले की, दहशतवाद्यांचे लक्ष्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) लखनौतील कार्यालय होते.




याशिवाय, दहशतवाद्यांनी अहमदाबादमधील नरोडा परिसर आणि दिल्लीतील आझाद मैदानाच्या आसपासच्या परिसराची रेकी केली आणि त्याच ठिकाणचे फोटो आणि व्हिडीओ काढले.

७ नोव्हेंबर रोजी सकाळी, एटीएसचे शंकर चौधरी आणि के. के. पटेल यांना माहिती मिळाली की हैदराबादहून एक दहशतवादी शस्त्रे घेण्यासाठी अहमदाबादला आला आहे. त्यानंतर, पथकाने हैदराबादचा दहशतवादी डॉ. अहमद मोहिउद्दीन सय्यद याला अदलाज टोल प्लाझा येथून अटक केली.

त्याच्या गाडीतून विदेशी बनावटीची तीन पिस्तुले आणि ३० काडतुसेही जप्त करण्यात आली आहेत. अहमदला शस्त्रे पोहोचवण्यासाठी आलेल्या उत्तरप्रदेशातील सुहेल आणि आझाद सुलेमान या दोन दहशतवाद्यांनाही गुजरातमधील पालनपूर येथे अटक करण्यात आली आहे. एटीएस सध्या तिघांचीही चौकशी करीत आहे. चौकशीत असे आढळले की, दहशतवादी डॉ. मोहिउद्दीन अडीच महिन्यांपूर्वी अहमदाबादलाही आला होता आणि पैशांचे पॅकेट घेऊन परतला. त्याला पैसे देणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू आहे. एटीएसच्या तपासात असेही समोर आले आहे की, मोहिउद्दीनसाठी शस्त्रे आणणारे उत्तरप्रदेशातील सुहेल आणि आझाद सुलेमानला राजस्थानमधील हनुमानगड येथून गुजरातमधील कलोल येथे शस्त्रे आणण्याचा आदेश देण्यात आला होता. हनुमानगड हा पाकिस्तानच्या सीमेला लागून आहे. त्यामुळे सीमेपलीकडून ड्रोनद्वारे शस्त्रे त्यांच्याकडे पाठवण्यात आल्याचा संशय आहे. (वृत्तसंस्था)

# बिहारमध्ये रालोआचेच पारडे जड

## आघाडी सत्तेत येण्याबाबत साशंकता



निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यात मधुबनी विधानसभा मतदारसंघात उसळलेली मतदारांची गर्दी

**मॅट्रिझ-आयएएनएस**

बिहार विधानसभेसाठी मॅट्रिझ-आयएएनएसच्या सर्वेक्षणानुसार, रालोआ पुन्हा एकदा जोरदार मुसंडी मारताना दिसत आहे. नितीशकुमार यांच्या नेतृत्वातील रालोआला १४७ ते १६७ जागा मिळण्याचा स्पष्ट अंदाज आहे. याउलट, तेजस्वी यादव यांच्या महाआघाडीला केवळ ७० ते ९० जागांवर समाधान मानावे लागू शकते. म्हणजेच या अंदाजानुसार, रालोआला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता आहे. मोठ्या आशेने निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या प्रशांत किशोर यांना पाच जागा मिळतील, असा अंदाज आहे.

**पीपल्स पल्स**

बिहार निवडणुकीचा दुसरा टप्पा आटोपल्यानंतर पीपल्स पल्स या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातही रालोआच बाजी मारताना दिसत आहे. त्यांच्या अंदाजानुसार रालोआला १३३ ते १५९ जागा मिळू शकतात. तेजस्वी आणि टीमला ७५ ते १०१ जागा मिळण्याचा अंदाज त्यांनी वर्तविला आहे. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाला ० ते ५ जागांचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

**पी-मार्क**

या सर्वेक्षणात रालोआला १४२ ते १६२ जागा मिळण्याचा अंदाज आहे. त्या पाठोपाठ काँग्रेस, राजद आघाडीला ८० ते ९८ जागा मिळतील, असे पी-मार्कने म्हटले आहे. त्यांच्या मते, प्रशांत किशोर यांना १ ते ४ जागांवर समाधान मानावे लागू शकते.

भास्करच्या सर्वेक्षणात रालोआला स्पष्ट बहुमत मिळणार असल्याचे संकेत आहेत. तेजस्वीच्या आघाडीला ७३ ते ९१ जागा मिळू शकतात. या सर्वेक्षणाने प्रशांत किशोर यांना एकही जागा मिळण्याची शक्यता नाही, असे स्पष्टपणे म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

तुमच्या जुन्या बँक खात्यांमध्ये पैसे विसरला आहात का?



ते पुन्हा मिळवण्यासाठी आरबीआय तुम्हाला मदत करेल.

बँकेतील तुमच्या निष्क्रिय खात्यातील (2 वर्षांपेक्षा जास्त आणि 10 वर्षांपेक्षा कमी निष्क्रिय असलेले खाते) पैसे / दावा न केलेल्या ठेवीतील (10 वर्षांपेक्षा अधिक काळ) पैसे आरबीआयच्या डीईए निधीमध्ये हस्तांतरित केले जातात. तुम्ही किंवा तुमचा कायदेशीर वारस त्यावर कधीही दावा करू शकतो.

तुमच्या पैशांवर दावा करण्याच्या 3 सोप्या स्टेप्स

1. तुमच्या बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्या, ती तुमची नेहमीची शाखा नसली तरीही चालेल.
2. केवायसी कागदपत्रांसह (आधार, पासपोर्ट, मतदाता ओळखपत्र, किंवा ड्रायविंग लायसन्स) फॉर्म सादर करा
3. पडताळणी केल्यानंतर, जर असतील तर पैसे व्याजासह परत मिळवा

तुम्ही दावा न केलेली रक्कम शोधण्यासाठी

तुमच्या बँकेची वेबसाइट शोधा किंवा आरबीआयचे UDGAM पोर्टल (https://udgam.rbi.org.in) पहा, ज्यात सध्या 30 बँका आहेत.

ऑक्टोबर ते डिसेंबर 2025 दरम्यान देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या दावा न केलेल्या संपत्तीच्या खास शिबिरांमध्ये भेट द्या




अधिक माहितीसाठी भेट द्या: https://rbikehtahai.rbi.org.in
अभिप्राय देण्यासाठी इथे लिहा: rbikehtahai@rbi.org.in
क्यूआर कोड स्कॅन करा
अधिकृत व्हॉट्सअ‍ॅप नंबर 99990 41935

जनहितार्थ जारी
भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे...

### वाराणसी येथील वेदमूर्ती गणेश्वरशास्त्री द्रविड यांना दासगणू महाराज पुरस्कार जाहीर

**पंढरपूर, दि. ११ नोव्हेंबर-**

पुणे येथील राधादामोदर प्रतिष्ठान आणि संतविद्या प्रबोधिनी यांच्याकडून दरवर्षी देण्यात येणारा श्री दासगणू महाराज पुरस्कार या वर्षी वाराणसी येथील वेदमूर्ती गणेश्वरशास्त्री द्रविड यांना जाहीर झाला असल्याची माहिती पुणे येथील राधादामोदर प्रतिष्ठान आणि संतविद्या प्रबोधिनीच्या पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आली. या पुरस्कार संदर्भातील सविस्तर माहिती अशी की, संतकवी श्री दासगणू महाराज यांच्या पावन स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा स्वामी वरदानंद भारती यांच्या प्रेरणेने सुरु झालेला संस्कृती संवर्धनासाठीचा श्री दासगणू महाराज पुरस्कार हा प्रतिवर्षी देण्यात येत असतो. या वर्षीच्या श्री दासगणू महाराज पुरस्कारासाठी वाराणसी येथील गणेश्वरशास्त्री द्रविड यांची निवड करण्यात आलेली आहे. रोख सव्वा लाख रुपये, शाल, श्रीफळ आणि स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. या बरोबरच इयत्ता दहावी किंवा एससीसी बोर्डाच्या परीक्षेत संस्कृत विषयामध्ये लातूर आणि पुणे विभागातून स्वतंत्रपणे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दरवर्षी संस्कृत भाषा संवर्धन पुरस्काराने सन्मानीत केले जाते. रोख दहा हजार रुपये आणि स्मृतीचिन्ह असे या देखील पुरस्काराचे स्वरुप आहे. यावर्षी म्हणजे सन २०२५ मध्ये लातूर विभागातून समृध्दी जाधव तर पुणे विभागातून सन २०२३ मधील प्रथम क्रमांक प्राप्त केलेली गौरवी ठुबे (पारनेर), सन २०२४ मधील स्वप्नाली महाजन (पंढरपूर) आणि सन २०२५ मध्ये सांगोला येथील तनुजा चोपडे यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. या बरोबरच अनंत-प्रज्ञागौरवाची मानकरी ठरलेल्या पंढरपूर येथील तुलसी कबाडे हिला देखील यावेळी पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. येथील गोविंदपूरा भागातील खिस्ते गल्ली मधील दामोदराश्रम येथे येत्या सोमवारी (ता.१७ नोव्हेंबर) दुपारी १ ते ४ या वेळात एका भव्य कार्यक्रमात हे सर्व पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.



### मंगळवेढा नगरपालिका निवडणूक; शिवसेना व मनसेची बैठक

**मंगळवेढा, दि. ११ नोव्हेंबर-**

मंगळवेढा नगरपालिकेची निवडणुकीच्या संदर्भात शिवसेना व मनसे पदाधिकाऱ्यांची बैठक दिलीप धोत्रे यांच्या आदेशाने मनसे जिल्हा प्रमुख प्रशांत गिड्डे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी मनसेचे प्रमुख पदाधिकारी व शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बैठकीमध्ये नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी पक्षाच्या चिन्हावर उमेदवार उभे करण्याचे सांगण्यात आले. त्यामध्ये नगराध्यक्ष पदासाठी मनसेतर्फे सुरेखा गोवे, शिवसेना (उबाठा) तर्फे क्रांतीताई दत्तू , नगरसेवक पदासाठी प्रभाग ७ मधून अविनाश पवार, प्रभाग ८ मधून शरयू हजारे, प्रभाग ६ मधून निलेश गोवे, शिवसेनेतर्फे प्रभाग ९ मधून अरविंद कोळी यांना उमेदवारी देण्याचे ठरले आहे. यावेळी उपस्थित मनसे जिल्हा समन्वयक नारायण गोवे, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत पवार, तालुकाध्यक्ष धनाजी गडदे, शहराध्यक्ष राजवीर हजारे, महिला जिल्हाध्यक्ष भारती चौगुले, तालुका उपाध्यक्ष रवी कांबळे, तालुका उपाध्यक्ष बालाजी भोजने, मनसे विद्यार्थी सेना तालुकाध्यक्ष रवी कोरे, वाहतूक सेना शहराध्यक्ष कृष्णा ओमने, शिवसेनेतर्फे तालुका प्रमुख तुकाराम भोजने, शहर प्रमुख बापू खराडे, उपशहर प्रमुख विशाल इंगळे, रमेश ढगे, सुनील ओमने, दीपक देवकर, रवी नाईकवाडे, अरबाज इनामदार, निर्मला भगरे, प्रवीण जावळे, रमेश मुढे उपस्थित होते.

### गरम पाण्याच्या पातेल्यात पडून बालक जखमी

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

गरम पाण्याच्या पातेल्यात पडून पाच वर्षाचा बालक भाजून जखमी झाला. हा प्रकार बापूजी नगरात मंगळवारी सकाळी ७.३० च्या सुमारास घडला. समर्थ हरीकृष्ण म्हेत्रे (वय ५) असे गरम पाण्यात भाजलेल्या बालकाचे नाव आहे. समर्थच्या घरातील लोकांनी मंगळवारी सकाळी अंघोळीसाठी पाणी गरम केले होते. ते गरम पाण्याचे पातेले घरात ठेवले होते. त्या पातेल्यात समर्थ अचानक तोल जाऊन पडला. यात त्याच्या उजव्या आणि डाव्या गालास तसेच उजव्या हाताला भाजल्याने शेजारी शंकर याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पूर्ववैमनस्यातून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून तरुणाला धारदार वस्तूने मारून जखमी केले. ही मारहाण जोडबसण्णा चौकातील एसएस मोबाईल दुकानाच्या पाठीमागील बाजूला सोमवारी झाली. कैफ महिबूब जमखंडी (वय २४ , रा. जोडबसण्णा चौक, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. कैफ आणि तौसिफ व सलमान यांच्यात यापूर्वी तक्रार झाली होती. तेव्हापासून तौसिफ आणि सलमान हे त्याच्यावर चिडून होते. सोमवारी दहाच्या सुमारास कैफ हा एसएस मोबाईलच्या पाठीमागील बाजूस असताना, सलमान, तौसिफ व इतर पाच जणांनी लाकडाने तसेच धारदार वस्तूने मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री १०.३० वाजता मित्र शाहिद याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### देशी दारुत खोबरेल तेल मिसळून केले प्राशन

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

घरात झालेल्या भांडणाचा राग मनात धरून तरुणाने देशी दारुत खोबरेल तेल मिसळून प्राशन केले. हा प्रकार सोमवारी सायंकाळी सहाच्या सुमारास जवाहर नगर येथील मोकळ्या मैदानात घडला. अंबादास रमेश खंडे (वय ३२ , रा. जुना विडी घरकुल) असे तरुणाचे नाव आहे. अंबादास हा घरगुती कारणातून झालेल्या भांडणानंतर मानसिक तणावाखाली होता. सायंकाळी सहाच्या सुमारास तो जवाहर नगर परिसरातील मोकळ्या मैदानात होता. तेथे त्याने देशी दारुत खोबरेल तेल मिसळून प्राशन केले. यात त्रास होऊ लागल्याने रात्री ९.१५ वाजता भाऊ नागेश याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### किटकनाशक प्राशन; आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

अज्ञात कारणातून किटकनाशक प्राशन करून वृध्दाने आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार अक्कलकोट येथे मंगळवारी सकाळी पाचच्या सुमारास घडली. फ्रकोदीन बाशा शेख (वय ५५, रा. अक्कलकोट) असे वृध्दाचे नाव आहे. त्यांनी अज्ञात कारणातून किटकनाशक प्राशन केले. यात त्यांना त्रास होऊ लागल्याने अक्कलकोट येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून दुपारी १२.१० वाजता यासिन याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# मतभेद, मनभेद अन् तिकीट वाटपात महायुती किंवा महाआघाडी टिकेल का?

**तभा वृत्तसेवा | अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांची चाहूल लागताच सोलापूरच्या राजकीय पटलावर मोठी उलथापालथ सुरू झाली आहे. स्वबळाची भाषा, बदलणारी समीकरणे, इच्छुकांची धडपड आणि वाढता राजकीय तणाव यामुळे शहर व जिल्ह्यात चुरशीच्या राजकीय लढती होण्याची शक्यता बळावली आहे. यातच बड्या नेत्यांचे सततचे पक्षबदल याचा फटका महायुती आणि महाआघाडीला बसणार आहे. इतकेच कायतर अंतर्गत मतभेद, मनभेद अन् उमेदवारीच्या तिकीट वाटपात महायुती किंवा महाआघाडी टिकून राहील का? याबाबत शहर-जिल्ह्यात राजकीय चर्चा सुरू आहे.

नगरपरिषदा आणि नगरपंचायतीपाठोपाठ महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू होताच सोलापूर जिल्ह्यात मोठ्या राजकीय घडामोडींना वेग येणार आहे. नगरपालिका उमेदवारीसाठी अर्ज भरण्यास सोमवारपासून प्रारंभही झाला आहे. अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे. यामुळे पक्षनिष्ठ आणि इतर पक्षातून आलेल्या पुढाऱ्यांतून उमेदवारी कोणाला द्यायची? याचा संभ्रम पक्षश्रेष्ठींनाही नक्कीच पडत आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये एकत्र






लढणारी महायुती आणि महाविकास आघाडीची नेतेमंडळी आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत स्वबळावर लढण्याच्या भूमिकेकडे झुकताना दिसत आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षांची राजकीय मैत्रीचे 'कुस्ती'मध्ये रूपांतर होत असून, शहर व जिल्ह्यात नवी राजकीय समीकरणे घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सोलापूर महापालिकेत आणि जिल्हा परिषदेत आपला प्रभाव वाढवण्यासाठी प्रत्येक राजकीय पक्ष इच्छुकांना उमेदवारी मिळावी, या दृष्टीने आक्रमकपणे रणनिती आखत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या दबावाखाली अनेक पक्षश्रेष्ठी महायुती व महाआघाडीचा विचार नाकारून स्वबळाचा नारा देताना दिसत आहेत. काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे), तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या पक्षांकडून स्वतंत्र लढतीचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. लोकसभा आणि विधानसभेवेळी हातात हात घालून एकत्र लढलेले महायुतीचे नेते, आता महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत एकमेकांविरोधात लढत देणार हे स्पष्ट दिसत आहे. भाजप नेत्यांनीही स्वबळावर लढण्याचा सूर लावला असून, त्यामुळे शिंदे शिवसेना आणि अजित पवार गटावर दबाव वाढला आहे. सोलापूर महानगरपालिकेत महायुतीत आतापर्यंत 'मैत्रीभाव' दिसत होता.

मात्र महापालिका निवडणुकीच्या तोंडावर राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत आहेत. शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसेमध्ये सध्या सौहार्द वाढल्याचे चित्र असून, भविष्यात या दोन पक्षांत युती होण्याची चर्चा रंगल्याचे राजकीय जाणकार सांगतात. त्याचवेळी शिवसेनेला काँग्रेसबरोबर आघाडी नको असल्याचे संकेत मिळत आहेत. माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्या विधानानंतर या चर्चांना आणखी वेग आला आहे. कार्यकर्त्यांना अधिक संधी मिळावी, या हेतूने स्वतंत्र लढण्याची शक्यता प्रबळ बनल्याने महाविकास आघाडीही आता तडकाफडकी विखुरली तर आश्चर्य वाटणार नाही. २०१४ पूर्वी सोलापूर शहरात भाजपची ताकद मर्यादित होती; मात्र केंद्रात नरेंद्र मोदी सरकार आल्यानंतर शहरात भाजपची क्रेझ वाढली. २०१७ च्या महापालिकेत भाजपने सत्ता मिळवली. त्यानंतर आता २०२४ मध्ये शहरात भाजपचे तीन आमदार निवडून आल्याने भाजपचा आत्मविश्वास वाढल्याचे चित्र आहे. महापालिकेतही स्वतंत्र लढण्यासाठी त्यांनी आपल्या इच्छुकांना संधी देण्याची चाचपणी सुरू केली आहे. या घडामोडीत शिंदे सेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांचे काही इच्छुक चिंता व्यक्त करत आहेत. महायुतीचे कोंदण सुटल्यास सर्व प्रभागात त्यांना तिकीट मिळण्याची शक्यता कमी होऊ शकते. त्यामुळे शेवटच्या क्षणी काही इच्छुक भाजपमध्ये प्रवेश करतील, असेही राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी कोणत्याही नेत्याने कितीही फिल्डिंग लावली तर त्यांच्या उमेदवारांना निवडून देण्याची मतदानरूपी चावी मतदारांच्याच हाती आहे.

## अल्पवयीन पीडितेवर लैंगिक अत्याचार; अटकेतील आरोपीस जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ नोव्हेंबर-**

अल्पवयीन पीडितेवर अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपाखाली अटकेतील आरोपी शुभम मुळे यास जिल्हा व सत्र न्यायाधीश डी. एन. सुरवसे यांनी जामीन मंजूर केला आहे.

जेल रोड पोलीस ठाण्यात दि. १७ ऑगस्ट रोजी आरोपी शुभम प्रशांत मुळे (रा. रविवार पेठ, जुना बोरामणी नाका) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला होता. फिर्यादीने आपल्या जबाबात असे नमूद केले होते की, आरोपी शुभम मुळे याची ओळख इंस्टाग्राम द्वारे झाली असून त्यानंतर त्यांच्यात मैत्री झाली. आरोपी पुणे येथे डिलीव्हरी बॉय म्हणून कार्यरत असून सुट्टीच्या काळात सोलापूर येथे येत असे. दि. १४ जून २०२५ रोजी आरोपीने फिर्यादीस आपल्या घरी नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केले. काही दिवसांनी फिर्यादीस अस्वस्थ वाटू लागल्याने श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर येथे वैद्यकीय तपासणी केली असता ती दीड महिन्याची गरोदर असल्याचे निदर्शनास आले. याबाबत जेल रोड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपी शुभम मुळे याने मे. जिल्हा व सत्र न्यायालय सोलापूर येथे जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. आरोपीतर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, वरील प्रकरणात तपास पूर्ण झाला असून, पुढील पुराव्यांवर तो परिणाम करणार नाही तसेच तो न्यायालयाच्या सर्व अटींचे पालन करेल. आरोपीविरुद्ध कोणताही पूर्वइतिहास नाही. त्यास दीर्घकाळ कारागृहात ठेवणे अन्यायकारक ठरेल, म्हणून जामीन मंजूर व्हावा अशी आरोपीतर्फे बाजू मांडली होती.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हा व सत्र न्यायाधीश सुरवसे यांनी अटकेतील आरोपी शुभम प्रशांत मुळे यास सशर्त जामीन मंजूर केला. आरोपीतर्फे ॲड. कदीर औटी, ॲड. दत्तात्रेय कापुरे, ॲड. वैभव बोंगे, ॲड. पैगंबर सय्यद, ॲड. ओंकार फडतरे, ॲड. मोहीम पठाण, ॲड. शिवरत्न वाघ, ॲड. मनिष बाबरे, ॲड. रोहित थोरात, ॲड. अभिषेक नागटिळक, ॲड. त्वरिता वाघ, ॲड. अजय वाघमारे, ॲड. शिवानी पवार आणि ॲड. सलामत पटेल यांनी तर सरकारतर्फे ॲड. कुलकर्णी यांनी काम पाहिले.

## कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगतर्फे सीपीआर जनजागृती उपक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ नोव्हेंबर -**

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग पंढरपूर तर्फे हृदय पुनर्ज्जीवन म्हणजेच सीपीआर जनजागृती उपक्रम संपन्न झाला.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी हृदयविकाराच्या झटक्याच्या वेळी तात्काळ करावयाच्या मदतीचे प्रत्यक्षिक नागरिकांना समजावून सांगितले. या उपक्रमाच्या शेवटच्या दिवशी श्री विठ्ठल मंदिर परिसर तसेच ग्रामपंचायत शेळवे या ठिकाणी प्रात्यक्षिकामधून जनजागृती करण्यात आली.




यावेळी नागरिकांना सीपीआर देण्याची योग्य पद्धत दाखवण्यात आली. प्रत्येक नागरिकाला हृदयविकाराच्या झटक्यावेळी करण्यात येणाऱ्या प्राथमिक उपचाराचे प्रात्यक्षिक ज्ञान देण्यात आले.

या उपक्रमामुळे हृदयविकारामुळे होणारी जीवितहानीची संख्या कमी होईल व अनेक नागरिकांचे जीव वाचतील असे मत कर्मयोगी इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंगचे प्राचार्य प्रा. गुरुराज कुलकर्णी यांनी व्यक्त केले. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन रोहन परिचारक यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. यावेळी कर्मयोगी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. एस.पी. पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार गणेश वाळके, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सचिन जाधव उपस्थित होते.

## प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकाऱ्यांची दहिटणेस भेट

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ११ नोव्हेंबर-**

दहिटणे (ता. अक्कलकोट) येथे अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी प्रणय मित्तल, विशाल देव, श्रीमती विधी, श्रीमती शक्ती दुबे, रंगमंजु, डोणेपुडी विजय बाबू यांनी संपूर्ण गावाची पाहणी केली.



यादरम्यान धामगुंडे सावकार यांचा वाडा पाहून महाराष्ट्रीयन संस्कृती विषयी कुतूहल व्यक्त केले. त्याचबरोबर अंबाबाई मंदिर,हेमाडपंथी महादेव मंदिर पाहून आनंदित झाले. त्याचबरोबर अध्यक्षा सुवर्णा हुले यांच्या गुलाब महिला स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत बनवण्यात आलेल्या कडक भाकरी आणि शेंगा चटणीचा आस्वाद घेऊन महाराष्ट्रीयन खाद्य संस्कृतीचे कौतुक केले. सदर अभ्यास दौऱ्यात ग्राम पंचायत अधिकारी अभिमन्यू ताड यांनी ग्रामपंचायतीची माहिती दिली. अंगणवाडी सेविका वर्षाराणी माने व अनुजा मोरे यांनी अंगणवाडीची संपूर्ण माहिती दिली. महिला बचत गटाविषयी अंबु कटकधोंड व रेश्मा चौधरी यांनी संपूर्ण माहिती दिली. तसेच शेती विषयी चनवीर बोधले व पोपसभट यांनी माहिती दिली. यावेळी संपूर्ण गावाचे उत्कृष्ट कार्य असल्याचे सांगून समाधान व्यक्त केले. यावेळी उपस्थित गटविकास अधिकारी शंकर कवितके, विस्तार अधिकारी संजय पाटील, कक्ष अधिकारी दयानंद परिचारक, ग्रामपंचायत अधिकारी मोमीन, ग्रामपंचायत अधिकारी समर्थ हरणे उपस्थित होते. प्रास्ताविक विस्तार अधिकारी संजय पाटील यांनी केले व आभार सरपंच नितीन मोरे यांनी मानले.

## शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष शहर प्रमुखपदी बसवराज आल्लोळी

**अक्कलकोट, दि. ११ नोव्हेंबर-**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या तथा डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या अक्कलकोट शहर प्रमुख पदी बसवराज आल्लोळी यांची निवड करण्यात आली आहे.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून गोर-गरीब, गरजू आणि आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयांत (१०% ) राखीव खाटा उपलब्ध करुन देणे, निकषात बसत असलेल्या गरीब रुग्णांवर पुर्णतः मोफत,सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्यासंदर्भातील मदत तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजने अंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांत गरजू रुग्णांना मोफत शस्त्रक्रिया करणे संदर्भात योग्य मार्गदर्शनासाठी तत्पर



राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. गोरगरीब-गरजू रुग्णांना भरीव अर्थसहाय्य व्हावे या करीता पंतप्रधान वैद्यकीय सहाय्यता निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, श्री सिध्दिविनायक गणपती मंदीर ट्रस्ट, सर रतन टाटा ट्रस्टच्या माध्यमातून मदतीसाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# विठ्ठल परिवाराच्या एकीच्या बैठकीनंतर बेकीचेच दर्शन

### विठ्ठल परिवार एकत्रित राहणार की दुंभगला जाणार याची चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ नोव्हेंबर-**


पंढरपूर नगरपालिकेची निवडणूक लढविण्यासाठी आणि पालिकेवरील परिचारकांची सत्ता संपुष्टात आणण्यासाठी एकत्रित आलेल्या विठ्ठल परिवारातील प्रमुख नेते असलेल्या आमदार अभिजीत पाटील यांनी नगरपालिका निवडणूकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या ऐन मुलाखतीच्या वेळीच दांडी मारल्याने येथील राजकीय वतुर्ळात चर्चेला उधाण आले आहे. भाजपाचे नेते प्रविण दरेकर यांच्या पंढरपूर दौऱ्यानंतर अभिजीत पाटील यांची भूमिका बदलली का? अशा देखील चर्चेला उधाण आले आहे. याबरोबरच एकीच्या आणभाका केलेला विठ्ठल परिवार एकसंघ राहणार की निवडणूकीपूर्वीच दुंभगणार अशी देखील शंका राजकीय वतुर्ळात आता उपस्थित केली जात आहे.

पंढरपूर नगरपालिका निवडणूकीचे बिगुल वाजल्या नंतर सत्ताधारी परिचारक यांच्या पांडुरंग परिवारा बरोबरच विरोधी विठ्ठल परिवाराकडून देखील पालिका निवडणूकीच्या दृष्टीने चाचपणी सुरु झाली. पांडुरंग परिवाराचे कुटुंबप्रमुख (कै.) सुधाकरपंत परिचारक यांच्या निधनानंतर देखील त्यांचा पांडुरंग परिवार एकसंघ ठेवण्यात माजी आमदार प्रशांत परिचारक आणि त्यांचे बंधु युटोपियन शुगरचे अध्यक्ष उमेश परिचारक यांची भूमिका महत्वाची राहिलेली आहे.

> **विठ्ठल परिवाराच्या एकसंघ राहण्यावर देखील शंका**
>
> या बरोबरच विठ्ठल परिवाराच्या एकीसाठी पुढाकार घेतलेले नागेश भोसले यांनी आपल्या पत्नीसाठी चक्क भाजपाकडून नगराध्यक्षपदासाठीच्या केलेल्या उमेदवारीची चाचपणी असो, की विठ्ठल परिवाराच्या इच्छुक उमेदवार मुलाखतीच्या वेळी अभिजीत पाटील यांची अनुपस्थिती या वरुन विठ्ठल परिवाराच्या एकत्रित राहण्यावर देखील आता शंका उपस्थित होवू लागली आहे.

त्या मानाने माजी आमदार (कै.) भारतनाना भालके यांच्या निधनानंतर विठ्ठल परिवारात दुफळी निर्माण झाली. विठ्ठल परिवारातील अनेक नेते, पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या वेगळ्या चुली मांडल्या. दरम्यान पालिका निवडणूकीचा बिगुल वाजल्यानंतर दुंभगलेला विठ्ठल परिवार एकत्रित करण्यासाठी विठ्ठल परिवारातील अनेकांनी चंग बांधला. जर परिचारकांना शह द्यावयाचा असेल तर आपसातील वितुष्ट आणि दूरावा दूर करुन सर्व विठ्ठल परिवार एकदिलाने एकत्र येणे गरेजेचे आहे. जर आपण हे केले तरच पालिकेवरील परिचारकांची सत्ता उलथवून टाकु शकतो या बद्दलच्या आणाभाका एका बैठकीत विठ्ठल परिवारातील नेते मंडळींकडून घेण्यात आल्या.

त्यानंतर आमदार अभिजीत पाटील, मनसेचे नेते दिलीप धोत्रे, विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगिरथ भालके, सहकार शिरोमणीचे अध्यक्ष कल्याणराव काळे, भोसे येथील विठ्ठल परिवाराचे नेते गणेश पाटील, शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख महेश साठे आदींसह विठ्ठल परिवारातील जुने,जाणते नेते हे नुकतेच एकाच व्यासपीठावर एकत्रित दिसले होते. त्याच व्यासपीठावरुन पालिका निवडणूकीसह या पुढील काळात येणाऱ्या प्रत्येक निवडणूका विठ्ठल परिवार एकविचाराने,एकत्रित लढण्यावर निश्चय देखील करण्यात आला. पालिका निवडणूकीसाठी भगिरथ भालके यांच्या पत्नी डॉ.प्रणिता भालके यांना उमेदवार देवू करण्यापर्यंत चर्चा झाली.



मात्र त्या नंतर दुसऱ्याच दिवशी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारी वरुन सामाजिक कार्यकर्ते तथा माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले यांनी विठ्ठल परिवारातून काढता पाय घेत पत्नी साधना भोसले यांच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी विठ्ठल परिवारा पासून फारकत घेताना दिसले. योगायोग म्हणजे विठ्ठल कारखान्यावर चालू गळीत हंगामात तयार झालेल्या साखर पोत्याच्या पुजनानिमित्त भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रविण दरेकर हे नुकतेच विठ्ठल कारखाना येथे आले होते. दरेकरांनी विठ्ठल कारखान्यावरील कार्यक्रमात अभिजीत पाटील यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विशेष आशीर्वाद असल्याचे आपल्या भाषणातून जाहीरपणे सांगितले. दरेकरांच्या या विधानाने तालुक्यातील राजकीय जाणकरांच्या भुवया देखील उंचावल्या गेल्या. दरम्यान विठ्ठल कारखान्यावरील या कार्यक्रमा नंतर लगेचच सोमवारी विठ्ठल परिवाराकडून नगरपालिका निवडणूकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतीस इच्छुक उमेदवारांचा चांगला प्रतिसाद लाभला. मात्र भाजपाच्या वतीने निवडणूक लढविण्यासाठी जशी इच्छुकांची भाऊगर्दी दिसत होती तशी गर्दी विठ्ठल परिवाराकडून निवडणूक लढविण्यास असलेल्या इच्छुकांची दिसली नाही. दरम्यान इच्छुक मंडळींच्या मुलाखतीच्या वेळी विठ्ठल परिवाराचे नेते तथा माढ्याचे आमदार अभिजीत पाटील हे उपस्थित नव्हते. त्यामुळे दरेकरांच्या दौऱ्यानंतर लगेचच अभिजीत पाटील यांची भुमिका बदलली काय ? अगोदरच ठरलेल्या मुलाखती कडे ऐनवेळी पाटील यांनी का पाठ, फिरवली ? विठ्ठल परिवाराच्या मुलाखतीस अभिजीत पाटलांची दांडी अशा एक ना अनेक चर्चांना उधाण आले. दरम्यान हा निव्वळ योगायोग म्हणावा की खरोखरच त्यांना काही महत्वाचे काम असल्यामुळे ते मुलाखतीच्या वेळी उपस्थित नव्हते या बद्दलचा अद्याप पर्यंत तरी खुलासा त्यांच्या कडून झाला नाही. मात्र इकडे राजकीय वतुर्ळात अनेक प्रकारचे तर्क,वितर्क सुरु झाले. वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चांना उधाण आले. भाजपाचे नेते प्रविण दरेरकरांच्या पंढरपूर भेटीमुळेच आमदार अभिजीत पाटील यांनी आपली भूमिका बदलली का? असा सूर देखील राजकीय वतुर्ळात आता उमटू लागला. त्यामुळे विठ्ठल परिवाराच्या एकसंघ राहण्याबाबत आता आमदार पाटील यांनीच स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# मसूद अझहरच्या बहिणीने रचला कट?

## सक्रिय होतेय् जैशची महिला विंग

◆ **नवी दिल्ली, ११ नोव्हेंबर**

दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्ब स्फोटप्रकरणी मंगळवारी एक मोठा खुलासा झाला. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, हा हल्ला पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदचा (जेईएम) प्रमुख मसुद अझहरची बहीण सादियाने रचला. फेब्रुवारी २०१९ मध्ये पुलवामा हल्ला आणि एप्रिल २०२५ मध्ये पहलगाम हत्याकांड घडवून आणणारी हीच संघटना आहे.

दिल्लीतील स्फोटात अमोनियम नायट्रेट आणि इंधन तेलाने भरलेल्या स्फोटकांचा वापर केल्याचा संशय आहे. या स्फोटात १३ जणांचा मृत्यू आणि अनेक जण जखमी झाले होते. जैश-ए-मोहम्मदची स्थापना कुख्यात दहशतवादी मसूद अझहरने केली होती. पुलवामा हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानातील बालाकोटमधील त्यांचे प्रशिक्षण शिबिरे हवाई हल्ल्यात उद्ध्वस्त केली.

दरम्यान, पहलगाम हल्ल्यानंतर, ७ मे रोजी भारतीय क्षेपणास्त्र हल्ल्यात जैशचे बहावलपूर मुख्यालय उद्ध्वस्त झाले. मसूद अझहरने त्या हल्ल्यात त्याच्या कुटुंबातील १० सदस्यांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली, ज्यात त्याचा मेहुणा युसुफ अझहरचा समावेश होता. युसुफ अझहरची धाकटी बहीण सादिया अझहरचा पती होता.

**जैशने महिला विंगची पुनर्रचना**

संघटनेवर मोठे हल्ले झाले असूनही, गुप्तचर संस्था म्हणतात की जैश पाकिस्तानी लष्कराच्या मदतीने पुन्हा सक्रिय होत आहे. ऑगस्टमधील वृत्तांनुसार, जैशने एक नवीन निधी संकलन मोहीम सुरू केली आहे आणि महिला भरती वाढवत आहे.

या संदर्भात, संघटनेने सादिया अझहरच्या नेतृत्वाखाली 'जमात-उल-मुमिनत' नावाची महिला विंग स्थापन केली आहे. ती आणि तिची बहीण समायरा अझहर महिलांना कट्टरपंथी विचारसरणीत शिकवण्यासाठी ऑनलाईन वर्ग घेत आहेत. या विंगचे लक्ष जैश कमांडरच्या पत्नी आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटातील महिलांवर आहे. प्रमुख भरती क्षेत्रांमध्ये जैशच्या उर्वरित प्रशिक्षण शिबिरांच्या आसपासचे क्षेत्र समाविष्ट आहेत.

**स्फोटापूर्वी दोन डॉक्टरांना अटक**

दिल्ली स्फोटाच्या काही तास आधी, जम्मू-काश्मीर पोलिसांनी केलेल्या आंतरराज्यीय दहशतवादविरोधी छाप्यात आणखी दोन डॉक्टरांना अटक करण्यात आली होती. त्यापैकी एक डॉ. मुझमिल शकील होता, ज्यांच्याकडून अंदाजे २९०० किलो स्फोटके जप्त करण्यात आली होती. दुसरा, डॉ. आदिल अहमद राथेर, उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथे अटक करण्यात आली होती. (वृत्तसंस्था)

### दिल्ली स्फोटातील दोन मोठे 'कनेक्शन'



दिल्ली लाल किल्ला स्फोट प्रकरणात जैशचे दोन मोठे कनेक्शन उघड झाले आहेत. पहिले, स्फोट घडवणारा दहशतवादी मॉड्युल. दुसरे म्हणजे शाहिना शाहिद, जिच्या स्विफ्ट कारमधून एक असॉल्ट रायफल आणि मोठ्या प्रमाणात दारुगोळा जप्त करण्यात आला. शाहिना शाहिद ही एक वैद्यकीय व्यावसायिक आहे आणि हरयाणातील फरिदाबाद येथील अल-फलाह रुग्णालयात डॉ. मुझमिल शकील यांच्यासोबत काम करीत होती. पोलिस सूत्रांनुसार, शाहिना ही जैशच्या भारतातील महिला शाखेची प्रमुख असू शकते. दोघांनाही सोमवारी संध्याकाळी फरिदाबाद येथून अटक करण्यात आली.


### संपूर्ण नेटवर्कची चौकशी

दिल्ली पोलिसांचे विशेष पथक, एनआयए आणि गुप्तचर संस्था या संपूर्ण नेटवर्कची चौकशी करत आहेत. फरिदाबाद, सहारनपूर आणि जम्मू-काश्मीरच्या अनेक भागांत छापे टाकले जात आहेत. दिल्ली बॉम्बस्फोटाचा उद्देश राष्ट्रीय राजधानीत दहशत आणि अस्थिरतेचे वातावरण निर्माण करणे हा होता, असे पोलिस सूत्रांचे म्हणणे आहे.

## जगभरातून निषेध, जीवितहानीवर शोक

◆ **नवी दिल्ली, ११ नोव्हेंबर**

**स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर ऐतिहासिक घटनांची साक्षीदार असलेला राजधानी दिल्लीतील लाल किल्ला आणि त्यासमोरच कारमध्ये झालेल्या स्फोटाचा देशात आणि जगभरातून निषेध व्यक्त केला जात आहे. सत्ताधारी आणि विरोधकांसह विविध देशांच्या राजदूतांनी जीवितहानीवर शोक व्यक्त केला. त्यात जपान, इराण, अर्जेंटिना आणि ब्रिटनचा समावेश असून, त्यांनी या दुःखद प्रसंगी भारतासोबत असल्याचे म्हटले आहे.**



दिल्लीमध्ये झालेल्या दुःखद घटनेत जीव गमावलेल्यांच्या कुटुंबीयांबद्दल मी मनापासून संवेदना व्यक्त करतो. या कठीण काळात शोकग्रस्त कुटुंबांना शक्ती आणि धीर मिळावा अशी मी देवाकडे प्रार्थना करतो. देशातील आघाडीच्या तपास संस्था या घटनेचा जलद आणि तपशीलवार तपास करीत आहेत. तपास अहवाल लवकरच सार्वजनिक केला जाईल. या दुर्घटनेतील दोषींना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही, याची मी देशवासीयांना खात्री देतो.

- **राजनाथ सिंह**, संरक्षण मंत्री



दिल्लीतील स्फोटाची घटना अतिशय दुर्दैवी आहे. सरकारने ही घटना अतिशय गांभीर्याने घेतली आहे. स्फोटामागे असलेल्या लोकांवर कठोर कारवाई केली जाईल. या देशात दहशतवादाच्या समर्थकांना जागा नाही. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले त्यांच्या कुटुंबीयांबद्दल मी संवेदना व्यक्त करतो.

- **नितीन गडकरी**, केंद्रीय मंत्री



दिल्लीत कार बॉम्बस्फोटात झालेल्या जीवितहानीमुळे सर्वजण खूप दुःखी आहोत. ज्यांनी आपले प्रियजन गमावले, त्यांच्याबद्दल मी मनापासून शोक व्यक्त करतो. आमचे विचार आणि प्रार्थना सर्व शोकसंतप्त कुटुंबे आणि जखमींसोबत आहेत. देशाच्या सामूहिक संवेदना आणि एकता या दुःखाच्या वेळी त्यांना बळ देईल अशी आम्हाला आशा आहे.

- **भूषण गवई**, सरन्यायाधीश



दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटाची घटना अतिशय दुर्दैवी असून, जीवितहानीबद्दल आम्हाला खूप दुःख आहे. ज्या कुटुंबांनी आपले प्रियजन गमावले त्यांच्या कुटुंबीयांना मनापासून संवेदना आणि जखमी लवकर बरे व्हावे अशी प्रार्थना करतो.

- **ओनो केईची**, जपानचे राजदूत



दिल्लीमध्ये झालेल्या कार बॉम्बस्फोटात भारतीय नागरिकांचा मृत्यू आणि जखमींच्या वृत्ताने आम्हाला खूप दुःख झाले. आम्ही भारत सरकार आणि भारतातील जनतेप्रती आमच्या मनापासून संवेदना व्यक्त करतो.

- **डॉ. इराज इलाही**, इराणचे राजदूत



दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटात बाधित झालेल्या सर्वांबद्दल आमच्या संवेदना. आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत या घटनेत सहभागी असलेल्यांना भारत सरकारने कठोर शिक्षा करावी.

- **लिंडी कॅमेरॉन**, ब्रिटनचे राजदूत



कार स्फोटाच्या घटनेने प्रभावित झालेल्या सर्वांप्रती आमच्या संवेदना आहे आणि जखमींना लवकर बरे होण्यासाठी आम्ही प्रार्थना करतो.

- **फिलिप ग्रीन**, ऑस्ट्रेलियाचे राजदूत



अर्जेंटिनाच्या जनतेच्या आणि सरकारच्या वतीने आम्ही या दिल्लीतील स्फोटात जीव गमावलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करतो. भारत सरकारने या घटनेत सहभागी असलेले आणि त्यांच्या सूत्रधारांवर कारवाई करावी आम्ही भारतासोबत आहे.

- **मारियानो कौसिनो**, अर्जेंटिनाचे राजदूत



स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांप्रती आमच्या संवेदना आणि जखमी लवकर बरे व्हावे अशी प्रार्थना करतो. या कठीण काळात मालदीव भारत आणि त्याच्या जनतेसोबत उभा आहे.

- **मोहम्मद मुईझ्झू**, मालदीवचे राष्ट्राध्यक्ष



दिल्लीत स्फोटाची घटना अतिशय दुर्दैवी असून, त्यात मृत पावलेल्या कुटुंबीयांप्रती आमच्या संवेदना आहे. भारत सरकारने या प्रकरणाचा पाठपुरावा करावा आमचा पूर्ण पाठिंबा आहे.

- **रुवेन अझर**, इस्रायलचे राजदूत

## बॉम्बस्फोटानंतर पाकिस्तानी हवाई दल सतर्क

◆ **जयपूर, ११ नोव्हेंबर**

दिल्ली बॉम्बस्फोटानंतर, पाकिस्तान घाबरला आणि राजस्थानच्या सीमेवर हवाई दलाची गस्त सुरू केली. तिन्ही सशस्त्र दलांच्या प्रमुखांनी आपत्कालीन बैठक घेतली. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी रात्री उशिरापर्यंत एनएसए आणि आयएसआयच्या महासंचालकांसोबत बैठका घेतल्या.

दरम्यान, स्फोटानंतर यूकेच्या परराष्ट्र कार्यालयाने (एफसीडीओ) भारतातील काही भागांसाठी प्रवासी सल्ला जारी केला आहे. ब्रिटिश सरकारने आपल्या नागरिकांना भारत-पाकिस्तान सीमेपासून १० किलोमीटर अंतरावर आणि जम्मू-काश्मीर आणि मणिपूर राज्यांमध्ये प्रवास करू नये, असा सल्ला दिला आहे.

**राजस्थान सीमेवर गस्त**

**अमेरिका, फ्रान्सनेचाही इशारा**

अमेरिकन दूतावासानेही आपल्या नागरिकांना इशारा जारी केला आहे, ज्यामध्ये त्यांना लाल किल्ला आणि पर्यटकांच्या गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळण्यास आणि नेहमी सतर्क राहण्यास सांगितले आहे.

दरम्यान, फ्रेंच दूतावासाने सांगितले की, १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात वाजता लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ स्फोट झाला. स्फोटाचे कारण आणि मृतांची संख्या सध्या अस्पष्ट आहे.

फ्रेंच दूतावासाने दिल्लीतील आपल्या नागरिकांना सतर्क राहण्याचा आणि गर्दीच्या ठिकाणी आणि घटनेच्या ठिकाणी जाण्यापासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे. फ्रेंच प्रवाशांना 'फिल डीएरियन' पोर्टलवर नोंदणी करण्यास सांगितले आहे जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत त्यांच्याशी संपर्क साधता येईल. भारतात झालेल्या स्फोटाबाबत अनेक देशांनी चिंता व्यक्त केली आहे. या स्फोटाच्या तपासासाठी सुरक्षा यंत्रणांनी कंबर कसून चौकशीचे सूत्र फिरविले आहेत. (वृत्तसंस्था)





लाल किल्ल्याजवळ सोमवारी सायंकाळी झालेल्या भीषण स्फोटात अनेक वाहने बेचिराख झाली. या वाहनांचे केवळ सांगाडेच शिल्लक राहिले. विखुरलेले भाग आणि चुराडा झालेली वाहने एकत्रित करण्यात आली. न्यायवैद्यक प्रयोगशाळेचे कर्मचारी यातून पुरावे गोळा करीत आहेत

## कारने बदलली अनेक राज्ये आणि चालक

◆ **नवी दिल्ली, ११ नोव्हेंबर**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळच्या स्फोटाचा तपास पूर्णपणे स्फोटात वापरलेल्या गाडीभोवती फिरतो आहे. स्फोटासाठी वापरण्यात आलेल्या कारने अनेक चालक आणि राज्ये बदलल्याचे समोर आहे.

दिल्ली कार स्फोटातील आय२० ही हरयाणा पासिंगची असून तिचा नंबर एचआर-२६ सीई ७५७४ असा आहे. तिचे उत्पादन २०१३ मध्ये झाले होते. ही गाडी २०१४ मध्ये सलमान नावाच्या व्यक्तीच्या नावे रजिस्टर झाली होती. तो या गाडीचा दुसरा मालक आहे. नोंदणी कागदावरून सलमान हा गुरुग्रामचा रहिवासी असल्याचे समजते.

ज्यावेळी पोलिसांनी सलमानला दिल्ली स्फोट प्रकरणी ताब्यात घेतले त्यावेळी त्याने ही गाडी ओखला येथील देवेंद्र नामक व्यक्तीला विकल्याचे सांगितले. देवेंद्रने देखील ही गाडी अंबाला येथील एका व्यक्तीला विकली. त्या व्यक्तीने ही गाडी नंतर जम्मू-काश्मीरच्या पुलवामा येथील आमीरला विकल्याचे तपासात आढळून आले आहे.

आमीरकडे ही गाडी आल्यानंतर ती डॉ. उमर मोहम्मद याच्याकडे आली. तो फरिदाबादच्या अल फलाह विद्यापीठात काम करीत होता. कारमध्ये स्फोट झाला त्यावेळी, गाडी डॉ. उमर मोहम्मदच चालवत असल्याचा संशय आहे. हा आत्मघातकी हल्ला असू शकतो का, या अनुषंगाने देखील तपास यंत्रणा तपास करीत आहे.

**कागदोपत्री एकच मालक मात्र अनेक चालक**

स्फोटातील गाडी जरी अनेक माणसांकडे फिरली असली तरी त्याचा कागदोपत्री मालक एकच आहे तो व्यक्ती म्हणजे सलमान. जरी ही गाडी अनेक राज्ये फिरली असली तरी, त्याचा मालक एकच राहिला. (वृत्तसंस्था)

## डॉ. उमरशी संबंधित सहा जणांना रातोरात उचलले

### काश्मीर पोलिसांनी केली तातडीची कारवाई

◆ **जम्मू, ११ नोव्हेंबर**

राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या आत्मघाती हल्ल्यानंतर लगेचच दक्षिण काश्मीरमधील पोलिसांनी रात्रीतून सहा संशयितांना ताब्यात घेतले. यामध्ये हल्ल्यातील मुख्य संशयित डॉ. उमर यांच्या कुटुंबातील तीन सदस्यांचा समावेश होता. आरोपी डॉ. उमर हा इतर दोन डॉक्टरांच्या संपर्कात होता, त्यांना पोलिसांनी अटक केली होती.

पोलिसांचे म्हणणे आहे की, हल्ल्यात वापरलेली ह्युंदेई आय-२० कार डॉ. उमरने खरेदी केली होती. शिवाय, कारमध्ये बसलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणारा व्यक्तीचे उमरशी आश्चर्यकारक साम्य आहे. फरिदाबादमध्ये डॉ. मुझम्मिल याच्याकडे मोठ्या प्रमाणात स्फोटके सापडल्याची चौकशी सुरू झाल्यापासून उमर बेपत्ता होता. पुलवामा येथील त्यांच्या गावातून त्यांच्या कुटुंबातील तीन सदस्यांना ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी सांगितले की, फरिदाबाद मॉड्युलशी संबंधित एक व्यक्ती कारमध्ये होती. तथापि, डीएनए चाचणीनंतरच संपूर्ण प्रकरण उघड होईल. काश्मीरमध्ये अटक केलेल्या सहा जणांमध्ये आमिर रशीद मीर, उमर रशीद मीर आणि तारिक मलिक यांचा समावेश आहे. आमिर हा प्लंबर आहे, उमर हा पॉवर डेव्हलपमेंट विभागात काम करतो आणि तारिक मलिक हा बँकेचा सुरक्षा रक्षक आहे. विशेष पोलिस पथक त्यांची चौकशी करीत आहे.

१९ ऑक्टोबर रोजी नौगाममध्ये जैशचे पोस्टर सापडल्यानंतर या मॉड्युलचा तपास सुरू झाला. या प्रकरणात यापूर्वी अनेक लोकांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली होती. तथापि, इतक्या मोठ्या कटाचा संशय नव्हता. फक्त दोन दिवसांपूर्वी फरीदाबादमध्ये एका डॉक्टरला अटक करण्यात आली होती, ज्याच्याकडून ३५० किलो आरडीएक्स आणि दोन एके-४७ रायफल जप्त करण्यात आल्या होत्या.

सोमवारी डॉ. मुझम्मिलशी संबंधित सात जणांना अटक करण्यात आली. यामध्ये आरिफ निसार दार उर्फ साहिल, यासिर उल अशरफ आणि मकसूद अहमद दार यांचा समावेश होता. याशिवाय, मौलवी इरफान अहमद, जमीर अहमद अहंगर आणि मुसैब यांना नौगाममधून अटक करण्यात आली. डॉ. आदिलला कुलगाममधून अटक करण्यात आली. तपासात असे दिसून आले आहे की डॉ. उमर यांनी डॉ. मुझम्मिलच्या गावालाही भेट दिली होती. तथापि, दोन्ही डॉक्टरांच्या अटकेनंतर तो बेपत्ता झाला होता.

उमरच्या आईची डीएनए चाचणी केली जाईल. त्याच्या आईला पोलिसांनी मंगळवारी डीएनए चाचणीसाठी बोलावले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. स्फोटस्थळी सापडलेल्या शरीराच्या अवयवांशी जुळणारे डीएनए नमुने देण्यासाठी आम्ही संशयिताच्या आईला बोलावले आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)

## मोठ्ठा आवाज अन् हार्ट अटॅक!

### रुग्णालय परिसरात नातेवाईकांचा आक्रोश



◆ **नवी दिल्ली, ११ नोव्हेंबर**

दिल्लीत झालेला स्फोट इतका भीषण होता की, मृतदेहांचे तुकडे होऊन ते घटनास्थळापासून २०० मीटर लांब जाऊन उडाले. इतकेच नाही तर, सुमारे ५० फूट उंच आगीच्या ज्वाळा दूरवरून दिसत होत्या.

स्फोटानंतर घटनास्थळी सर्वत्र मानवी अवयव विखुरलेले दिसत होते. बहुतांश जखमी आणि मृतांना लोकनायक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयात नातेवाईकांचा आक्रोश सुरू होता, आपल्या प्रियजनांसाठी लोक विलाप करताना दिसून आले. हे दृश्य अत्यंत हृदयद्रावक होते.

याप्रकरणी एका डॉक्टरने दिलेल्या माहितीनुसार, स्फोटात जखमी झालेल्या अनेक रुग्णांची प्रकृती गंभीर आहे. एका रुग्णाचा पाय कापला गेला आहे, तर एक जण गंभीररीत्या भाजला गेला आहे. स्फोट इतका जोरदार होता की, एका व्यक्तीचा केवळ आवाजानेच हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाला. आणखी एका व्यक्तीला डोक्याला आणि डोळ्याजवळ गंभीर दुखापत झाली आहे. (वृत्तसंस्था)

### छिन्नविछिन्न अवस्थेत मृतदेह

लोकनायक रुग्णालय घटनास्थळापासून अवघ्या सव्वादोन किलोमीटर अंतरावर असल्याने जखमींना तातडीने उपचारासाठी तेथे आणण्यात आले. आठ जणांचा रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू झालेला होता. यापैकी अनेकांचे मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत होते. २४ जखमींना दाखल करण्यात आले असून, रुग्णालयात मास कॅज्युअल्टी घोषित करून विविध विभागांतील डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर बोलावण्यात आले. बर्न आणि प्लॅस्टिक सर्जरीच्या डॉक्टरांनाही तातडीने बोलावण्यात आले.

## चार दिवसांपूर्वी खरेदी केली कार

### विक्री करणारा डीलर ताब्यात

◆ **नवी दिल्ली, ११ नोव्हेंबर**

दिल्लीतील स्फोटासाठी वापरण्यात आलेल्या कारची विक्री करण्यासाठी फरिदाबाद येथील सोनू नावाच्या व्यक्तीने ओएलएक्सवर जाहिरात दिली होती. त्याला पोलिसांनी अटक केल्याची माहिती फरीदाबाद पोलिसांचे प्रवक्ते यशपाल सिंह यांनी दिली. त्याला दिल्ली पोलिसांच्या विशेष तपास विभागाकडे सोपविण्यात आले.

कार डीलर सोनूचे फरीदाबादमधील सेक्टर ३७ मध्ये कार्यालय आहे. त्याने ओएलएक्सवर कार विक्रीसाठी जाहिरात पोस्ट केली आणि त्यानंतर ती कार विकण्यात आली. ही आय-२० कार हरयाणाची आहे आणि ती गुरुग्राम उत्तर आरटीओमध्ये नोंदणीकृत आहे. (वृत्तसंस्था)




### एकाच वर्षांत सात वेळा कारची विक्री

स्फोट झालेली कार, एचआर-२६-सीई ७६७४, हरयाणातील गुरुग्राम येथील रहिवासी सलमानच्या नावावर नोंदणीकृत आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आणि त्याची चौकशी केली. त्याने ही कार ओखला येथील रहिवासी देवेंद्रला विकल्याचे कबूल केले. देवेंद्रने ती अंबाला येथील एका तिसऱ्या पक्षाला विकली. तिथून ती गाडी पुलवामा येथील रहिवासी सलमान नावाच्या व्यक्तीला विकली, त्यानंतर ही गाडी तारीकला विकण्यात आली.

## दहशतवाद्यांच्या निशाण्यावर भारत

**दिल्लीत गेल्या १५ वर्षांत याआधी किमान १५ दहशतवादी हल्ले झाले. २९ ऑक्टोबर २००५ रोजी सरोजिनीनगर, पहाडगंज आणि गोविंदपुरी येथे तीन बॉम्बस्फोट झाले होते. यात सुमारे ६२ ठार, तर शंभरहून जास्त जखमी झाले होते. १३ सप्टेंबर २००८ रोजी करोल बाग (गफ्फार मार्केट), कॅनॉट प्लेस आणि ग्रेटर कैलाश-१ येथे पाच साखळी बॉम्बस्फोट झाले. यात सुमारे २० ते ३० ठार, तर ९०पेक्षा जास्त जखमी झाले. २७ सप्टेंबर २००८ रोजी मेहरौली येथील फ्लॉवर मार्केटमध्ये (सराई) झालेल्या स्फोटात ३ ठार तर २५ जखमी झाले होते.**






### मागील २५ वर्षांत झालेले बॉम्बस्फोट व दहशतवादी हल्ले

- **९ जून २००१** : चरार-ए-शरीफ, ४ ठार, ६० जखमी
- **१ ऑक्टोबर २००१** : जम्मू-काश्मीर विधानसभेवर हल्ला, ३८ ठार
- **१३ डिसेंबर २००१** : संसदेवर भीषण हल्ला, ७ ठार
- **२२ जानेवारी २००२** : कोलकात्यातील अमेरिकी सांस्कृतिक केंद्रावर हल्ला, ५ ठार
- **३० मार्च २००२** : जम्मूतील रघुनाथ मंदिरावर हल्ला, ११ ठार
- **२४ नोव्हेंबर २००२** : जम्मूतील रघुनाथ मंदिरावर हल्ला, १४ ठार
- **२५ सप्टेंबर २००२** : गुजरात, अक्षरधाम मंदिरावर हल्ला, ३१ ठार
- **१३ मार्च २००३** : मुंबईत स्फोट, १० ठार
- **२५ ऑगस्ट २००३** : मुंबईत स्फोट, ५२ ठार
- **२९ ऑक्टोबर २००५** : दिल्लीत तीन स्फोट, ७० ठार
- **७ मार्च २००६** : वाराणसीत स्फोट २८ ठार
- **११ जुलै २००६** : मुंबईत सात उपनगरी रेल्वेंत स्फोट, २०९ ठार
- **८ सप्टेंबर २००६** : मालेगावात स्फोट, ४० ठार
- **१८ फेब्रुवारी २००७** : समझोता एक्स्प्रेसमध्ये स्फोट, ७० ठार
- **१८ मे २००७** : हैदराबादेत मक्का मशिदीत स्फोट, १६ ठार
- **२५ ऑगस्ट २००७** : हैदराबादेत दोन स्फोट, ४२ ठार
- **२४ नोव्हेंबर २००७** : लखनो, वाराणसी, फैजाबादमध्ये स्फोट, १६ ठार
- **१३ मे २००८** : जयपूरमध्ये ९ स्फोट, ७१ ठार
- **२६ जुलै २००८** : अहमदाबादेत १७ स्फोट, ५६ ठार
- **१३ सप्टेंबर २००८** : दिल्लीत पाच स्फोट, ३३ ठार
- **२६ नोव्हेंबर २००८** : मुंबईवर पाकिस्तानी दहशतवादी हल्ला, १७१ ठार
- **१३ फेब्रुवारी २०१०** : पुण्यात बॉम्बस्फोट, १७ ठार
- **१३ जुलै २०११** : मुंबईत स्फोट, २६ ठार
- **७ सप्टेंबर २०११** : दिल्लीत स्फोट, १५ ठार
- **१ ऑगस्ट २०१२** : पुण्यात स्फोट, १८ ठार
- **२१ फेब्रुवारी २०१३** : हैदराबादेत स्फोट, १८ ठार
- **२७ ऑक्टोबर २०१३** : पाटण्यात स्फोट, ६ ठार
- **२ जानेवारी २०१६** : पठाणकोट हवाई तळावर हल्ला, ७ ठार
- **१८ सप्टेंबर २०१६** : उरी येथे हल्ला, २३ ठार
- **१४ फेब्रुवारी २०१९** : पुलवामात स्फोट, ४६ ठार
- **२२ एप्रिल २०२५** : पहलगाम येथे दहशतवादी हल्ला, २६ ठार

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# दिल्ली स्फोट आणि व्हाईट कॉलर्ड दहशतवादी

भारतासारख्या खंडप्राय देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत सोमवारी (दि. १० नोव्हेंबर) संध्याकाळच्या वर्दळीच्या वेळी एका कारमध्ये स्फोट झाला. त्यात आठ-दहा माणसांचा बळी गेला. बळींची संख्या वाढण्याची शक्यता आहे. ते पारंपरिक बॉम्बचे स्फोट होते काय आणि ते दहशतवाद्यांनीच घडविले आहेत काय, या दोन्ही प्रश्नांची स्पष्ट व निःसंदिग्ध उत्तरे आतापर्यंत मिळालेली नसली तरी या घटनेचा दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याचा निष्कर्ष काढण्याइतपत प्राथमिक पुरावे समोर आलेले आहेत. या घटनेचा संबंध उच्चशिक्षित अशा माथेफिरू व्यावसायिकांशी अर्थात व्हाईट कॉलर्ड टेररिझमशी असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असतानाच हा फिदायिन हल्ला असावा, असेही तपास यंत्रणांमधील काही लोकांना वाटते. सकृद्दर्शनी या स्फोटाशी उच्चशिक्षित कट्टरपंथीयांचा संबंध असल्याचे दिसते आहे आणि तोच खरा चिंतेचा विषय आहे. घटनेच्या आधी व नंतर काही डॉक्टरांसह संशयितांना झालेली अटक यासंदर्भातून पाहिली पाहिजे. हा स्फोट एका आय-ट्वेंटी कारमध्ये झाला आणि त्या स्फोटामुळे आजूबाजूच्या काही गाड्या व व्यक्ती यांनाही बाधित केले. आतापर्यंतचा तपास असे सांगतो की, ही कार सकाळी दिल्लीत आली आणि संध्याकाळी त्यामध्ये स्फोट झाला. लाल किल्ल्याच्या परिसरात ही कार तीनेक तास उभी होती. या कारमध्ये बसलेली व्यक्ती डॉक्टर होती, तिने मास्क धारण केलेला होता आणि तिचा संबंध पुलवामाशी होता, अशा बातम्या आल्या आहेत. या कारची खरेदी फरिदाबादमध्ये झालेली असली तरी एकाकडून दुसऱ्याकडे विकली जात असताना तिचा संबंध वेगवेगळ्या राज्यांतील व्यक्तींशी आला होता. एकुणात ही सारी माहिती या घटनेमागील दहशतवाद्यांच्या, मग ते बंदूकवाले-बॉम्बवाले असतील किंवा सभ्य समाजात वावरणारे व्यावसायिक अर्थात व्हाईट कॉलर्ड लोक असतील, सहभागाकडे अंगुलिनिर्देश करणारी आहे. ही घटना दिल्लीत घडल्यामुळे व त्यात व्हाईट कॉलर्ड लोकांचा सहभाग असल्याचे दिसत असल्याने तिचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

कोणत्याही देशाची राजधानी म्हणजे केवळ एक शहर नसते. ते त्या देशाच्या आत्म्याचे, शक्तीचे आणि सत्तेचे केंद्र असते. राजधानी दिल्लीत घडलेली छोटीशी घटना सुद्धा सुदूर दक्षिण भारतात किंवा ईशान्येत अस्वस्थता निर्माण करणारी असते. ही घटना ज्या परिसरात घडली, तो लाल किल्ल्याचा परिसर ही भारताच्या सार्वभौमत्वाची आणि स्वातंत्र्याची निरंतर ग्वाही देणारा परिसर आहे. कारण तेथून दरवर्षी पंतप्रधान स्वातंत्र्य दिनाच्या पर्वावर देशाला संबोधित करतात. तेथूनच देशाला नवी दिशा देणारी निवेदने करतात. दिल्लीत देशाची संसद आहे. सर्वोच्च न्यायालय आहे. राष्ट्रपती, पंतप्रधानांसह आपल्या राष्ट्रीय लोकतांत्रिक व्यवस्थेचे सर्व कर्णधार या शहरात असतात. त्यामुळे या शहरातील कोणत्याही घटनेला गांभीर्यानिच घ्यावे लागते. या घटनेचा प्राथमिक तपास दहशतवादी संघटना आणि काही उच्चशिक्षित व्यक्तींपर्यंत घेऊन जाणारा असला तरी पारंपरिक दहशतवादी हल्ल्याचे स्वरूप या घटनेला नाही. मात्र, हे स्फोट व्यावसायिक वर्दळीच्या भागात आणि गर्दीच्या वेळी झाले. त्यामुळे या परिसराची निवड जाणीवपूर्वक केली गेली असावी, असे म्हणण्यास वाव आहे. अशा घटनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर भीती निर्माण करण्याचा जो दहशतवाद्यांचा हेतू असतो, तो तसा येथेही असल्याचे दिसते. जे काही घडले ते आपसूक किंवा अचानक किंवा घडलेले आहे, असे म्हणण्यास वाव दिसत नाही. जे काही घडले आहे, ते कुणाकडून तरी घडविलेच गेलेले आहे, असे म्हणण्यासारखे पुरावे समोर येत आहेत. गुजरातमध्ये रिसिन नावाचा विषाक्त पदार्थ वापरून नरसंहार घडविणाऱ्यांना आपल्या एटीएसने पकडल्याची पृष्ठभूमी या घटनेला आहे. शिवाय, उत्तर प्रदेश, हरयाणा आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या पोलिस यंत्रणांनी शेकडो किलो स्फोटके जप्त केली आणि जैश-ए-मोहम्मद व अन्सार गझवात उल हिंद आणि अन् दहशतवादी संघटनांशी संबंधित असलेल्या आठ जणांना अटक केली आहे. दिल्लीच्या स्फोटानंतर हे अटकसत्र अधिक वेगाने सुरू झाले. त्यातही डॉक्टर्स आहेतच. यातील काहींचा संबंध तर थेट लष्कर-ए-तैयबाशी असल्याचे सांगितले जात आहे. वरकरणी दहशतवादी किंवा माथेफिरू न वाटणाऱ्या लोकांबद्दल संशय वाटत असल्याने या घटनेत व्हाईट कॉलर्ड दहशतवादाचा संबंध दिसतो. या घटनेचा संबंध पुलवामा हल्ल्याशी जोडला जात असतानाच फरिदाबाद दहशतवादी नेटवर्कचा यात संबंध आहे काय, याचाही छडा लावला जात आहे. बऱ्याच गोष्टी यामागील दहशतवादी अँगलची प्राथमिक पुष्टी करणाऱ्या आहेतच. पहिल्याच दिवशीच्या तपासात अटक केलेले व तपास यंत्रणांच्या रडारवर असलेले अनेक डॉक्टर्स हे कट्टरपंथी असल्याचे निदर्शनास आले आहे. सहारनपूर येथून अटक केलेला अनंतनागचा डॉक्टर, फरिदाबादेत स्फोटके गोळा करणारा डॉक्टर आणि कारमध्ये बसलेला डॉक्टर असे हे कट्टरपंथी डॉक्टर्स. फरिदाबादला अटक केलेल्या महिला डॉक्टरकडे जैश या दहशतवादी संघटनेने भारतात महिला विभाग तयार करण्याची व त्यासाठी भरती करण्याची जबाबदारी सोपविली होती म्हणतात. हे सारे लोक टेलिग्राम नावाच्या ॲपचा वापर करीत होते. यातला एक डॉक्टर तर मेडिकल कॉलेजमध्ये प्राध्यापक असल्याचे निदर्शनास आले आहे. या साऱ्या माहितीचा प्राथमिक अर्थ असा की, इस्लामी कट्टरपंथी हे फक्त अशिक्षित, अल्पशिक्षित असतात असे नव्हे, तर ते उच्चशिक्षितही असू शकतात. किंबहुना इस्लामी कट्टरपंथीयांमध्ये उच्चशिक्षितही आहेत, असा या घटनेचा अर्थ काढता येतो. उच्चशिक्षितांच्या डोक्यातही धर्मांधता किती खोलवर शिरू शकते, याचे हे उदाहरण आहे आणि त्यामुळे ते चिंता वाढविणारे आहे. दहशतवादी संघटनांशी यापूर्वी उच्चशिक्षितांचा संबंध नव्हता, असे नाही. परंतु, आता अशांची संख्या वाढत चाललेली दिसते. या घटनेच्या तपासातून बाहेर येत असलेल्या तथ्यांनी दिल्लीलाच नव्हे तर संपूर्ण देशाला मानसिक धक्का दिला आहे. लोकांच्या मनातील सुरक्षिततेची भावना पुन: प्रश्नांकित झालेली आहे. घटना छोटी की मोठी हा मुद्दा नाही. ती कुठे घडली, त्यात कुणाचा सहभाग आहे आणि त्यामागील हेतू काय, हे महत्त्वाचे आहे. एकाचा जीव गेला तरी त्या घटनेचे गांभीर्य कमी होत नाही.

दहशतवादाची अनेक बीभत्स रूपे भारताने आतापर्यंत पाहिलेली आहेत. सर्व हल्ल्यांमध्ये एक समान सूत्र दिसते. घटनेचे स्थळ बदलेल, स्फोटके बदलतील, पण त्या घटनेतून निर्माण होणारी जनसामान्यांच्या मनातील दहशत सारखीच असते. आता दहशतवादाला उच्चशिक्षित लोकांच्या संबंधांचा ठळक आयाम मिळालेला आहे. एरवी उच्चशिक्षितांवर कुणीही सहज विश्वास ठेवत असतो. अगदी अडाणी माणूस असेल तरी त्याचा विश्वास सर्वांत आधी बसतो तो शिकल्या-सवरल्या माणसावर. त्या विश्वासालाच तडा देणारी ही घटना आहे. इस्लामी कट्टरपंथीयांचे वैशिष्ट्य असे की, त्यांचे शांतता, स्थैर्य, सौहार्दाशी कायम वाकडे असते. ते आपल्याच बिरादरीतल्या लोकांशी सतत भांडत असतात. आखाती देशांमध्ये, आफ्रिकेतल्या देशांमध्ये त्यांची सतत युद्धे सुरू असतात. भारत हा तर त्यांच्या दृष्टीने नावडत्या लोकांचा देश. आमचाच धर्म सर्वोच्च, आमचीच शिकवण सर्वोच्च, आमच्याच चालीरीती उत्तम अशीच शिकवण ज्यांना घरात किंवा त्यांच्या कथित शाळेत मिळत असेल, त्यांना इतरांचे अस्तित्व सहन न होणे स्वाभाविकच. त्यामुळे अर्बन नक्षल्यांसारखे अशा सुटाबुटातल्या दहशतवाद्यांनाही रगडून काढले पाहिजे. केंद्र सरकारने दहशतवाद प्रतिबंधक कायद्याच्या आधारे या मानवतेच्या अपराध्यांना, त्यांच्या म्होरक्यांना आणि त्यांना स्थानिक स्तरावर पाठिंबा देणाऱ्या सर्वांना हुडकून काढले पाहिजे आणि त्यांना कठोरतम शिक्षा दिली पाहिजे. एनआयएने चौकशीची सूत्रे हाती घेतली आहेतच. उत्तर प्रदेश, हरयाणा इत्यादी राज्यांमध्ये धाडसत्रही सुरू झाले आहे. आपल्या तपास यंत्रणांनी या स्फोटाच्या तपासात अधिक परिश्रम घेणे यासाठी अपेक्षित आहे की, गेल्या दशकभराच्या मोदी सरकारच्या काळात निर्माण झालेल्या सुरक्षिततेच्या भावनेला या स्फोटांनी धक्का दिला आहे. आम भारतीय नागरिकांच्या विश्वासाची पुन:प्रतिष्ठा करण्यासाठी सर्व नराधमांना, त्यांच्या कथित व्यवसायाचा विचार न करता, तातडीने शोधून दंडित करणे व पांढरपेशा कट्टरपंथीयांना निरंतर ठेचून संपविणे अत्यंत आवश्यक आहे. अपरिहार्य आहे.

---

## विशेष

# अर्थशक्तीचा उदय

**प्रा. सुखदेव बखळे**

जागतिक सागरी शक्ती म्हणून स्वतःला स्थापित करण्याच्या उद्देशाने एक धाडसी पाऊल उचलून भारताने 'मेरीटाईम इंडिया व्हिजन २०३०' (एआयव्ही) लाँच केले. २०२१ मध्ये सुरू झालेल्या या परिवर्तनकारी रोडमॅपमध्ये १५० हून अधिक धोरणात्मक उपक्रमांचा समावेश आहे. बंदरांचे आधुनिकीकरण, शिपिंग क्षमता वाढवणे, क्षमता आणि कौशल्य विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून अंतर्गत जलमार्गांना बळकट करणे हे या दृष्टिकोनाचे उद्दिष्ट आहे. केवळ मालवाहतुकीचा आराखडा न राहता 'एमआयव्ही २०२०' हे व्यापार, गुंतवणूक आणि रोजगारासाठी एक उत्प्रेरक आहे. यामुळे भारताच्या आर्थिक विकासाचा आणि जागतिक स्पर्धात्मकतेचा मार्ग मोकळा होतो. भारताचे सागरी क्षेत्र वेगाने वाढत आहे. बंदरे, किनारी नौवहन आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये विक्रमी कामगिरी भारताला आर्थिक विकासाच्या नवीन मार्गावर पुढे नेत आहे. या क्षेत्राची प्रगती राष्ट्राला बळकट करण्यात त्याची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करते. भारताच्या बंदर क्षेत्राने प्रचंड परिवर्तनकारी झेप घेतली आहे. बंदरांची एकूण क्षमता १४० कोटी टनांवरून २७६.२ कोटी टन झाली आहे. क्षमतेतील ही वाढ आधुनिकीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विकासात होणाऱ्या मोठ्या गुंतवणुकीचे प्रतिबिंब आहे. मालवाहतुकीचे प्रमाणदेखील प्रभावीपणे वाढले, ९७.२ दशलक्ष टनांवरून १५९.४ दशलक्ष टन मालवाहतूक झाली. यावरून सागरी व्यापारात आणि बंदरांच्या कार्यक्षमतेत प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते.

२०२४-२५ मध्ये प्रमुख बंदरांमधून ८५.५ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली. २०२३-२४ मध्ये या बंदरांमधून ८१.९ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली होती. जलवाहतुकीचा सरासरी वेळ ९३ तासांवरून फक्त ४८ तासांवर आला आहे. यामुळे एकूण उत्पादकता आणि जागतिक स्पर्धात्मकता आणि या क्षेत्राची आर्थिक ताकददेखील वाढली आहे. या क्षेत्राचा निव्वळ वार्षिक अधिशेष १,०२६ कोटी रुपयांवरून ९,३५२ कोटी रुपयांपर्यंत झपाट्याने वाढला आहे. तो महसूल निर्मिती आणि खर्च व्यवस्थापनात सुधारणा दर्शवतो. ऑपरेटिंग रेशो ७३ टक्क्यांवरून ४३ टक्क्यांपर्यंत सुधारणे हे संवहनी आणि फायदेशीर बंदर ऑपरेशन्सच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. भारताचे शिपिंग क्षेत्र सातत्याने विकसित होत आहे. भारतीय ध्वजांकित जलवाहतुकीची संख्या १,२०५ वरून १,५४९ पर्यंत वाढली आहे. ती देशाच्या व्यापक सागरी उपस्थितीचे संकेत देते. भारतीय ताफ्याचे एकूण टनेजदेखील दहा दशलक्ष ग्रॉस टनांनी वाढून १.३५ कोटी ग्रॉस टन झाले आहे. त्यांची शिपिंग क्षमता अधिक मजबूत आणि अधिक सक्षम होण्याची अपेक्षा आहे. किनारी शिपिंगमध्येही लक्षणीय गती दिसून आली आहे. मालवाहतूक ८.७० दशलक्ष टनांवरून १६.५० दशलक्ष टन झाली आहे. यामुळे कार्यक्षम, परवडणाऱ्या आणि पर्यावरणपूरक वाहतुकीच्या पद्धतींकडे कल वाढतो.

भारतीय आंतरदेशीय जलमार्ग प्राधिकरणाने (आयडब्ल्यूएआय) म्हटले आहे, की ते १४.६० दशलक्ष टन मालाची विक्रमी वाहतूक करेल. ही आंतरदेशीय जलवाहतूक क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक घटना आहे. २०१४ च्या १.८० दशलक्ष टनाच्या तुलनेत ही वाढ ७१० टक्के आहे. 'आयडब्ल्यूएआय'ने 'हल्दिया मल्टीमोडल टर्मिनल' (एचएमटी) आयआरसी नॅचरल रिसोर्सेसकडे सोपवले आहे. सरकार आणि खाजगी क्षेत्राच्या भागीदारीमध्ये अंतर्गत जलमार्ग पायाभूत सुविधांचे अपग्रेडिंग आणि बहुमॉडेल वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. जागतिक बँकेच्या मदतीने बांधलेल्या पश्चिम बंगालमधील टर्मिनलची क्षमता ०.३० दशलक्ष टन आहे. प्रवासी जलवाहतूक आणि रोप-पॅक (वाहने आणि वाहने वाहून नेणारी जहाजे) ची लोकप्रियतादेखील बरीच वाढली आहे. २०२४-२५ मध्ये ७.५ कोटींहून अधिक वाहने त्यातून प्रवास करतील. यावरून दिसून येते, की लोक सुरक्षित आणि कार्यक्षम प्रवासासाठी जलद गतीने जलआधारित वाहतुकीचा अवलंब करत आहेत. २०३० मध्ये बंदरे, जहाजबांधणी आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये एकूण ३-३.५ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची योजना आहे.

जहाजबांधणीला चालना देण्यासाठी आणि सागरी परिसंस्थांना पुनरुज्जीवित करण्यासाठी अलिकडेच जाहीर केलेल्या ६९ हजार ७२५ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक पॅकेजसह इंडिया टू कॉन्टिनेंटल वर्ल्डवाईड त्याच्या विशाल किनाऱ्याचा वापर करून स्थापनेसाठी एक धोरणात्मक मार्ग तयार करत आहे. लक्षित वाटप आणि धोरणात्मक उपक्रम एकूण दृष्टिकोनाशी सहज जोडलेले आहेत. त्यामुळे प्रस्तावित गुंतवणूक यशस्वी होते. प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. सागरी विकास निधी (एमडीएफ) भारताच्या नेव्हिगेशनल क्षमता आणि जहाजबांधणी क्षमतेच्या विस्तारासाठी दीर्घकालीन वित्तपुरवठा करेल. याव्यतिरिक्त, २४ हजार ७३६ कोटी रुपयांच्या खर्चासह सुधारित जहाज बांधणी वित्तीय साहाय्य योजना (एसबीएफएएस) देशांतर्गत खर्चाशी संबंधित तोटे दूर करेल. १९,९८९ कोटी रुपयांच्या खर्चासह, जहाज बांधणी विकास योजना (एसबीडीएस) ग्रीनफील्ड क्लस्टर्स, यार्डचा विस्तार आणि जोखीम कव्हरेजला प्रोत्साहन देते. याव्यतिरिक्त, विशाखापट्टणममध्ये ३०५ कोटी रुपये खर्चून बांधलेले 'इंडियन शिप टेक्नॉलॉजी सेंटर' (आयएसटीसी) हे जहाज डिझाईन, संशोधन आणि विकास, अभियांत्रिकी आणि कौशल्य विकासाचे राष्ट्रीय केंद्र आहे.

ईशान्य भारतातील आंतरदेशीय जलमार्ग पायाभूत सुविधांच्या विकासात एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्यात आली आहे, जी देशाच्या नदी नेटवर्कद्वारे वाहतूक आणि व्यापाराला महत्त्वपूर्ण चालना देते. या गुंतवणुकीपैकी सुमारे तीनशे कोटी रुपयांचे प्रकल्प आधीच पूर्ण झाले आहेत तर उर्वरित प्रकल्प अद्याप पूर्ण झालेले नाहीत. त्यात कनेक्टिव्हिटी आणि प्रादेशिक व्यापार वाढवणे समाविष्ट आहे. या प्रदेशात मोठ्या प्रमाणात पर्यटन सुरू करण्याची तयारी सुरू आहे. हावडा येथील हुगळी कोचीन शिपयार्डमध्ये २५० कोटी रुपयांच्या एकत्रित गुंतवणुकीसह दोन लक्झरी क्रूझ जहाजे बांधली जात आहेत. हे जहाज ब्रह्मपुत्रा नदीतून प्रवास करेल. सरकारच्या 'क्रूझ इंडिया मिशन'अंतर्गत आसामच्या नदी पर्यटनाच्या लॅण्डस्केपमध्ये ते बदल घडवून आणील, अशी अपेक्षा आहे. भारताला 'सागरमाला प्रकल्प' हा 'समुद्री भारत व्हिजन २०३०' आणि 'समुद्री अमृतकाल व्हिजन'चा एक प्रमुख आधारस्तंभ आहे. हा कार्यक्रम लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे, व्यापार कार्यक्षमता वाढवणे आणि हरित वाहतूक नेटवर्कद्वारे रोजगार निर्माण करणे यावर केंद्रित आहे. याअंतर्गत, २०३५ पर्यंत ५.८ लाख कोटी रुपयांचे ८४० प्रकल्प राबवले जातील. त्यापैकी १.४१ लाख कोटी रुपयांचे २७२ प्रकल्प पूर्ण झाले आहेत.भारताचे सागरी क्षेत्र एका निर्णायक दशकात प्रवेश करत आहे. तिथे नवीन कायदे, मोठे प्रकल्प आणि जागतिक गुंतवणूक महत्त्वाकांक्षा 'सागरी भारत व्हिजन, २०३०' ला आकार देत आहेत. हरित तंत्रज्ञान आणि डिजिटल नवोपक्रमावर भर देऊन भारत केवळ त्याच्या व्यावसायिक मागण्या पूर्ण करण्यासाठीच नाही, तर सागरी क्षेत्रात एक नेता म्हणून उदयाला येण्यासाठीही सज्ज होत आहे. हे लक्षात घेऊन 'सागरी अमृतकाल व्हिजन, २०४७' तयार केले जात आहे. तो भारताच्या सागरी पुनरुत्थानाचा दीर्घकालीन रोडमॅप आहे. त्यात बंदरे, किनारी नौहरगोहन निर्माण यांचा समावेश आहे. 'हरित नेव्हिगेशन' उपक्रमांसाठी ८० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राखून ठेवण्यात आली आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

**विजय निचकवडे**

# विक्रमादित्य दामले...

आम्ही म्हणतो नाटकं करू नकोस! पण, ते नाटकं करूनच मोठे झाले. त्यांच्या नाटकांनी मराठी रंगभूमीला वेगळी उंची आणि सन्मान मिळवून दिला. मराठी रंगभूमीची गत चार दशकांपासून सेवा करताना 'मला सांगा सुख म्हणजे नक्की काय असतं?' हे प्रत्येक मराठी माणसाला गुणगुणण्यास भाग पाडणारा व्यासंगी म्हणजे प्रशांत दामले! मराठी रंगभूमीवर सर्वाधिक नाट्य प्रयोगांचा विक्रम साकारणारा हा अष्टपैलू कलावंत १६ नोव्हेंबरच्या प्रयोगानंतर 'विक्रमादित्य' होईल अन् मराठी रंगभूमीचा, नाट्यसृष्टीचा अभिमानच ठरेल.

आमच्या लेखी 'नाटकं' करणे म्हणजे जरा वेगळं आहे. पण काही नाटकं अशी असतात, जी स्वतःसोबत त्या क्षेत्रालाही समृद्ध करतात. मराठी रंगभूमी आणि नाट्यसृष्टीच्या इतिहासात गत चार दशके म्हणजेच जवळपास ४२ वर्षांपासून सेवा देताना अनेक आघाड्यांवर परिस्थितीचा सामना करीत स्वतःला सिद्ध करणारा कलावंत प्रशांत दामले. १६ नोव्हेंबर रोजी पुणे येथे आयोजित नाट्य प्रयोग हा प्रशांत दामले यांच्या आयुष्यातील १३,३३३ वा आहे. हाच प्रयोग त्यांना मराठी रंगभूमीवर सर्वाधिक नाट्यप्रयोग करणारा कलावंत म्हणून 'विक्रमादित्य' करणारा असेल. हा विश्व विक्रमी प्रयोग म्हणजे मराठी रंगभूमीला बहुमान मिळवून देणारा असाच म्हणावा लागेल. एकीकडे मराठी चित्रपटसृष्टी असो की नाट्यक्षेत्र, दोन्ही बाबतीत फारशी सकारात्मकता दिसत नसताना आपल्या कलेच्या, सहजसुंदर अभिनयाच्या आणि विनोदी शैलीच्या जोरावर रंगभूमी समृद्ध करण्याचे काम प्रशांत दामले यांनी केले. मराठी रंगभूमी, चित्रपट, मालिकांमध्ये आपल्या अभिनयाची छाप त्यांनी पाडली. २७ हून अधिक नाटकांमध्ये मुख्य भूमिकेत असलेला हा कलावंत कधी मराठी प्रेक्षकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवून गेला कळलेच नाही. १९८३ साली नाट्य क्षेत्रात पदार्पण केल्यानंतर एकाहून एक अजरामर नाटकांची मेजवानी देणारा हा कलावंत स्वतःवर विश्वास ठेवून आयुष्याची भक्कम गोळा बेरीज करीत पुढे जात राहिला.



मराठी रंगभूमीला प्रभाकर पणशीकर, काशिनाथ घाणेकर, रमेश देव, सतीश दुभाषी अशा प्रतिभावंतांचा वारसा आहे. तो जपण्याचे काम आपल्या सहज अभिनयातून प्रशांत दामले यांनी केले, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. एखादा कलावंत स्वतःच्या मर्यादा आखून ठेवतो; मात्र डेली सोपसारख्या उपक्रमातून महाराष्ट्रातील घराघरात वहिनींचे लाडके झालेले भाऊजीही काही कमी नाहीत.

२७ हून अधिक नाटकांमधून प्रमुख भूमिका करताना नाट्यसृष्टी गाजविणाऱ्या या कलावंताने कारकीर्दीतील १२,५०० वा प्रयोग केला तो, 'एका लग्नाची गोष्टी' नाटकाचा. याच नाटकातील 'मला सांगा सुख म्हणजे नक्की काय असतं?' या गाण्याने महाराष्ट्राला, मराठी प्रेक्षकाला वेड लावले. कदाचित तेव्हापासून आमच्या सारखा प्रेक्षक असलेला मराठी माणूस प्रशांत दामले या नावात आपलं सुख शोधू लागला. ६ नोव्हेंबर २०२२ मध्ये रोजी हा १२,५०० प्रयोगांचा टप्पा गाठला. २०२४ पर्यंत विविध नाटकांचे १३,२१० प्रयोग सादर करून नाट्यप्रेमींची भूक भागविणारा हा कलावंत आता विक्रमादित्य होतो आहे. १६ नोव्हेंबर रोजी पुण्यात होणारा त्यांचा प्रयोग १३,३३३ वा आणि नाट्यसृष्टीत विश्वविक्रमाची नोंद करणारा आहे. मराठी रंगभूमीला लाभलेला या व्यासंगी कलावंताने केलेली रंगभूमीची सेवा नक्कीच रंगभूमीसाठी मोलाची ठरावी. निरागस भाव, साधेपणा आणि आपुलकी अशा मिश्रणातून तयार झालेल्या या कलावंताने आपल्या प्रतिभेच्या जोरावर मराठी नाट्यसृष्टीला समृद्ध केले हे तेवढेच खरे! विक्रमादित्य होत असताना प्रेक्षकांशी असलेलं आपुलकीचं नातं मात्र तेवढ्याच आत्मीयतेने हा व्यासंगी जपून आहे. एकीकडे हिंदी चित्रपटसृष्टीतील कलावंतांना आम्ही डोक्यावर घेऊन नाचत असताना मराठी बाणा आणि नाट्य संस्कृती जपणाऱ्या या बहुआयामी कलावंताचा अभिमान बाळगलाच गेला पाहिजे. आजही ग्रामीण भागातील नाट्य संस्कृती अशाच कलावंतांचा आदर्श पुढे ठेवून अखंडपणे जपली जात आहे. कदाचित प्रशांत दामले यांना विक्रमादित्य करणारा त्यांच्या आयुष्यातील टप्पा नाट्य संस्कृतीशी नाळ जुळलेल्या अनेकांसाठी प्रेरणा आणि ऊर्जा देणारा असेल. शेवटी प्रशांत दामले या नावातच तर दर्दी प्रेक्षकांचे 'सुख' दडलयं ना!

९७६३७१३४१७

---

## आजचे संघगीत-४०

बुधवार, १२ नोव्हेंबर २०२५

### यशाने दुमदुमवू त्रिभुवने

यशाने दुमदुमवू त्रिभुवने ॥धृ.॥

सकल भेद भारती मिटावे अभिमाने हे राष्ट्र उठावे
आकांक्षांनी अशा आमुची संचरलेली मने ॥१॥

कर्तृत्वाच्या विश्वासावर सदैव आम्ही राहू निर्भर
नैराश्याचे ऐकु न येइल यापुढती तुणतुणे ॥२॥

मन का दुबळे उदास व्हाया? लोह असे का मन गंजाया?
का भीषण त्या मुठीत सोने ठरते हिणकस उणे? ॥३॥

वाळूवरती मीन तडफडे तसेच अमुचे जीवन उघडे
ध्येयसागरी विहरू अथवा क्षणी संपवू जिणे ॥४॥

संकल्पाच्या सिद्धीवाचून थांबू आम्ही एकहि न क्षण
नेत्याच्या त्या अधीन केवळ अमुची ही जीवने ॥५॥

धीर वृत्तिचा उंच हिमाचल भीषणतेतही निर्भय निश्चल
नेता ऐसा मिळे अम्हाला काय असे मग उणे ॥६॥

---

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता - श्रद्धात्रेयविभाग योग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्भगवद्गीतेच्या १७ व्या अध्यायाला श्रद्धात्रेयविभाग योग म्हणतात. या अध्यायात भगवंतांनी अत्यंत सरळ आणि सोप्या शब्दांत 'श्रद्धामयोयं पुरुष:' म्हणजे श्रद्धेनुसार त्याच्या जीवनाचे मार्गक्रमण होत असते. या अध्यायानुसार श्रद्धेचे सात्त्विक श्रद्धा, राजसिक श्रद्धा आणि तामसिक श्रद्धा असे तीन विभाग पाडल्यामुळे श्रद्धात्रेयविभाग म्हटले आहे. आपल्या अंगी जशी श्रद्धा असेल त्यानुसारच अन्न यज्ञ, तप आणि दान यांचेही सात्त्विक, राजसिक आणि तामसिक असे तीन प्रकार आपल्यात असतात, असेही भगवान स्पष्ट करतात. सर्वांत प्रथम श्रद्धेबाबत पाहू. तिन्ही श्रद्धेत सात्त्विक श्रद्धा सर्वश्रेष्ठ असून या श्रद्धेसाठीच आपला कायम प्रयत्न असावा. मागील अध्यायात 'तस्माच्छास्त्रम् प्रमाणं' म्हणजे शास्त्राला प्रमाण मानून कर्म करावे, हे भगवंताने सांगितले. त्यावर या अध्यायात शंका येऊन अर्जुनाने प्रश्न केला.

अर्जुन उवाच- 'ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः ।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः ॥'

हे भगवंता, जे लोक श्रद्धेने तुझी भक्ती करतात, पण अज्ञानामुळे ती भक्ती शास्त्राला धरून नसेल तर त्यांची श्रद्धा सात्त्विक, राजसिक की तामसिक असेल?

'त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ।
सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां श्रृणु ॥'

मनुष्यात स्वभावतः तीन भक्ती असतात; मनुष्याच्या ठायी श्रद्धादेखील त्रिविध असते. ज्याची जशी श्रद्धा तो तसा बनतो. या श्रद्धा कशा ओळखाव्यात?

'यजन्ते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ।
प्रेतान्भूतगणांश्चान्ये जयन्ते तामसा जनाः ॥'

जे लोक देवाला भजतात त्यांच्यात सात्त्विक श्रद्धा असते. जे लोक यक्ष किंवा राक्षसांची पूजा करतात ते राजसिक श्रद्धेने भरलेले असतात. ज्यांच्यात तामसिक श्रद्धा आहे ते भूत प्रेताचे पूजन करतात. भगवान म्हणतात- अर्जुना! ज्यांच्यात दंभ आणि अहंकार आहे, कामबळ आणि रागबळ अधिक आहे असे जे मूढमती लोक आहेत. असे मूढमती शास्त्रविधीकडे दुर्लक्ष करून कठोर तप करतात. ते आसुरीगुण संपन्न असतात. जशा श्रद्धा तीन प्रकारच्या त्या श्रद्धांना अनुसरूनच त्यांना भोजन, यज्ञ, तप आणि दान करण्याची इच्छा होते, हे लक्षात ठेवले पाहिजे. आपण सात्त्विक भोजन, सात्त्विक यज्ञ, सात्त्विक तप आणि सात्त्विक दान करावे. आता आपण यातील एकेकाबद्दल माहिती पाहू. सर्वांत प्रथम अन्नाचा विचार करू.



त्यातील सात्त्विक अन्न म्हणजे जे-

'आयुः सत्त्वबलारोग्य सुखप्रीतिविवर्धनाः ।
रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥'

सात्त्विक अन्न आपले आयुष्य, बुद्धी, बल, आरोग्य, प्रीती आणि सुख वर्धन करते. असे अन्न स्निग्ध, रसाळ, स्थिर पदार्थ होय. अन्नाचा दुसरा प्रकार म्हणजे तामसिक अन्न.

'कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ।
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥'

राजसिक अन्न म्हणजे कडू, आंबट, खारट, अतिउष्ण, तीक्ष्ण, रुक्ष, दाहकारक ज्यातून दुःख-शोक प्राप्त होतो असे अन्न. तामसिक अन्न कोणते हे भगवंत सांगतात-

'यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥'

तामसिक अन्न म्हणजे अर्धवट शिजलेले, रसहीन, दुर्गंधी, शिळे, उष्टे आणि अपवित्र अन्न. यज्ञाबद्दल विचार भगवंत मांडतात. यज्ञाचेही तीन प्रकार आहेत.

'अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ।
यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विकः ॥'

फळाची अपेक्षा न ठेवता केला जाणारा यज्ञ म्हणजे सात्त्विक यज्ञ.

'अभिसन्धाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत् ।
इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ॥'

फळाची अपेक्षा ठेवून दांभिक वृत्तीने केलेला यज्ञ म्हणजे राजसिक यज्ञ होय.

'विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम्म् ।श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥'

शास्त्रविधीरहित, अन्नदानरहित, मंत्ररहित, श्रद्धारहित असलेला यज्ञ म्हणजे तामस यज्ञ होय. कायिक, वाचिक आणि मानसिक हे तप सांगून भगवंत म्हणतात-

'श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः।
अफलाकाङ्क्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ॥'

ज्या तपात फळाची इच्छा नसते. जे तप निष्काम योगी पुरुषाकडून अत्यंतिक श्रद्धेने केले जाते त्या तपाला सात्त्विक तप म्हणतात.

'सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत् ।
क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥'

जे तप आपल्याला मानपान मिळावा, सत्कार व्हावा, पूजा व्हावी अशा दांभिक हेतूने केले जाते त्याला राजसिक तप म्हणतात.

'मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः ।
परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥'

जे तप अत्यंत मूर्खपणे, स्वतःला त्रास, पीडा देऊन, दुसऱ्याचे वाईट करण्याच्या हेतूने केले जाते ते तप म्हणजे तामसिक तप होय. आता दानाबद्दल विचार मांडला आहे. दान देणे हा आपला संस्कार आहे.

'दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम्'

यामध्ये जे दान कर्तव्य भाव म्हणून केले जाते, प्रति उपकाराची अपेक्षा न ठेवता, सत्पात्री पुरुषाला दिलेले दान हे सात्त्विक दान आहे.

'यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः।
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ॥'

जे दान प्रत्युपकाराची इच्छा ठेवून, काही परतफेडीची अपेक्षा ठेवून क्लेशपूर्वक दिलेले दान हे राजसिक दान आहे.

'अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते । असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥'

जे दान अयोग्य स्थळ-काळ असताना, अपात्र पुरुषांना, तिरस्कार करून दिले जाते त्या दानाला तामसिक दान म्हणतात. भगवान म्हणतात की-

'ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः । ब्रह्मस्वरूप ॐ तत् सत् ॥'

या तीन स्वरूपात आहे. अर्जुना! ज्ञानी मनुष्य आपल्या यज्ञ तप दानादी क्रिया ॐ चा उच्चार करून करतात. मुमुक्षु याच क्रिया तत् उच्चाराने तर साधुभाव निर्माण झालेले, परमेश्वर प्राप्तीसाठी सत्ने सुरुवात करतात.

'अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥'

हे पार्था! श्रद्धेशिवाय केलेले हवन, दिलेले दान, केलेले तप आणि कर्म हे असत् असतात. या अध्यायात तीन प्रकारच्या श्रद्धेचा सांगोपांग विचार मांडला म्हणून हा श्रद्धात्रेयविभाग योग होय.

९८२२२६२७३५

---

### वाढते ध्वनिप्रदूषण

आपल्या देशात रस्त्यावरील वाहनांच्या कर्णकर्कशतेवर काहीच इलाज नाही. बालके, वृद्ध, ऋग्ण यांच्या त्रासाचा वाहनचालकच काय शासनसुद्धा विचार करत नाही. ऑटोसारखे तीनचाकी वाहनही ट्रकसारखे कर्णकर्कश हॉर्न वाजवतात. रस्त्यावर विनाकारणच खड्डा दिसला तरी हॉर्न मारतात. त्यांचे बोट हॉर्नवर कायमचे तत्पर असते. आजकाल डीजेचे नवीन फॅड लग्नसमारंभात आलेले आहे. आनंदात मिठाचा खडा टाकल्यासारखे ते ज्येष्ठांना वाटते. कर्णपटल व हृदयाला धक्का पोहोचवणारे डीजे समाज व सरकार कसे काय सहन करते, हे कोडेच आहे. महाराष्ट्रात काही शहरात डीजेला बंदी आहे, पण तरी काही आंबटशौकी ते समारंभाला पावित्र्य देते, असे समजतात. तिसरा त्रासदायक व आरोग्याला धोकादायक शौक म्हणजे दिवाळी व लग्नसमारंभात कानठळ्या बसवणारे म्हणजे फटाके. शहनाई व सुमधूर वाद्यवृंदापेक्षा फटाक्यांना एवढे महत्त्व का? हे न सुटणारे कोडे आहे. शासनाने अशा घातक प्रथांवर ताबडतोब बंदी घालून नियम तोडणाऱ्यांना जबरदस्त दंड करायला पाहिजे.

**गणेश ज. हजारे** /८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

### ज्येष्ठ नागरिकांची सामाजिक क्षेत्रात सक्रियता

भारतात ज्येष्ठ नागरिकांची वाढती लोकसंख्या हा चिंतेचा विषय झाला आहे. अन्य देशांच्या तुलनेत भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या सर्वाधिक आहे. एका सर्वेक्षणानुसार भारतातील १४२ कोटी लोकसंख्येत ज्येष्ठ नागरिकांची संख्या जवळपास १५ कोटी आहे. पुढील २५ वर्षांत ही संख्या ३० कोटीपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकीकडे ही स्थिती असली तरी गेल्या काही वर्षांत सामाजिक कार्यात ज्येष्ठ नागरिकांची सहभागिता वाढलेली अनुभवास येत आहे.

नोकरीतून अथवा खाजगी व्यवसायातून निवृत्त झाल्यानंतर पुढे काय हा प्रश्न उपस्थित होत असे. घरच्या चार भिंतीच्या आत बसून वेळ घालविताना मानसिक स्वास्थ्य बिघडत असे. परिवारात आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. पण गेल्या काही वर्षांत यात आमूलाग्र बदल होताना दिसतो. समाजात अनेक उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यात ज्येष्ठ नागरिकांची सक्रियता वाढत चालली असल्याचे दिसून येत आहे. बहुसंख्य ज्येष्ठ मंडळी तन, मन, धनाने सामाजिक कार्यात गुंतले आहेत. ज्येष्ठ नागरिकांची ही सक्रियता बघून तरुण वर्ग देखील सामाजिक कार्यात जिद्दीने भाग घेत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या पृष्ठभूमीवर पंचसूत्री सोबत घेऊन जनआंदोलन राबविण्याचे आवाहन केले आहे. पर्यावरण, सामाजिक समरसता, स्वदेशी, कुटुंब प्रबोधन आणि नागरी कर्तव्य ही पंचसूत्री देशाचा विकास घडवू शकते असा विश्वास वाटत असल्यामुळे देशात ठिकठिकाणी वरील विषयांवर विस्तृत चर्चा होत असून त्यात ज्येष्ठ नागरिकांची सक्रियता मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. या मंथनातून उद्याचा भारत साकार होणार आहे. ज्या रामराज्याची संकल्पना आम्ही मांडतो ते रामराज्य उदयास येण्यास वेळ लागणार नाही या आत्मविश्वासाने ज्येष्ठ नागरिक आणि त्यांच्या पावलावर पाऊल टाकणारा तरुण वर्ग सामाजिक कार्यात अग्रेसर होताना दिसतो. त्यांचा हा उत्साह द्विगुणित व्हावा ही अपेक्षा आहे. त्यासाठी परिवार आणि समाजाला सकारात्मक भूमिका घ्यावी लागेल जेणेकरून सकारात्मक परिणाम दिसून येतील.

'देश हमें देता है सबकुछ, हम भी कुछ देना सिखें.' समय दान करणे ही काळाची गरज आहे. हे ओळखून ज्येष्ठ नागरिक सामाजिक क्षेत्रात सक्रिय होत आहेत. अशा सर्व ज्येष्ठ नागरिकांना आणि तरुण वर्गाला मानाचा मुजरा.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## दिल्लीच्या स्फोटामुळे श्री स्वामी समर्थ देवस्थानसह सार्वजनिक ठिकाणी पोलीस बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.११ नोव्हेंबर -**



दिल्लीतील लाल किल्लाजवळील मेट्रो स्टेशनजवळ झालेल्या एका भीषण स्फोटानंतर अक्कलकोट पोलिसांनी तातडीने आज शहरातील बस स्टॅन्ड, श्री सावमी सम र्थ महाराज देवास्थान,अन्न छत्र परिसर सह शहरात गर्दीच्या ठिकाणी डॉग स्कॉड व बीडीडीएस पथकाने चेकिंग केली असल्यांची माहिती पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांनी दिली.

धार्मिक स्थळे आणि इतर सार्वजनिक ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. संवेदनशील भागांमध्ये पेट्रोलिंग आणि नाकाबंदी तीव्र करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांनी सर्व प्रमुख ठिकाणे, धार्मिक स्थळे, बाजारपेठा आणि गर्दीच्या ठिकाणी कठोर पाळत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सोशल मीडियावर पसरणाऱ्या अफवांवर विशेष लक्ष ठेवण्यास सांगण्यात आले आहे.कर्नाटक सीमाभागात, नाकेबंदीसह पोलीस गस्त वाढवण्यात आली आहे.गर्दीच्या ठिकाणी पोलीस चेकिंग मोहीम राबवत आहेत.श्री स्वामी महाराज देवस्थान परिसर व बस स्थानके, आणि बाजारपेठांमध्ये सुरक्षा वाढवण्यात आला आहे.

# ‘सिध्देश्वर’ यंदाही चांगला दर देणार

## मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी : गळीत हंगाम शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**



शासनाने कारखान्यास २०० कोटींच्या कर्जास हमी दिली असून हा प्रस्ताव आता राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी) कडे गेला आहे. ही बाब दिलासादायक असल्याचे सांगत चालू गाळप हंगामातही कारखाना चांगला दर देईल असे सुतोवाच कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी केले.

कुमठे येथील श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचा ५३ व्या गाळप हंगाम शुभारंभ काडादी यांच्या हस्ते झाला. यावेळी ऊस भरलेल्या पहिल्या बैलगाडी, ट्रॅक्टर व ट्रकचे तसेच वजनकाट्याचे पूजन करण्यात आले. श्री. काडादी यांनी साखर उद्योगासमोरील अडचणी, गतहंगामात कमी झालेले गाळप आणि चालू हंगामातील ऊस गाळपाच्या नियोजनाचा आढावा घेतला. कार्यकारी संचालक समीर सलगर यांनी स्वागतपर भाषण केले. उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते यांनीही मनोगत व्यक्त केले.

कारखान्याचे अध्यक्ष अण्णाराज उर्फ पुष्पराज काडादी, संचालक गुरुराज माळगे, शिवशंकर बिराजदार, सुरेश झळकी, राजशेखर पाटील, मल्लिकार्जुन बिराजदार, विद्यासागर मुलगे, अरुण लातुरे, सिध्दाराम व्हनमाने, शिवानंद बगले, अशोक पाटील, शंकर पाटील, काशीनाथ कोडते, हरिश्चंद्र आवताडे, कारखान्याचे माजी संचालक अण्णाराव याबाजी, बाळासाहेब बिराजदार, अण्णाराव भोपळे, सुभाष पाटील, गदगेप्पा कोरवार, अशोक देवकते, अंबणांप्पा भंगे, श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे उपाध्यक्ष सिध्देश्वर बमणी, सचिव नीलकंठप्पा कोनापुरे, ॲड. आर. एस. पाटील, काशीनाथ दर्गोपाटील, मल्लिकार्जुन कळके, रतन रिक्के, पशुपती माशाळ, भीमाशंकर पटणे, शरणराज काडादी, बसवराज माशाळे, काशीनाथ ढोले, ॲड. किरण कनाळे, राजशेखर भरले, विजयकुमार बिराजदार, लक्ष्मण झळकी, अनिल परमशेट्टी, विलास पाटील (कुरुल), रावसाहेब व्हनमाने, मल्लिकार्जुन गुरव, कारखान्याचे सभासद, सर्व अधिकारी, कर्मचारी, उपस्थित होते. सिध्दराया बबलेश्वर यांनी सूत्रसंचालन केले.संचालक महादेव जम्मा यांनी आभार मानले.



भाजपचा शरद पवार राष्ट्रवादीला दे धक्का...

# प्रथमेश कोठे भाजपमध्ये दाखल

### प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ नोव्हेंबर-**

सोलापुरात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला धक्का बसला असून प्रथमेश कोठे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश केला आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे व आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई प्रदेश कार्यालयात हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी भाजपचा शेला घालून सर्वांचे स्वागत केले.

आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर तात्काळ पक्षीय राजकारण बदलत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रथमेश कोठे यांच्या भाजप प्रवेशानंतर शहरातील राजकारणाची समीकरणे आणखी बदलतील. स्व. महेश कोठे यांच्या गटाचा प्रथमेश कोठे यांच्या नेतृत्वात भाजप प्रवेश झाल्याने भाजपची ताकद शहरात वाढली आहे. स्थायी समितीचे माजी सभापती विनायक कोंड्याल, माजी नगरसेविका कुमुद अंकाराम, माजी नगरसेवक विठ्ठल कोटा, माजी नगरसेवक शशिकांत कैंची, जोशी समाज शहर अध्यक्ष युवराज सरवदे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष अक्षय वाकसे, राष्ट्रवादी युवकचे शहर उत्तर सरचिटणीस तुषार पवार, संतोष सोमा, आकाश भोसले आदींचा यावेळी भाजपा प्रवेश संपन्न झाला.

# ‘स्प्रिंट फोर सीई महाराष्ट्र’ पूर आपत्कालीन प्रकल्पाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**



इंटरनॅशनल प्लॅन्ड पेरेंटहूड फेडरेशन व ऑस्ट्रेलियन एड यांच्याकडून फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेला स्प्रिंट फोर सी.इ. २०२५ महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रकल्प मंजूर करण्यात आला. जिल्हा आरोग्याअधिकारी डॉ. संतोष नवले व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया मुंबई मुख्यालयाचे स्प्रिंट फोर प्रकल्प व्यवस्थापक डॉ. अमित कीटूकले यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा सोलापूरचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान हे होते.

यावेळी जिल्हा अतिरिक्त जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. किशोरी घाडगे, डॉ. मोहन शेगर, डॉ. अविनाश खांडेकर, अक्कलकोट तालुका आरोग्याधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, मोहोळ तालुका आरोग्याधिकारी डॉ. अरुण पाथरूडकर, सिव्हिल हॉस्पिटल ए.आर.टी. विभाग वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस-वरेरकर, अक्कलकोट तालुका विस्तार अधिकारी महेश भोरे, एड्स नियंत्रण विभाग जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, राज्य कार्यकारणी सदस्य श्याम पाटील, फायनान्स ड्वहायझर सपना चिट्टे, डॉ. विजया महाजन, स्त्रीरोगतज्ञ डॉ. गौरी कहाते, डॉ. समन खान-तांबोळी, युवा प्रतिनिधी साक्षी सर्वगोड, ऐश्वर्या सावंत, डॉ. सोनाक्षी टेकाडे, विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभूते, विभागीय महिलाअध्यक्ष माया पाटील, जिल्हाध्यक्ष देशभूषण व्हसाळे, साईबाबा प्रशाला मुख्याध्यापक तिपन्ना कोळी आदी उपस्थिती होते.

डॉ. अमित किटुकले म्हणाले की, हा प्रकल्प नोव्हेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ पर्यंत कार्यरत राहणार असून सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ४८ पूरग्रस्तगावांमध्ये मिनिमम इनिशल सर्विस ऑफ पॅकेज अंतर्गत प्रजननक्षम जोडप्याना कुटुंब नियोजन साधणांचे वाटप, सुरक्षित गर्भपात, गरोदर व स्तनदा माता तपासणी, गर्भाशय व स्तानाची कॅन्सर तपासणी, एच.आय. व्ही तपासणी व समुपदेशन, लिंगभेद अन्याय व अत्याचार समुपदेशन व संदर्भ सेवा, वंधत्व निवारण, स्त्री पुरुष लैंगिक आजारावर उपचार, हिमोग्लोबिन, शुगर, व्ही. डी. आर. एल. तपासणी व सर्वसामान्य तपासणी व औषधोपचार आदी सेवा दिल्या जाणार आहेत.

अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी जिल्ह्यात उद्भवलेल्या पूर परिस्थितीत त्यांनी बचावकार्यात उल्लेखनीय कार्य केले. अपदामित्र व राज्यातील पहिली अपदामहिलासखी बचाव टीम तयार करून पूरपरस्थितीत अनेकांचे प्राण वाचविण्यात योगदान दिल्याबद्दल गौरव करण्यात आला. हा पुरस्कार सहाय्यक अधिकारी अर्चना बिसोई यांनी स्वीकारला तर मानपत्र वाचन रामचंद्र वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन कार्यक्रमअधिकारी वीरेंद्र परदेशी यांनी केले आभार प्रा. डॉ. विजया महाजन यांनी मानले.



# लोककला महोत्सवात २५० बालकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

बालरंगभूमी परिषदेतर्फे येथे एकदिवसीय ‘जल्लोष लोककलेचा’ या लोककला महोत्सवात ६ ते १५ वयोगटातील सुमारे २५० बालकलाकारांनी सहभाग घेतला.

महोत्सवात एकलगायन, एकल नृत्य, एकल वाद्य, समूह गायन, समूह नृत्य आदी लोककलाप्रकारांचे मुलांनी सादरीकरण केले. हरिभाई देवकरण प्रशालेच्या मुळे सभागृहात दीपप्रज्वलन आणि नटराजाच्या मूर्तीचे पूजनाने महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी उपनगरीय शाखेचे अध्यक्ष विजय साळुंखे, नाट्यपरिषदेचे शाखा अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार, मंगळवेढा शाखाध्यक्ष तेजस्विनी कदम आणि हरिभाई प्रशालेच्या प्राचार्या दीपा फाटक, बालरंगभूमी परिषदेचे कार्याध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, उपाध्यक्ष खंडू शिंदे व गोवर्धन कमटम, प्रमुख कार्यवाह अर्चना अडसूळ, सहकार्यवाह संजय सावंत, प्रशांत देशपांडे, मच्छिंद्र सपताळे आणि लोककला महोत्सव समिती प्रमुख सुभाष माने उपस्थित होते. अन्नपूर्णा साखरे, मिलिंद ठोंबरे, असलम मुलाणी, ज्योतिबा काटे, सुमित फुलमामडी, व्यंकटेश रंगम, अशोक किल्लेदार यांचे योगदान लाभले.

# धोकादायक वसाहतीतील सफाई कामगारांची सोय करणार

### महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**



बुधवार पेठेतील महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांची वसाहत जीर्ण आणि धोकादायक झाल्याने त्यांना तात्पुरत्या स्वरूपात राहण्याची सोय महापालिकेकडून करण्यात येणार आहे. जे कर्मचारी भाड्याने राहू इच्छितात त्यांना महापालिकेकडून नियमानुसार भाडे अदा करण्यात येईल, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

बुधवार पेठ येथील सफाई कामगारांच्या वसाहतीची इमारत धोकादायक झाल्याने येथील सुमारे ८० कर्मचाऱ्यांचे पुनर्वसन इतर ठिकाणी करून या ठिकाणी नवी इमारत उभारावी या संदर्भात आ. विजयकुमार देशमुख यांच्यासह अखिल भारतीय सफाई मजदूर युनियन पदाधिकारी यांची महापालिका आयुक्तांसमवेत महापालिकेत बैठक झाली. यावेळी युनियनच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्तांनी शिष्टमंडळास आश्वासन दिले. यावेळी अखिल भारतीय सफाई मजदूर युनियनचे प्रदेशाध्यक्ष बाली मंडेपू, माजी नगरसेवक अनंत जाधव, विनायक विटकर, अजित गायकवाड, शहराध्यक्ष अहोरन स्वाके, दशरथ अडाकुल, श्रीनिवास रामगल, व्यंकटेश देवनलगु , पांडुरंग रातोलू आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. तसेच अतिरिक्त आयुक्त विणा पवार, उपायुक्त आशिष लोकरे, नगररचना सहसंचालक मनीष भिष्णूरकर, नगर अभियंता सारिका अकुलवार, पीडब्ल्यूडीचे उपअभियंता श्रीकांत गायकवाड उपस्थित होते.

शनिवारी रात्री बुधवार पेठेतील सफाई कामगारांच्या वसाहतीमधील गॅलरी कोसळल्याची घटना घडली होती. या वसाहतीमध्ये चार बिल्डिंग आहेत. हे बिल्डिंग जीर्ण झाल्याने धोकादायक अवस्थेत आहेत. त्यामुळे या ठिकाणी नव्याने घरे बांधण्याची योजना महापालिकेकडून आखली जाणार आहे. दरम्यान सध्याच्या इमारती या धोकादायक असल्याने येथील सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियांना तात्पुरत्या स्वरूपात राहण्यासाठी महापालिकेने कुमठा नाका येथील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या घरांमध्ये राहण्याची सोय करावी, अशी मागणी अखिल भारतीय सफाई मजदूर युनियनच्यावतीने सोमवारी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी आयुक्त म्हणाले, कुमठा नाका येथील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या घरांमध्ये सफाई कामगारांची तात्पुरती राहण्याची सोय करण्यासाठी आवश्यक ऑडिट व मेंटेनन्स संदर्भात अहवाल मागून निर्णय घेणार असल्याचे सांगितले. जर कुमठा नाका येथील घरे धोकादायक असतील तर नजीकच्या खुल्या जागेत पत्राशेड उभारून निवाऱ्याची व्यवस्था करण्यात येईल. याशिवाय जे कर्मचारी खाजगी भाड्याच्या घरांमध्ये जाण्यास तयार असतील तर अशांना घरभाडे भत्ता देऊ, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले आहे, असे बाली मंडेपू यांनी सांगितले.

### महापालिकेने तातडीने पुनर्वसनाचा निर्णय घ्यावा : आ. देशमुख

शहरातील सफाई कामगारांची वसाहत जुनी झाल्याने धोकादायक बनले आहे. येथील इमारतीच्या जागी नवी इमारत बांधावी तेथील सफाई कामगारांचे इतरत्र पुनर्वसन करण्यात यावे अशी येथील युनियनची मागणी आहे. मात्र महापालिकेकडून तातडीने कार्यवाही झाली नाही. दरम्यान काल येथील गॅलरी कोसळली. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. कुटुंब बेघर झाले आहेत. त्या अठरा आणि इतर असे सर्व मिळून ८० कर्मचारी कुटुंबाचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे. या ठिकाणी नव्या इमारतीचा प्रस्ताव महत्त्वाचा आहे. या संदर्भात आयुक्तांशी चर्चा झाली. आयुक्तांनी आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे, असे आ. विजयकुमार देशमुख यांनी सांगितले.

## एका कुटुंबातील तिघांचा कालव्याच्या पाण्यात बुडून मृत्यू

**विजयपूर, दि. ११ नोव्हेंबर-**

एकाच कुटुंबातील बहीण, भाऊ आणि पुतण्याचा कालव्याच्या पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना मंगळवारी दुपारी शिरोळ रस्त्याजवळील आलमट्टी डाव्या कालव्यात घडली आहे. मृतांमध्ये बसम्मा चिन्नप्पा कोन्नूर (वय २०), तिचा भाऊ संतोष चिन्नप्पा कोन्नूर (वय १८) आणि पुतण्या रवी हनमंत कोन्नूर (वय १७) यांचा समावेश आहे. अग्निशमन दलाच्या शोधमोहीमेनंतर संतोषचा मृतदेह संध्याकाळी सापडला तर उर्वरित दोघांचा शोध सुरू आहे.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**जाहीर प्रसिध्दीकरण**

तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, स.नं. ८४/१ मौजे देगांव, उत्तर सोलापूर, सोलापूर येथील रस्ते, ड्रेनेज, दिवाबत्ती व ओपन स्पेस इ. ताब्यात घेणे कामी संबंधित लेआऊटधारक **श्री. प्रसन्न बाबासाहेब तानवडे** व इतर यांनी विनंती अर्ज केल्यावरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील १९४९ चे कलम २२३ व २२४ चे तरतुदीनुसार वरील लेआऊटमधील रस्ते, ड्रेनेज, दिवाबत्ती व ओपन स्पेस इ. सोलापूर महानगरपालिकेचे ताब्यात घेऊन ती सार्वजनिक म्हणून जाहिर करणेत येत आहे. तमाम नागरीकांचे तीस (३०) दिवसाचे आत सुचना व हरकती न आल्यास हे जाहिर प्रसिध्दीकरण अंतिम समजले जाईल.

ताब्यात घेणेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशील | आकार | |
|---|---|---|---|
| १ | रस्ते | ९७८९.३५ चौ.मी. | |
| २ | दिवाबत्ती | १) ७ मी.चे एकुण ५५ ऑक्टोगोनल चे विद्युत पोल (५५ सिंगल आर्म) | ७० W चे एकुण ५५ एलईडी स्ट्रीट लाईट फिटिंग |
| | | २) ७ मी. १८ ऑक्टोगोनल पोल (०७ डबल आर्म पोल) | ७० W चे एकुण ३६ एलईडी स्ट्रीट लाईट फिटिंग |
| ३ | ड्रेनेज | ३०० मीमी (आरसीसी) | ६१० रनिंग मीटर / २५ नग चेंबर्स |
| | | २०० मीमी (आरसीसी) | ११०० रनिंग मीटर / ४५ नग चेंबर्स |
| ४ | ओपन स्पेस | ६१४२.५४ चौ.मी. | |

सही/-
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर



## दूधनी नगरपालिका : म्हेत्रे बहीण-भावाचे अर्ज

**अक्कलकोट, दि. ११ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील दूधनी नगर पालिका नगराध्यक्ष पदासाठीदुसऱ्या दिवशी शिवसेना शिंदे गटाकडून प्रथमेश म्हेत्रे आणि शांभवी म्हेत्रे या बहीण भावाने उमेदवार अर्ज दाखल केले असून नगरसेवकपदासाठी एकही अर्ज दाखल झाला नाही. याशिवाय अक्कलकोट व मैंदर्गी येथे नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी एकही अर्ज दाखल झाला नाही. अक्कलकोट, मैंदर्गी व दूधनी नगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. अर्ज दाखल करण्याची पद्धत ऑनलाइन आहे. परंतु अनेक इच्छुक उमेदवारांनी ऑफलाइन पद्धत असावी, अशी इच्छा व्यक्त केली आहे. ऑनलाइन भरण्यासाठी गेल्यानंतर सर्व्हर डाऊन, वीज जाणे असे प्रकार सायबर कॅफेमध्ये दिसून येत आहेत. तसेच तेथे छोटी जागा असल्याने बराच काळ ताटकळत थांबावे लागते. या समस्या असल्याने ऑफलाइन पद्धत चांगली असल्याचे मत अनेक इच्छुकांनी व्यक्त केले. नामनिर्देशन ऑनलाइन पद्धतीने भरून पीठासन अधिकाऱ्याकडे सादर करायचा आहे. राजकीय पक्षाच्या उमेदवाराला दोन सूचक तर अपक्ष उमेदवाराला पाच सूचक असणे आवश्यक आहेत.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषत मौजे मानेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर व आसपासचे लोकांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे मानेगाव येथील जमीन गट नं. ५१६/३/ब/६ बिनशेती प्लॉट नं. ६ याचे क्षेत्रफळ १.८६.७१ आर यासी चतुसिमा पुर्वेस प्लॉट नं. ५ ची जागा, दक्षिणेस- रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. ७ ची जागा, उत्तरेस - गट नं. ५१६/३ पैकी जमिन.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह.

२) सदर प्लॉट मिथिल महादेव पंके यांच्या खरेदी मालकी वहिवाटीची आहे. त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी सदरचा प्लॉट विक्रीस काढला आहे. त्याची माहिती आमचे पक्षकारास झाल्याने उभयंतामध्ये खरेदी विक्रीचा व्यवहार झालेला आहे. इसारापोटी रक्कमही दिलेली आहे. सदरचा प्लॉट हा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाचा आहे. असा विश्वास व भरोसा दिलेला आहे. परंतु सदर प्लॉट संबंधाने कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी आमचे पक्षकार अथवा खालील नमुद पत्त्यावर लेखी हरकत १५ (पंधरा) दिवसांच्या आत नोंदवावी. अन्यथा आमचे पक्षकार सदर मुदतीनंतर कोणाची काही हरकत तक्रार नाही असे समजुन खरेदीखताचा दस्त नोंदवितील. कोणाची फसवणूक होऊ नये म्हणून हि जाहिर नोटीस दिली असे दि. १०/११/२०२५

ज्योती दादासाहेब काकडे
(खरेदी घेणार)

सही/-
**ज्योती दादासाहेब काकडे,**
रा. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
तर्फे ॲडव्होकेट
**श्री. संजयकुमार श्रीराम गुंड**
दिवाणी व फौजदारी न्यायालय बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९६०४१७०९१९/९१४६०४०९१९

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**परिशिष्ठ ‘अ’ - मिळकतीचे वर्णन** :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील दक्षिण कसबा पेठ येथील सिटी सर्व्हे नं. ६३०/१ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या गणेश अपार्टमेंट मधील

| सदनिका (फ्लॅट) नं | मजला | चटई क्षेत्र | फ्लॅट नं.१ ची चतु:सीमा | फ्लॅट नं. २ ची चतु:सीमा |
|---|---|---|---|---|
| १ | तळमजला | २२.०७ चौ.मी. | पुर्वेस : रस्ता | पुर्वेस : रस्ता |
| २ | तळमजला | २२.०७ चौ.मी. | पश्चिमेस : ओपन स्पेस | पश्चिमेस : ओपन स्पेस |
| | | | दक्षिणेस : श्री पुराणिक यांची जागा | दक्षिणेस : फ्लॅट नं. १ |
| | | | उत्तरेस : फ्लॅट नं. २ | उत्तरेस : सि.स.नं. ६३०/३ |

येणेप्रमाणे चतुसीमेतील वर्णनाचे ओनरशीप तत्त्वांवरील फ्लॅट जागा व आतील बांधकाम वगैरे इतर सर्व तद्ंगभूत वस्तूसह व कायम वहिवाटीचे इजमेंट हक्कासह आणि नळ नळाचे कनेक्शन व लाईट मीटर कंझुमरसह. तसेच सदर फ्लॅट जागा यास मिळणारे स्वतंत्रातील व घोषणापत्राप्रमाणे सामाईकातील प्रमाणित हक्क व अधिकारासह संपूर्ण फ्लॅट जागा.

वर नमुद परिशिष्ठ अ मधील नमुद संपूर्ण मिळकत ही श्री सुनिल पद्माकर दाते यांनी आमचे अशिल श्री. गौरव नागेश गोरे यांना कायम खूश खरेदी देण्याची ठरवून त्यापोटी इसाऱ्याची रक्कम देखील स्विकारलेली आहे. सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी श्री. सुनिल पद्माकर दाते यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तरी वर नमूद मिळकतीवर कोणतेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲण्ड लायसेन्स, बक्षीस, साठेखत, पोटगी, टाच, जप्ती, (Right Title Interest) या व इतर अन्य कोणत्याही स्वरूपाचे बोजा, हक्क व हितसंबंध कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७० दिवसांचे आत आम्हाकडे खालील नमूद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी. मुदतीत कोणाचेही तक्रार व हरकत न आल्यास सदरची संपूर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलावर व सदर संपूर्ण मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीद्वारे नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता. १२/११/२०२५

सही/-
**ॲड. सागर सुनिल मालप**
बी.एस.एल.एलएल.एम.,
२६/ब सिद्धीजीन हौसिंग सोसायटी,
मुरारजी पेठ, जुना पुना नाका जवळ,
सोलापूर- ४१३००२ मो. ९५४५५८००११.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि व सब डि सोलापूर येथील तालुका अक्कलकोट पैकी मौजे बंगेहळ्ळी येथील शेतजमीन गट नं.२७/१ हे.0.८१ शासन निर्णय प्राप्त असलेले एन/ए (बिनशेती) ले आऊट मंजूरी नकाशासहीत असलेले त्यांचे एकूण क्षेत्र ८१ आर इतके चौरस फुटाचे मिळकत असून, यामध्ये रहिवास परियोजनार्थासाठी संदर मिळकतीमधील प्लॉट नं. १ ते ४३ असे एकूण सर्व प्लांटींग ईश्वर नगर पार्ट-२ या नावानी ओळखले जाणारे असून त्याची चतुःसिमा नमुदप्रमाणे :-

येणेप्रमाणे वर नमुद वर्णन केलेली बिनशेती एन/ए प्लॉटींग (खुली जागा) केलेली जागा व तद्ंगभूत वस्तुसह व पुर्वापार चालत आलेले वहिवाटीचे हक्कांसह ही मिळकत श्री. विनोद आनंद जाधव, रा. रविवार पेठ, सोलापूर यांचेकडून दि.०६/०५/२०१२ रोजी खुश खरेदीने घेतलेली होती व आहे. तेव्हापासून प्रकाश कोडींबा शिंदे हे सदर मिळकतीचे मालक या नात्याने त्यांच्या कब्जेवहिवाटीत आहे व त्यांनी सदरची वर नमुद वर्णन केलेली आमचे अशिल यांना विक्री करण्याचे मान्य व कबूल करुन इसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे.

सबब, खरेदीपूर्व जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, बक्षीस, साठेखत, टाच, जप्ती इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचे हक्क व हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीसंबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्ततची नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ (सात) दिवसाच्या आत आम्हांस खालील नमूद पत्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी वैध हरकती नोंदवावेत मुदतीत कोणाचेही कसलेली तक्रार व हरकत न आल्यास सदरची मिळकत ही संपूर्ण निर्वेध निजोखमी व बिनाबोजाचे आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने ध्यावे.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. तारीख ११/११/२०२५

सही/-
**ॲड. चिस्ती यू.एस.**
बी.ए. एलएल.बी.
ऑफिस-जुना राजवाडाजवळ, फत्तेसिंग चौक,
ता. अक्कलकोट जि. सोलापूर
मो.नं. ७०२०५११४५६

## महत्त्वाचे

### कुमामोटो मास्टर्स ओपन पात्रता फेरीत नैशा पराभूत

**कुमामोटो (जपान) :** मंगळवारी येथे झालेल्या पात्रता फेरीत न्यूझीलंडच्या शौना लीकडून सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागल्याने



युवा भारतीय शटलर नैशा कौर भटोये कुमामोटो मास्टर्स जपान ओपनच्या मुख्य ड्रॉसाठी पात्र ठरू शकली नाही. सुपर ५०० स्पर्धेच्या महिला एकेरी पात्रता फेरीत १७ वर्षीय नैशाला तिच्या उच्च क्रमांकाच्या प्रतिस्पर्ध्याकडून १७-२१, १८-२१ असा ३२ मिनिटांत पराभव पत्करावा लागला. अशाप्रकारे, या स्पर्धेच्या महिला एकेरी स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व राहणार नाही. पुरुष एकेरीमध्ये, लक्ष्य सेन आणि एचएस प्रणॉय बुधवारी ४७५,००० डॉलर्सच्या बक्षीस रकमेच्या स्पर्धेत त्यांच्या मोहिमांना सुरुवात करतील.

### ऐतिहासिक पोल पोझिशननंतर अतिका मीर तिसऱ्या स्थानी

**अबू धाबी :** फॉर्म्युला वन अकादमीच्या सीओटीएफयूई कार्टिंग सीरिजच्या पहिल्या फेरीत ऐतिहासिक पोल पोझिशन मिळवून तरुण भारतीय रायडर अतिका मीर तिसऱ्या स्थानावर राहिली. ही फॉर्म्युला वनने त्यांच्या कार्यक्रमासाठी निवडलेली पहिली भारतीय रेसर आहे. चॅम्पियन्स ऑफ द फ्युचर अकादमी आंतरराष्ट्रीय मालिकेत आधीच सहभागी असलेल्या अतिकाची गेल्या महिन्यात फॉर्म्युला वन अकादमीने दोन फेरीच्या चॅम्पियनशिपसाठी निवड केली होती. अतिकाने प्रभावी कामगिरी केली. तिने पोल पोझिशन मिळवले आणि मिनी श्रेणीत हा पराक्रम करणारी जगातील पहिली महिला ठरली. ती पोडियमवर पोहोचण्यातही यशस्वी झाली. याप्रसंगी ती म्हणाली, हा आठवडा माझ्यासाठी खूप चांगला होता. मी पात्रता फेरीत पोल पोझिशन मिळवले. मला अंतिम फेरीत जिंकायचे होते पण शेवटी मी तिसऱ्या स्थानावर राहिले. येथून शिकलेल्या धड्यांसह मी माझी कामगिरी सुधारण्याचा प्रयत्न करेन.

### 'ग्लोबल व्हिलेज'ची गौरी पाटील राज्य तलवारबाजी स्पर्धेसाठी

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**



कै.ब.ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित बोरामणीतील ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल (सी.बी.एस.ई) इयत्ता नववीची विद्यार्थिनी गौरी विश्वपुत्र पाटील हिने पुणे विभागीय तलवारबएजी स्पर्धेत १७ वर्षांखालील गटात द्वितीय क्रमांक संपादिला. या कामगिरीवर तिची गारखेडा, छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. गौरीला क्रीडा शिक्षक रमेश दोडमनी व विनायक गोविंदे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व सचिवा संगिता शहा, उपाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी, प्राचार्या आसमा नदाफ, अधीक्षक म ल्लिनाथ जळकोटे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### सांगोल्याच्या आरोही सावंतची राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड

**सांगोला,दि.११ नोव्हेंबर -**



कराटे इंडिया ऑर्गनायझेशन या राष्ट्रीय संघटनेच्या मान्यतेने कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या आयोजनाने नाशिक येथे झालेल्या पश्चिम विभागीय कराटे स्पर्धेत सांगोला येथील वाघमारे कराटे क्लासची गेनशीरियो कराटे शाखेची खेळाडू आरोही सावंत हिने ५० किलो वरील गटात कुमीते प्रकारात रौप्य पदक संपादिले. या कामगिरीवर तिने दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत आपले स्थान पक्के केले. आरोहीला सुनील वाघमारे, श्रावणी वाघमारे, निर्जेद्र चौधरी यांचे मार्गदर्शन लाभत आहे. ती विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूल, सांगोला येथे इयत्ता सातवी मध्ये शिकत आहे.

### विराज गोडसेची महाराष्ट्र बास्केटबॉल संघात निवड

**अकलूज, दि. ११ नोव्हेंबर-**



शिवरत्न शिक्षण संस्था अकलूज संचलित शंकरराव मोहिते पाटील इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज शंकरनगर-अकलूज व शिवरत्न बास्केटबॉल अकॅडमीच्या विराज विकास गोडसे याची महाराष्ट्राच्या १७ वर्षांखालील बास्केटबॉल संघात निवड झाली. सातारा येथे ८ ते १० नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या स्पर्धेत तो भाग घेईल. त्याचे शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील, अध्यक्षा शितलदेवी धैर्यशिल मोहिते-पाटील आदींनी अभिनंदन केले.

# गिल, बुमराह, जयस्वालचा कसून सराव

### शुक्रवारपासून दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिली कसोटी



गोलंदाजीचा सराव करताना जसप्रीत बुमराह



ईडन गार्डन्स मैदानावर सराव सत्रादरम्यान भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल

**◆ कोलकाता, ११ नोव्हेंबर**

येथे शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यासाठी दोन्ही संघाचे खेळाडू दाखल झाले आहेत. मंगळवारी भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिलसह अन्य खेळाडूंनी कसून सराव केला. यावेळी प्रशिक्षक गौतम गंभीर उपस्थित होते. शुभमन गिलने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी नेटमध्ये सुमारे दीड तास सराव केला.

गेल्या महिन्यात आव्हानात्मक परिस्थितीत पाकिस्तानविरुद्ध दोन सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत राखल्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ आत्मविश्वासाने भरलेला आहे. गेल्या महिन्यात वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांमध्ये गिलने अर्धशतक आणि नाबाद शतक झळकावले होते, परंतु त्यानंतर मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये धावा काढण्यास तो संघर्ष करत आहे. ऑस्ट्रेलियामध्ये एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांमध्ये आठ डावांमध्ये तो एकही अर्धशतक झळकवू शकला नाही, त्याची सर्वोच्च धावसंख्या ४६ होती.

नेट प्रॅक्टिसपूर्वी, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि सहायक प्रशिक्षक सीतांशू कोटक गिलशी दीर्घ चर्चा करताना दिसले. नंतर गिल स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण सरावासाठी त्याच्या सहकाऱ्यांसोबत सहभागी झाला आणि नंतर यशस्वी जयस्वालसोबत नेटवर गेला.

यावेळी त्याने फिरकीपासून सुरुवात करून, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदरचा सामना केला. जलद गोलंदाजीच्या नेटमध्ये, गिलने प्रथम काही षटके जसप्रीत बुमराहचा सामना केला. त्यानंतर त्याने नितीश कुमार रेड्डी आणि काही स्थानिक क्लब गोलंदाजांचा सामना केला.

रणजी ट्रॉफीमध्ये राजस्थानसाठी ६७ आणि १५६ धावा करणाऱ्या जयस्वालनेही मोर्केल आणि थ्रोडाऊनचा सामना करताना बराच वेळ खेळपट्टीवर घालवला. तो यावेळी शांत आणि आत्मविश्वासपूर्ण दिसत होता. नेट्समध्ये लक्षणीय वेळ घालवणारा आणखी एक फलंदाज म्हणजे तामिळनाडूचा तरुण फलंदाज साई सुदर्शन. त्याने दक्षिण आफ्रिका अ विरुद्ध भारत अ संघासाठी दोन अनधिकृत कसोटी सामन्यांमध्ये ८४ धावा केल्या.

संघ व्यवस्थापन त्याला तिसऱ्या क्रमांकाचा फलंदाज म्हणून तयार करत आहे, परंतु तो अद्याप अपेक्षांनुसार खेळ सादर करू शकला नाही. ध्रुव जुरेलने दक्षिण आफ्रिका अ विरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात दोन्ही डावात शतके झळकावून भारतीय फलंदाजी क्रमात, तिसऱ्या क्रमांकाच्या स्थानासाठी आपला दावा मजबूत केला आहे.

सुदर्शनचे भारत अ संघातील सहकारी केएल राहुल, जुरेल, कुलदीप यादव आणि मोहम्मद सिराज या पर्यायी सराव सत्रात सहभागी झाले नाहीत, परंतु सुदर्शनला ब्रेक मिळाला नाही. वेगवान गोलंदाजांपैकी, फक्त बुमराह सरावासाठी आला आणि त्याने ऑफ स्टम्पला लक्ष्य करून सुमारे १५ मिनिटे गोलंदाजी केली. सुमारे तीन तासांच्या सरावानंतर, गंभीर, कोटक, मॉर्केल आणि गिल या संघाच्या थिंक टँकने मुख्य खेळपट्टीची पाहणी केली आणि त्यावर सविस्तर चर्चा केली. मॉर्केल आणि गिल यांनी क्युरेटर सुजन मुखर्जी यांच्याशी १५ मिनिटे चर्चा केली. दक्षिण आफ्रिकेकडून कागिसो रबाडा आणि मार्को जानसेन हे वेगवान गोलंदाजीची धुरा सांभाळतील, तर केशव महाराज, सायमन हार्मर आणि सेनुरन मुथुस्वामी या फिरकी त्रिकुटाने पाकिस्तानमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. (वृत्तसंस्था)



# अरिहंत स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये क्रीडा सप्ताहास सुरवात झाला. याचे उद्घाटन वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड सायन्सचे क्रीडा शिक्षक प्रा. राहुल हजारे यांच्या हस्ते झाले. यावेळी अंधारातून प्रकाशाकडे नेणारी , क्षुद्र विचारांवर मात करणारी, ऊर्जा निर्माण करणारी स्फूर्तिदायक मशाल पेटवण्यात आली.

पाहुण्यांचा परिचय अंबिका बडदाळ यांनी केला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजय पोन्नम यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांकडून शिस्तबद्ध संचलन करण्यात आले. प्रयत्नवादाचा व पराक्रमाचा तसेच गतिमानता, उच्चता व तेजस्विता यांचा संदेश देणारा क्रीडा ध्वज फडकविण्यात आला. यानंतर विद्यार्थिनींनी खेळावर आधारित बहारदार नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांनी चित्तथरारक कसरती करून टाळ्या मिळवल्या. इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांनी क्रीडाशिक्षक आकाश मिस्कीन यांच्या म ार्गदर्शनाखाली कबड्डी खेळाचे प्रात्यक्षिक करून क्रीडा स्पर्धेला सुरुवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फौजान अझहरी यांनी केले सुजाता कटके यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे संचालिका सुलक्षणा पोन्नम, . रामकृष्ण पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, पर्यवेक्षिका स्नेहा यादव, चन्नेश इंडी आदी उपस्थित होते.



# आमदार चषक बुद्धिबळ स्पर्धेस सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

आमदार चषक बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात देवदत्त पटवर्धन, सौरव शाहू, अभिजीत संगा हे चारपैकी चार गुण घेऊन आघाडीवर आहेत. १३ वर्षाखालील गटात नैतिक होटकर,श्रेयस कंदीकटला,आयुष्य जानगवळी, सुभान शेख हे खेळाडू चार पैकी चार गुण घेऊन आघाडीवर आहेत.

अक्कलकोटचे आमदार सचिन दादा कल्याण शेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त जगदीश मंगल कार्यालय येथे ही स्पर्धा सुरू झाली.

याचे उद्घान माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मराठा सेवा संघ प्रदेश अध्यक्ष प्रशांत पाटील, भाजपा मार्गदर्शक हनुमंत कुलकर्णी, नवनाथ कदम, वर्षा सर्व सेवा स्वयंरोजगार सहकारी संस्थेचे विकास कदम व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक हे उपस्थित होते. ही स्पर्धा संपन्न करण्याकरिता स्पर्धेचे प्रमुख पंच प्रशांत पिसे,इरान्ना जमादार,सचिन चव्हाण, सम्मेद हुल्ले,संस्कार भस्मे बिलाणीसिद्ध बिराजदार हे काम पाहत आहेत.

# भारतीय महिला संघाचा श्रीलंकेवर दणदणीत विजय

## दिव्यांगाची टी-२० क्रिकेट : सोलापूरची गंगा कदम सामनावीर

**नवी दिल्ली, दि. ११ नोव्हेंबर-**

दिव्यांग (अंध) महिलांच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेत भारतीय महिला संघाने श्रीलंकेचा १० गडी राखून दणदणीत पराभव करीत विजयी सलामी दिली. भारतीय संघाकडून प्रतिनिधित्व करणारी उपकर्णधार व सोलापूरची गंगा कदम ही या सामन्याची मानकरी ठरली. तिला १० हजार रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

नवी दिल्लीतील मॉडर्न स्कूलच्या मैदानावर मंगळवारी सुरू झालेल्या या स्पर्धेत नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंका संघाचा डाव भारताने केवळ १३.३ षटकांत ४१ धावांत गुंडाळला. यात गंगा कदमने १ एक षटकात एक धावा देत १ बळी टिपला. गंगाच्या प्रभावी क्षेत्ररक्षणामुळे श्रीलंकेचे पाच




गडी धावबाद झाले. विजयी लक्ष्य भारताने केवळ ३ षटकांत बिन बाद ४३ धावा करीत गाठले. सलामीच्या कर्णधार दिपीका व अनिता ठाकूर यांनी शानदार खेळी करीत संघाचा विजय सहज सुकर केला. दीपिकाने १४ चेंडूंत ४ चौकार ठोकीत २६ धावा केल्या. अनिताने ६ चेंडूत ३ चौकारांसह १५ धावा करीत तिला साथ दिली.

गंगा कदम ही सोलापूरचे प्रशिक्षक राजू शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली भैरूरतन दमाणी अंध शाळेतून घडली आहे. तिचे उद्योजक राजेश दमाणी, भैरुरतन दमाणी अंध शाळेचे सचिव संतोष भंडारी यांनी अभिनंदन केले.



# उमाबाई श्राविका विद्यालयाची विविध क्रीडा स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

येथील उमाबाई श्राविका विद्यालयाने शालेय शहर विविध क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांना क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्राविका संस्थेचे सचिव यतीन शहा, विश्वस्त देवई शहा, विश्वस्त करण शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, वरिष्ठ दिप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी :** शहर बॉल बॅडमिंटन १९ वर्षाखालील मुली तृतीय (अनिष्का टोणपे, ,विद्या कुर्ले,प्रणिता पवार, विशाखा गुमटे, ईश्वरी शिंदे, अपूर्वा शिंदे श्रेया इंगळे).१४ व १७ वर्षाखालील स्क्वॅश (अनुष्का केत, दिव्या कसबे व अलोक फाळके).१४ वर्षाखालील मुले ज्युदो, तायक्वांदो (जयेश माने प्रथम , रूद्र जगदाळे तृतीय). रोल बॉल १४ वर्षांखालील मुली तृतीय. १९ वर्षाखालील मुले तृतीय). राज्य बॉल बॅडमिंटन निवड (हर्षवर्धन पाटील, सुमित दळवी, संविधान मसलखांब). राज्य आट्यापाट्या निवड ( अनुष्का केत, प्रिया शिंदे)

# अक्कलकोटला कुस्ती स्पर्धेस सुरुवात

## स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ नोव्हेबर-**

जी.बी. घोडके विद्यालयातील मैदानावर छत्रपती शिवाजी महाराज कुस्ती संघाच्या वतीने कुस्तीचे मोठे मैदान भरविण्यात आले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मुख्यमंत्री सहायता निधी महाराष्ट्र यांचे प्रशासकीय सल्लागार दत्तात्रय विभूते, भरत मेकाले, प्रल्हाद काशीद, भारत गवळी, वसंतराव साखरे, गटविकास अधिकारी समाधान नागणे, प्रणव ढेकणे श्री क्षेत्र अक्कलकोटचे पै. महेश कुलकर्णी, सर्फराज शेख, प्रशांत शिंदे-साठे, रमेश हळसंगी, असद फुलारी नान्नजचे संभाजीराव देडे, ग्रामविकास अधिकारी बापू हक्के, संजय म ुळे, विश्वजित गवळी, श्रीकांत मुळे, महेश शिंगाडे, प्रवीण विभूते, दिपक अंधारे, प्रतापराव टेकाळे, तात्यासाहेब कादे, विनोद माने, शिवाजी गवळी, अशोक गवळी, मंजूर शेख, प्रज्वल गवळी, संतोष कोरे, महादेव गवळी आदी उपस्थित होते.कुस्ती मैदानासाठी जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी रुपये ११ हजार, नान्नज येथील कुस्ती मैदानासाठी तर पहिला क्रमांक पटकवीणाऱ्यास रुपये ५ हजार आणि दुसऱ्या क्रमाकांच्या मल्लासही रुपये ३ हजारची बक्षीस दिले.



### जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी जपली परंपरा

कुस्ती खेळणाऱ्यासाठी प्रोत्साहन देण्याकामी भोसले पिता-पुत्राकडून नेहमीच सहकार्य असते, गेल्या १५ महिन्यापासून तालुक्यातील ९० कुस्तीगीरांना दरमहा प्रसादरूपी खुराक दिला जात आहे. राज्यातीलच असे कार्य करणारे अन्नछत्र न्यास हे पहिले ठरले असून, छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांची परंपरा जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व अमोलराजे जनमेजयराजे भोसले हे जपत आहेत.

### अमोलराजे ग्रुपची यशाची परंपरा कायम

अमोलराजे ग्रुप मध्ये सराव करणाऱ्या कुस्तीगीरीतील मल्ल पै. यश कुलकर्णी याने मध्यप्रदेशातील पैलवानास सालतु डावावर आसमान दाखवले, तर बडेसाब पठाण याने बांगडी डावावर केगाव उत्तर सोलापूर येथील पैलवानास दाखवले. बोरामणी येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिनी आयोजित कुस्तीस्पर्धेमध्ये व्यंकटेश कुलकर्णी आणि पै. दत्ता खरात बादोले यांनी प्रेक्षणीय कुस्ती केली.



# कासेगावच्या बुद्धिबळ स्पर्धेस उत्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त जलसमृद्धी व सह्याद्री फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बॅरिस्टर बाबासाहेब भोसले प्रशाला कासेगाव येथे आयोजित बुद्धिबळ आणि रूबिक्स क्यूब स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष नेताजी खंडागळे आणि जलसमृद्धीचे दत्ता डांगे यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. कासेगाव, उळेवाडी, उळे, गंगेवाडी, वडजी, बक्षीहिप्परगा, मुळेगाव या गावांमधून तब्बल १७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.

याचे उद्घाटन पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिलीप चौगुले, राजेश जगताप, यशपाल वाडकर, पोलिस उपनिरीक्षक महेश घोडके, परशुराम कोळी, मुख्याध्यापक रमेश शिंदे, रामप्पा चौगुले, बालाजी चौगुले, चंद्रकांत चव्हाण, प्रवीण चौगुले, विश्वजित चौगुले, सरकार पाटील आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### अंत्ययात्रा अडवून शिवीगाळ करून प्रेताची विटंबणा करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**माळशिरस तालुक्यातील दहिगाव येथील फुले वस्तीवरील घटना**

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर -**
अंत्ययात्रा अडवून शिवीगाळ करून प्रेताची विटंबणा करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना माळशिरस तालुक्यातील दहिगाव येथील फुले वस्तीवर घडली. याबाबत धनाजी पांडुरंग ढगे (वय ४२, रा. फुले वस्ती, दहिगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ज्ञानेश्वर शिवलिंग माने (वय ३५), शिवलिंग दत्तात्रय माने (वय ४०), ताराबाई शिवलिंग माने (वय ३५), विष्णु सुग्रीव केंदळे (वय ३०), मिराबाई सुग्रीव केंदळे (वय ३५), दीपक सुग्रीव केंदळे (वय ४०, सर्व रा. दहिगाव, ता. माळशिरस) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.१३ ऑक्टोबर रोजी सकाळी पाचच्या सुमारास धनाजी ढगे यांचे चुलते विठ्ठल बाळू ढगे हे आज-ारपणामध्ये घरीच मयत झाले होते. त्यामुळे त्यांच्या अंत्यविधीकरीता सकाळी ११ च्या सुमारस शेती गट नं. ११४६ च्या पूर्व बाजूस असणाऱ्या ओढ्याच्या कडेला सदर गटाच्या वहिवाटीच्या रस्त्याने जात असताना ज्ञानेश्वर माने व इतरांनी अंत्ययात्रा अडवून शिवीगाळ केली व दमदाटी केली. शिवलिंग माने व त्याच्या साथीदारांनी दोन तास प्रेत अडवून प्रेताची विटंबना केली. म्हणून नातेपुते पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शेळके पुढील तपास करीत आहेत.



### कोहिनूर इन्स्टिटयुट व डॉ. हेगडेवार रक्तपेढीचे रक्तदान शिबिर

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**
राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट आणि डॉ. हेडगेवार रक्तपेढी सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी देखील जपण्यासाठी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन मंगळवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी केटीआय सोलापूर शाखेत करण्यात आले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन करून श्री सरस्वतीचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये केटीआयचे शाखा व्यवस्थापक वल्लभ कुलकर्णी, शिक्षक वृंद, विद्यार्थी, पालक आणि रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी श्री. रवि कोटा, डॉ. सुशील वाघमारे उपस्थित होते. रक्ताचा पुरवठा सातत्याने व्हावा अशा विचाराने यात आपला सहभाग असावा यासाठी राष्ट्रीय शिक्षण दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.



### स्व. मधुसुदन ठोंबरे जयंतीनिमित्त खाऊ वाटप

**सांगोला, दि. ११ नोव्हेंबर-**
सांगोल्यातील जुन्या पिढीतील निष्ठावंत गुरुजी स्व.मधुसुदन ठोंबरे यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त सांगोला रोटरी क्लब व ठोंबरे परिवाराच्या संयुक्त विद्यमाने जि.प.प्रा.शाळा, बुंजकर वस्ती येथे खाऊवाटप करण्यात आला. अध्यक्षपदी मुख्याध्यापिका गवसणे होत्या. प्रा.राजेंद्र ठोंबरे यांनी प्रास्ताविक केले. आराध्या शिनगारे, राजवीर बुंजकर, अर्जुन गावडे, रुखैया सुतार व भाग्यश्री सुतार या विद्यार्थ्यांचे भाषण झाले. यावेळी रोटरी क्लबचे विकास देशपांडे, विलास बिले, शरणाप्पा हळ्ळीसागर, प्रा.तायाप्पा आदट, मारुती बुंजकर उपस्थित होते. शिक्षिका शिंदे यांनी आभार मानले. स्व.ठोंबरे गुरुजी यांनी कै.बापूसाहेब झपके यांच्या म ार्गदर्शनाखाली १ जून १९५८ रोजी बुंजकर वाडी येथे एका झाडाखाली पहिलीचा वर्ग सुरू केला होता.

## निधन वृत्त...

### मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक विजय कुमार

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**



मध्य रेल्वेची कमान सांभाळणारे महाव्यवस्थापक विजय कुमार यांचे वयाच्या ५६ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. नुकतेच, १ ऑक्टोबर रोजी त्यांनी मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकपदाचा पदभार स्वीकारला होता. विजय कुमार यांना तत्काळ जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारापूर्वीच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या अकाली निधनाने संपूर्ण रेल्वे प्रशासनात शोककळा पसरली असून, रेल्वे मंत्रालयापासून ते स्थानिक विभागांपर्यंत सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.मृत्यूपूर्वी केवळ चार दिवसांपूर्वीच ते सोलापूर विभागाच्या दौऱ्यावर आले होते. कर्तृत्व, शिस्त आणि सहृदय नेतृत्वामुळे ओळखले जाणारे विजय कुमार यांच्या जाण्याने रेल्वे सेवेत मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

### तारा चंडक

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**



टिळक चौक येथील रहिवासी तारा गिरीश चंडक (वय ८४ ) यांचे अल्पशा मंगळवार ११ नोव्हेंबरला निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, २ मुले, २ मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे . अंत्ययात्रा बुधवार १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. त्यांच्या टिळक चौक येथील घरातून निघणार आहे. इनरव्हील क्लबच्या त्या माजी अध्यक्षा होत्या . जुन्या पिढीतील कान नाक घसा तज्ज्ञ डॉ. गिरीश चंडक यांच्या त्या पत्नी होत.

### गजानन जाधव

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**



प्रियांका नगर, सैफुल येथील गजानन शामराव जाधव (वय ७०) यांचे सोमवारी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, ३ सुना, नातवंडे असा परिवार आहे. सोलापूर शहर पोलीस दलातील फोटोग्राफर पोलीस शिपाई दीपक जाधव यांचे ते वडील होत.

# राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**
राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र यांच्यावतीने त्यांच्या विविध मागण्यांसाठी आज (दि.११) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.



सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर, कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतची विस्तृत अधिसूचना तत्काळ जारी करण्यात यावी, १० वर्षे सतत काम करीत असलेल्या सर्व कंत्राटी/रोजंदारी/अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा, एकवेळची बाब म्हणून प्रतिक्षा यादीतील सर्व पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या द्या, सरकारी कर्मचारी, निमसरकारी कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवांतर्गत समस्यांवर मुख्यमंत्री स्तरावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी, दोन महिन्यांतून एकदा चर्चासत्राचे व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात यावे, सेवानिवृत्तीचे वय ६० करा, सर्व सरकारी कर्मचारी/निवृत्तीवेतनधारक/कंत्राटी-रोजंदारी कर्मचारी यांना सर्व इस्पितळात कॅशलेस उपचार मिळावेत, यासाठी व्यापक स्वास्थ्य विमा योजना लागू करावी, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी तत्काळ उठवा, दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना अनुदान, अंशतः अनुदानावर नियुक्त तसेच २००५ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करा. ज्या विभागाने सेवाभरती नियम व आकृतीबंधास अद्याप शासन मंजुरी घेतलेली नाही, त्यांना अशी मंजुरी विहित मुदतीत घेण्यासंदर्भात सूचना देण्यात याव्यात, शिक्षकांचे जीवन उध्वस्त करणारा १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा शासन आदेशाबाबत पुनर्विचार करण्यात यावा. आदी विविध मागण्यांचा यामध्ये समावेश आहे.

यासाठी दि. ११ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्याचा सुचना वरिष्ठांना दिल्या होत्या. त्याप्रमाणे महसुल कर्मचारी यांनी एकत्र येत आज निदर्शने केली. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष शंतनु गायकवाड, मध्यवर्ती सघटनेचे कार्याध्यक्ष गजानन गायकवाड, सुभाष मोपडे, मंगरूळकर, उमेश काळे, गिरीष रजपूत, अनंत डेपाळे, अक्षय गायकवाड, सतोष साळवे आदींसह इतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# सोलापूर बाजार समितीमध्ये सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रास शासनाची मान्यता

**एनसीसीएफ आणि बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने होणार शासकीय खरेदी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ नोव्हेंबर-**
सिद्धेश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती आणि सोलापूर महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने एनसीसीएफ द्वारे हमीभाव केंद्र सुरू करण्यास शासकीय मान्यता मिळाली आहे. त्यानुसार सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुळ गोदामात हमीभाव खरेदी योजना २०२५-२६ या वर्षासाठी शेतकऱ्याची नोंदणी प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

दरम्यान, सोयाबीनचा हमीभाव रु. प्रति क्विंटल ५३२८ रुपये असा शासनाने ठरवला आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना प्रथम ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये अद्यावत ७/१२ पिकाच्या नोंदणीसह व त्यावर असलेले पीक क्षेत्रफळ, आधार कार्ड व आधार कार्ड लिंक असलेले बँक खाते, नोंदणीकरिता मोबाईल व स्वतः शेतकरी यांनी बायोमेट्रिककरिता हजर रहावे लागणार आहे. शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार फक्त ऋ.अ.ट. दर्जाचे सोयाबीन खरेदी करण्यात येणार आहे.

**सोलापूर बाजार समितीमध्ये सोयाबीन हमीभाव केंद्र सुरू**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन हमीभाव खरे केंद्र सुरू करण्यास शासन मान्यता मिळाली आहे. त्यासाठी बाजार समितीमधील गुळ गोदाम खरेदी केंद्रासाठी देण्यात आले आहे. त्यासाठी लागणारी यंत्रणा मनुष्यबळ सज्ज करण्यात आली आहे. यावर्षीची खरेदीची प्रक्रिया ही सोलापूर बाजार समिती प्रशासन आणि एनसीसीएफ द्वारे पार पडली जाणार आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

**- अतुलसिंग रजपूत, सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर**

## स्व.कोठे प्रतिष्ठानतर्फे २६ नोव्हेंबरला सोलापुरात सामुदायिक विवाह सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**
स्व. विष्णुपंत कोठे प्रतिष्ठान यांच्या वतीने शहर व जिल्ह्यातील गोरगरीब गरजवंतांसाठी मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन कर्णिक नगर येथील वल्याळ मैदानावर २६ नोव्हेंबरला करण्यात आले आहे.

त्यासाठी स्व. विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानच्या वतीने तयारी सुरू करण्यात येत आहे. दरम्यान, संस्थेकडून मोफत सामुदायिक विवाह सोहळ्यात संस्थेकडून वधूस-लग्नाचे वस्त्र, शालू, मंगळसूत्र आणि जोडवे तर वरास-विवाहाचा सफारी व हळदी पोशाख दिला जाणार आहे. त्याचबरोबर हार-बाशिंग-तुरे, संसारोपयोगी भांडी, कपाट, अंतरपाट अशा विविध वस्तू व सुविधा दिल्या जाणार आहेत.. वधू-वर दोन्ही परिवाराकडील प्रत्येकी १०० पाहुण्यांना मोफत स्वादिष्ट भोजन दिले जाईल. सवाद्य वरात देखील संस्थेकडून उत्साही वातावरणात काढली जाणार आहे.

या सामुदायिक विवाह सोहळ्यात आपल्या पाल्यांचा विवाह करू इच्छिणाऱ्या परिवाराने आ. देवेंद्र राजेश कोठे संपर्क कार्यालय नवी वेस पोलीस चौकी जवळ मुरारजी पेठ येथे संपर्क साधावे. असे आवाहन स्व.कोठे प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. नाव नोंदणीची शेवटची तारीख १५ नोव्हेंबर असून, हा सामुदायिक विवाह सोहळा बुधवार २६ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५ वा ४२ मिनिट गोरज मुहूर्तावर लिंगराज वल्याळ क्रीडांगण कर्णिक नगर येथे संपन्न होणार आहे.

# राष्ट्रवादी नेते घाटणेकरांनी बाधित शेतकरीप्रश्नी घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**सदर प्रश्नी लक्ष घालण्याची जिल्हाधिकाऱ्यांची ग्वाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**
जिल्ह्यात मे, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात सलग तीन ते चार वेळा अतिवृष्टी झालेली आहे. यामध्ये शासनाने नुकसान भरपाईसाठी वेगवेगळे शासन निर्णय जारी केले आहेत. या शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून शेतकऱ्यांना चुकीच्या पध्दतीने नुकसान भरपाई दिली जात असल्याची बाब राष्ट्रवादीचे नेते संजय पाटील घाटणेकर यांनी सोमवारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या निदर्शनास आणून दिली. यावर जिल्हाधिकाऱ्यांनी संबधित प्रकरणात लक्ष देवून शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल असा विश्वास व्यक्त केला आहे.



जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईत दुजाभाव होत असल्याबाबत शरद पवारांनी घाटणेकर-पाटील यांना जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेण्याबाबत सुचित केले होते. त्यानुसार सोमवारी आपण जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेवून वस्तुस्थिती जिल्हाधिकाऱ्यांच्या कानावर घातली असल्याचे घाटणेकर-पाटील यांनी सांगितले.

मे महिन्यात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे थेट क्षेत्र वगळून तसेच काही शेतकऱ्यांची नावे वगळून सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यातील नुकसान भरपाई वाटप होत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याची बाब श्री. पाटील यांनी लक्षात आणून दिली. तसेच शेतकऱ्यांच्या जमिनी वाहुन गेल्या आहेत त्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळत नाही; त्यासाठी शेतकरी सातत्याने विचारणा करित आहेत. त्यामुळे रोजगार हमी योजनेतील ६० टक्के यांत्रिकीकरण आणि ४० टक्के मजुरी असे प्रमाण बदलून ९० टक्के यांत्रिकीकरण आणि १० टक्के मजुरी असे करावे अशीही मागणी यावेळी करण्यात आली. ज्या शेतकऱ्यांच्या मोटारी आणि पाईप लाईन वाहुन गेल्या आहेत त्या शेतकऱ्यांना प्रत्येकी १ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी त्यांनी केली. यावेळी जिल्हा प्रशासनातर्फे शेतकऱ्यांना इलेक्ट्रीक मोटारी देणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितल्याचे घाटणेकर यांनी सांगितले. यावेळी बाबासाहेब शेळके, किसन घोडके, अमर बडेकर, विश्वजित पाटील, अजित पाटील आदी उपस्थित होते.

# शासनाच्या अध्यादेशानुसार सोयाबीनची केवळ १८ लाख मेट्रिक टनच खरेदी

**शेतकऱ्यांना खुल्या बाजारात करावी लागणार उर्वरित सोयाबीनची विक्री**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**
राज्यभरात एक कोटी एकर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड होते. या क्षेत्रात सरासरी ४० लाख क्विंटलवर सोयाबीनचे उत्पादन होण्याचा अंदाज आहे. असे असले, तरी राज्य शासनाने हमी दरानुसार १८ लाख ५० हजार ७०० मेट्रिक टनावर सोयाबीनची खरेदी होणार आहे. यामुळे २२ लाख मेट्रिक टन सोयाबीन खुल्या बाजारात विकावे लागणार आहे. खुल्या बाजारात सोयाबीनचे दर क्विंटल मागे एक ते दोन हजार रुपयांनी कमी आहेत. हमी केंद्र असले, तरी खुल्या बाजारात कमी दर मिळाल्याने शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागणार आहे.

**९० दिवसांत खरेदी होणार सोयाबीन**

राज्य शासनाने सोयाबीन खरेदीसाठी १५ नोव्हेंबरचा मुहूर्त निश्चित केला आहे. यासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने हमी केंद्रावरील सोयाबीन खरेदीसाठी २० दिवसांचे उद्दिष्ट दिले आहे. ३१ डिसेंबरपर्यंत सोयाबीन विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी करावी लागणार आहे. या कालावधीत १८ लाख ५० हजार ७०० मेट्रिक टन सोयाबीनचीच खरेदी होणार आहे. असे पत्र काढले आहे. हमी केंद्रावर सोयाबीनला ५,३२८ रुपये क्विंटलचा दर आहे. तर खुल्या बाजारात सोयाबीनला ३२०० ते ४२०० रुपयांचा दर आहे. यामध्ये क्विंटल मागे दोन हजार रुपयांचा फरक आहे.

दरम्यान, संपूर्ण राज्यभरात ४७ लाख हेक्टरवर सोयाबीनची लागवड झाली आहे. हे क्षेत्र एकरामध्ये एक कोटी एकरपेक्षा अधिक येते. या क्षेत्रावर सरासरी चार क्विंटल सोयाबीन म्हटले, तर ४ कोटी क्विंटलचे सोयाबीन पीक येण्याचा अंदाज आहे. हे सोयाबीन ४० लाख टनापर्यंत जाण्याचा अंदाज आहे. निर्धारित उत्पादन आणि खरेदीचे उद्दिष्ट यात तफावत निर्माण होणार आहे. यामुळे अर्धे अधिक सोयाबीन शेतकऱ्यांना खुल्या बाजारात विकावे लागणार आहे. या ठिकाणी शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागणार आहे.

# पूरग्रस्त भागातील विहिरी, बोअर दुरुस्तीसाठी लवकरच मिळणार अर्थसहाय्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**
महापुरामुळे बाधित झालेल्या विहीर, बोअर, हातपंप दुरुस्तीसाठी शासन स्तरावर नियोजन करण्यात आले असून, यासाठी बाधित शेतकरी, ग्रामपंचायत कार्यालयाद्वारे मागणी करावी. दरम्यान, ही मदत आता लवकरच मिळणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात सीना-भोगावती नद्यांना आलेल्या महापुरामुळे सीना काठच्या गावांत गंभीर परिस्थिती होती. अशातच ११० मंडळापैकी १०३ मंडळात अतिवृष्टी झाली होती. यामुळे शेतकरी बांधवांचे अतोनात नुकसान झाले होते. पुराच्या पाण्यामुळे सिना नदीकाठच्या मोहोळ, उत्तर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, माढा आदी सहा तालुक्यातील जवळपास ११५ गावे बाधित झाली होती. या गावातील पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या ८० हुन अधिक विहिरींमध्ये गाळ साठला आहे, विद्युत मोटारी-३५ हुन अधिक खराब झाल्या, बोअर-६५ खराब पाणी झाल्याने पाणी पुरवठा करण्यात अडचण येत होती. सद्य स्थितीमध्ये गावासाठी, जनावरांसाठी पाणीपुरवठा होऊ शकत नसल्याने बाधित गावच्या ग्रामपंचायतींनी दुरुस्तीसाठी निधीची मागणी संबंधित तहसील कार्यालय, गटविकास अधिकारी यांच्याकडे केली होती.

पुरामुळे बाधित झालेल्या गावातील विहिरी, बोअर यांच्या दुरूस्तीसाठी १५ ते ३० हजार मदत देण्यात येणार आहे. मात्र पंचनामे होताना गावातील विहीर, बोअर, हातपंप याची नुकसान झाल्याची नोंदणी असेल तरच निधी मिळणार आहे. नोंदणी नसेल तर ग्रामपंचायतींना खर्च उचलावा लागणार आहे.

**- अभिजित पाटील**
**निवासी उपजिल्हाधिकारी,**

दरम्यान, शासनाच्या आदेशानुसार या विहिर दुरूस्तीसाठी ३० हजार, बोअर दुरूस्तीसाठी १५ ते २० हजार निधी दिला जाणार असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले असून, बाधित ग्रामपंचायतींनी मागणी करावी, असे आवाहन देखील केले आहे.

# कुर्डूवाडी नगराध्यक्षपदासाठी होणार रस्सीखेच

**सर्वच पक्षांची भूमिका अस्पष्ट; काही महिलांची नावे मात्र चर्चेत**

**तभा वृत्तसेवा । सोमनाथ शिंदे**
**कुर्डूवाडी, दि.११ नोव्हेंबर-**
कुर्डूवाडी नगरपालिका निवडणूकीच्या प्रचारामध्ये राजकीय पक्ष आणि तिकीट निश्चित होण्याअगोदरच नगराध्यक्षपदासाठी काही महिलांच्या नावांची जोरदार चर्चा असून त्यांनी प्रचारालाही सुरूवात केल्याचे चित्र आहे.






नगराध्यक्षपद हे इतर मागास प्रवर्गातील महीलांसाठी आरक्षीत आहे. सध्या शहरात निवडणूकीचा ज्वर वाढत असून अनेकांनी होम टू होम दौरा करत गाठीभेटी घेण्यास सुरूवात केली आहे. नगराध्यक्षपदासाठी जयश्री भीसे, काँग्रेसच्या मनिषा गवळी, भाजपाच्या माधवी गोरे, माजी नगराध्यक्ष निवृत्ती गोरे यांच्या पत्नी सुरेखा गोरे यांच्या नावांची चर्चा आहे. २०१७ च्या नगरपालिका निवडणूकीत जयश्री भिसे यांचा समिर मुलाणी यांच्याकडून निसटता पराभव झाला होता. शिवसेना जिल्हाध्यक्ष धनंजय डिकुळे व नगराध्यक्ष समिर मुलाणी यांच्या कार्यकाळात येथील सर्वसामान्य जनता भरडून निघाली. त्यावेळी पप्पू उर्फ संतोष भिसे तसेच नगराध्यक्षपदाच्या उम दवार जयश्री भिसे यांनी आवाज उठवणे अपेक्षीत होते मात्र त्यांनी आठ वर्ष शांत राहणेच पसंत केले. त्यामुळे जनतेत नाराजी असल्याचे नाकारता येत नाही. अदृष्य स्वरूपात शिवसेना सत्ताधा-यांनी केलेला शहराचा तिनशे कोटीच्या विकासामुळे मतदारवर्गात संतापाची लाट आहे. भाजपातर्फे माधवी गोरे यांनी प्रत्यक्ष प्रचारास सुरवात केली आहे. वरीष्ठ पातळीवरून कुर्डूवाडी नगरपालिका निवडणूकासंदर्भात अद्याप कोणतीही ठोस भूमिका नाही. दोन दिवसापुर्वी राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या मुलाखतीवेळी माढ्याचे रणजितसिंह शिंदे यांच्याबरोबर भाजपात प्रवेश केलेले जि.प.चे माजी समाजकल्याण सभापती शिवाजी कांबळे हे उमेदवारांच्या मुलाखती घेताना दिसुन आल्याने शहरात सर्वत्र उलटसुलट चर्चांना उत आला होता. मात्र काल शहरात आ.कल्याणशेठ्ठी मतदारांशी संवाद साधण्यासाठी आले असता त्यांनी पक्ष आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा असून दोन दिवसात पुढील दिशा ठरवली जाईल असे सांगीतले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वतीने कुर्डूवाडी शहराला सर्वसमावेशक चेहरा असलेले आश्वासक नेतृत्व नसल्याने त्यांच्याबाबत अद्याप चर्चाच शहरात नाही. तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष धनंजय डिकुळे यांचे राजकारण सर्वांनाच अनाकलनीय असते. त्यांच्यावतीने जयश्री भिसे मशाल घेवून लढतील अशीही चर्चा आहे. काँग्रेसकडून मनिषा गवळी यांनीही शहरात भेटीगाठी घेत दौरा चालु केला आहे. मात्र काँग्रेसच्या वरीष्ठ पातळीवरून कसलेही सहकार्य त्यांना अद्याप नसल्याचे दिसत आहे. आजपर्यंत शहरात इतर पक्षाप्रमाणे एकही वरीष्ठ नेत्याने संवाद साधला नसल्याचे दिसते. आजतरी काँग्रेस शहरात एकाकी पडल्याचे चित्र आहे.

### मेघा गादेकर यांचे सीए परीक्षेत यश

**बार्शी, दि. ११ नोव्हेंबर-**



तावडी येथील मेघा गादेकर यांनी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत यश संपादन केले. त्यांचा तावडी येथे गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. कठीण समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत मेघा यांनी धीर, संयम व जिद्द, चिकाटीच्या बळावर संयमाने मिळवलेले यश अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. मेघा या तावडी येथील मनोज गादेकर यांच्या कन्या आहेत. मेघाचे प्राथमिक शिक्षण तावडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. त्यानंतर इ. ४ ते ७ वी पर्यतचे शिक्षण जिजामाता विद्यामंदिर बार्शी, इ.८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण महाराष्ट्र विद्यालय, बार्शीत झाले. त्यानंतर ११ वी बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज येथे तर इ. १२ वी मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स पुणे येथे झाले. बी.कॉम व एम कॉम पुणे विद्यापीठातून झाले आहे. मेघाचे वखारिया विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, प्रकाश डमरे, तानाजी गोडगे तसेच रेवडकर कुटुंबीयासह डमरे, गोडगे, गटकळ कुटुंबियांनी अभिनंदन केले.

# महापालिका आरक्षण सोडतीचा कुणाला लाभ तर कुणाला फटका!

**३४ जागांवर आरक्षण बदल; संबंधितांना इतरत्र निवडणूक लढवावी लागणार**

**एकूण दहा प्रभागांमध्ये जैसे थे स्थिती तर दोन प्रभागात संपूर्ण बदल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी आज सकाळी प्रभाग आरक्षण सोडत काढण्यात आली. यामध्ये सन २०१७ च्या महापालिका निवडणुकीच्या तुलनेत एकूण ३४ जागांवर आरक्षण बदल झाले आहे. तर दहा प्रभाग पूर्णपणे जैसे थे आहेत. यामुळे संबंधित नगरसेवकांना इतर जागांवर निवडणूक लढवावी लागणार आहे. एकूण दहा प्रभाग आरक्षण जैसे थे आहे. तर दोन प्रभागांमध्ये संपूर्ण बदल झाला असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. आरक्षण बदलाचा हा फटका काही जणांना बसला आहे. सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण १०२ जागांकरिता आज आरक्षण सोडत महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. एकूण २६ प्रभागांपैकी २४ प्रभाग हे चार सदस्यीय आहेत. तर दोन प्रभागात प्रत्येकी तीन सदस्य राहणार आहेत. सन २०१७ मध्ये झालेल्या सोलापूर महापालिका निवडणुकीच्या तुलनेत यंदाच्या या निवडणुकीसाठीची आरक्षण सोडत पाहता बदल झाल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. यामध्ये एकूण ३४ जागांवर आरक्षणामध्ये बदल झाला आहे. यामुळे प्रस्थापितांना याचा निश्चितच फटका बसणार आहे. तर काही जणांना तर काहीजणांना त्याच प्रभागातील सर्वसाधारण आरक्षण जागेची चाचपणी करावी लागणार आहे.

एकूण दहा प्रभाग हे जैसे थे राहिले आहेत. त्यामुळे या दहा प्रभागातील ४० जागांवरील माजी नगरसेवकांना सेफ झोन असल्याचे दिसते. तर १४ प्रभागातील प्रत्येकी दोन जागी जैसे ते आरक्षण पडले आहे. अशा पद्धतीने ६८ जागांवरील माजी सदस्य यांना कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्याच प्रभागातून ते निवडणूक लढवू शकतील असे चित्र आहे. प्रभाग क्रमांक २५ आणि २६ मधील प्रत्येकी तीन जागांवरील आरक्षणात संपूर्ण बदल झाला आहे.



**● या प्रभागात आहे आरक्षण जैसे थे**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या सोडत आरक्षणामध्ये दहा प्रभागांमध्ये सर्व आरक्षण जैसे थे आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक एक, दोन, चार, सात, नऊ, दहा, बारा, पंधरा, सतरा, अठरा या प्रभागांचा समावेश आहे. तर १४ प्रभागातील दोन जागांवर आरक्षण बदल झाला नसून यामध्ये प्रभाग क्रमांक तीन, प्रभाग पाच, प्रभाग सहा , प्रभाग आठ, प्रभाग ११, प्रभाग १३, प्रभाग १४, प्रभाग १६, प्रभाग १९, प्रभाग २०, २१, २२, २३, २४ हे आहेत.

**● ३४ जागी आरक्षण बदल; हे आहेत माजी नगरसेवक :** नुकत्याच झालेल्या आरक्षण सोडतीमध्ये ३४ जागांच्या आरक्षणामध्ये बदल झाला आहे. त्यातील माजी नगरसेवक आणि कंसात बदल झालेले सध्याचे प्रभाग आरक्षण असे - सूर्यकांत पाटील- प्रभाग तीन अ नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला , अंबिका पाटील- प्रभाग तीन क सर्वसाधारण, स्वाती आवळे- प्रभाग पाच अ अनुसूचित जाती, गणेश पुजारी- प्रभाग पाच ब नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, मनोज शेजवाल - प्रभाग ६ अ अनुसूचित जाती महिला, ज्योती खटके- प्रभाग ६ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, अमर पुदाले- प्रभाग आठ अ नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, सोनाली मुटकीरी - प्रभाग आठ क सर्वसाधारण, राजकुमार हंचाटे- प्रभाग ११ अ नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, रिक्त - प्रभाग ११ क, (दिवंगत) सुनील कामाठी निवडून आले होते (प्रभाग १३ अ अनुसूचित जाती महिला), प्रतिभा मुद्गल- प्रभाग क्रमांक १३ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, वहिदाबानो शेख- प्रभाग १४ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, तोफिक हत्तुरे - प्रभाग क्रमांक १४ क सर्वसाधारण महिला, मीनाक्षी कंपली - प्रभाग क्रमांक १६ अ अनुसूचित जाती, नरसिंग कोळी - प्रभाग १६ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, श्रीनिवास करली- प्रभाग १९ अ नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, अनिता कोंडी- प्रभाग क्रमांक १९ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, प्रवीण निकाळजे- प्रभाग २० अ नागरिकांचा मागास प्रवर्ग, अनुराधा काटकर - प्रभाग वीस ब सर्वसाधारण महिला, तोफिक शेख - २१ अ अनुसूचित जाती महिला, तसलीम शेख- प्रभाग क्रमांक २१ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, पुनम बनसोडे- प्रभाग क्रमांक २२ अ अनुसूचित जाती, किसन जाधव - प्रभाग २२ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, सुनिता रोटे - प्रभाग क्रमांक २३ अ अनुसूचित जाती, लक्ष्मण जाधव - प्रभाग २३ क सर्वसाधारण महिला, संगीता जाधव- प्रभाग २४ अ अनुसूचित जाती, माजी उपमहापौर राजेश काळे - प्रभाग २४ ब अनुसूचित जमाती महिला, सुभाष शेजवाल- प्रभाग २५ अ अनुसूचित जाती महिला, मनीषा हूच्चे- प्रभाग क्रमांक २५ ब नागरिकांचा मागास प्रवर्ग, वैभव हत्तुरे- प्रभाग क्रमांक २५ क सर्वसाधारण महिला, शिवलिंग कांबळे- प्रभाग क्रमांक २६ अ अनुसूचित जाती महिला, प्रभाग क्रमांक २६ ब अनुसूचित जमाती, प्रिया माने- प्रभाग क्रमांक २६ क सर्वसाधारण आदी.

# सोलापुरात हुडहुडी; तापमानही घटले

**▪ गरम कपडे खरेदीसाठी नागरिकांची झुंबड**
**▪ थंडीचा जोर वाढण्याचा अंदाज**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

गेल्या काही दिवसांपूर्वी सोलापुरात अवकाळी पाऊस पडला आणि यापुढेही काही दिवस पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून आल्याने यंदा थंडी जाणवते की नाही? असा प्रश्न सर्वांना पडला होता. मात्र आता पाऊस बंद झाल्याने सोलापुरात रात्री ७ वाजल्यापासूनच थंडी सुरू झाली असून, सकाळी ८ पर्यंत चांगलाच गारठा जाणवू लागला आहे. यामुळे महापालिकेजवळीच नेपाळी दुकानदारांकडून गरम कपडे खरेदीसाठी नागरिकांची झुंबड पडू लागली आहे.

दरम्यान, हवामान विभागाकडून थंडीचा अंदाज वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यंदा थंडीच्या महिन्यातही अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने यंदा थंडी पडेल की नाही याबाबत नागरिकांत उलट-सुलट चर्चा सुरू झाली होती. त्यातच ऐन दिवाळीत रोजच आभाळी वातावरण होत होते. या सगळ्याचा परिणाम शेतावर झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. मात्र आता अवकाळी पाऊस थांबला असून, थंडीस प्रारंभ झाला आहे. या थंडीमुळे गहू आणि हरभरा पिकास पोषक असल्याचे सांगण्यात येते. मात्र ज्वारी पिकावर मात्र करपा रोगाची भीती निर्माण होत आहे.



**सोलापूर : शहरात थंडी वाढली असून पार्क चौकात नेपाळी दुकानदारांकडून स्वेटर खरेदी करण्यासाठी मंगळवारी गर्दी केली होती.**

सोलापुरात किमान तापमान ३० ते ३२ अंशांपर्यंत खाली आले आहे. जशी थंडी वाढेल तसी तापमानात घट होणार असल्याने गारठा वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

**थंडीचा जोर वाढणार**

भारतीय हवामान खात्याने थंड वातावरणात उत्तर भारतात दाट धुक्याचा इशारा दिला आहे. उत्तर-पश्चिम भारतात थंडीचे दिवस आणि कडक थंडीचे प्रमाण कमी होणार आहे. पुढील चार ते पाच दिवस सकाळी आणि रात्री दाट धुके कायम राहण्याची शक्यता आहे. उत्तर भारतात थंडीचा कडाका वाढला आहे. किमान तापमानात काहीशी घट होईल. तसेच आकाश काही प्रमाणात निरभ्र राहण्याची शक्यता आहे. पुढील आठवड्यात पश्चिमी प्रकोपानंतर उत्तरेकडून वारे वाहू लागले तर पुन्हा गारवा जाणवणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

# दिल्लीच्या स्फोटानंतर विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची सुरक्षा वाढविली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ नोव्हेंबर-**

दिल्ली येथील बॉम्बस्फोटाच्या घटनेनंतर महाराष्ट्रात देखील मुख्यमंत्र्यांकडून विविध यंत्रणांना सतर्कते विषयी सुचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान राज्यातील गृहविभागाच्या सुचने नंतर पंढरपुरातील पोलिस यंत्रणा देखील सतर्क झाली असून येथील विठ्ठल मंदिराच्या सुरक्षेत देखील वाढ करण्यात आलेली आहे.

दिल्ली येथे लालकिल्याच्या गेट क्रमांक १ जवळ सोमवारी (ता.१०) सायंकाळी बॉम्बस्फोट झाला. या स्फोटात ९ नागरिकांचा मृत्यु झाला तर २० ते २५ नागरिक गंभीर जखमी झालेले आहेत.या घटनेची गंभीर दखल घेऊन महाराष्ट्रात हाय अलर्ट देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असलेल्या विठ्ठल रुक्मिणी मंदिराची सुरक्षा देखील वाढविली असल्याचे दिसून येत आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर असल्याचा अहवाल गुप्तचर विभागाने मध्यंतरीच्या काळात दिला आहे. यामुळे गेल्या वीस वर्षापासून विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास २४ तास सुरक्षा ठेवण्यात आली आहे सोमवारी सायंकाळी दिल्ली येथे कार मध्ये भिषण बॉम्बस्फोट झाला. या घटनेनंतर महाराष्ट्रात हाय अलर्ट देण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर विठ्ठल रुक्मिणी मंदिरची सुरक्षा देखील वाढविण्यात आली आहे. मंदिरात डॉगस्काँड द्वारे तपासणी करण्यात येत असून मंदिरात येणाऱ्या, जाणाऱ्या प्रत्येक नागरिकांची तसेच त्यांच्या सामानाची तपासणी करण्यात येत आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी खबरदारी म्हणून मंदिराची सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.





# राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून हालचालींना जोरदार वेग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ नोव्हेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी मंगळवारी आरक्षण जाहीर होताच राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून जोरदार हालचालींना वेग आला आहे. आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर तातडीने मंगळवारी दुपारी पार्क चौकातील शहराध्यक्ष संतोष पवार यांच्या कार्यालयात प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत सोलापुरातील सर्व प्रभागात राष्ट्रवादीच्या बैठका घेऊन आगामी महानगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी अजित पवार गटाची ताकद दाखविण्यावर शिक्कामोर्तब झाला.

तसेच पालिका निवडणुकीत सर्वधर्मीय उमेदवारांना सामावून घेऊन महापालिकेत सत्तेच्या दिशेने वाटचाल करण्याचाही निर्धार व्यक्त करण्यात आला. सोलापूर शहराच्या विकासकामांसाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी कोट्यवधींचा निधी दिला आहे. या निधीच्या माध्यमातून पिण्याचे पाणी, रस्ते यांसह नियोजित बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास करण्यात आला आहे.याशिवाय पालकमंत्री असताना दत्तात्रय भरणे यांच्या माध्यमातूनसुद्धा अनेक प्रभागामध्ये विकासकामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. तसेच महापालिका निवडणुकीच्या माध्यमातून जनतेसमोर जाताना राष्ट्रवादीने केलेली कामे सांगून उमेदवारांना निवडून देण्यासाठी आवाहन करण्यात येणार आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या आरक्षणानुसार त्या त्या प्रभागात बैठक घेऊन इच्छुक उमेदवार आणि विद्यमान नगरसेवक यांची सांगड घालून 'अब कि बार ५० पार' चा नारा देत जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यावर लक्ष्य केंद्रित करणार असल्याचे शहराध्यक्ष संतोष पवार यांनी सांगितले. बैठकीला शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, आनंद चंदनशिवे,ज्येष्ठ नेते चंद्रकांत दायमा, माजी सरचिटणीस प्रमोद भोसले, माजी परिवहन सभापती आनंद मुस्तारे, महिला अध्यक्षा संगीत जोगदनकर ,युवक अध्यक्ष सुहास कदम, माजी नगरसेवक सिद्धाराम आनंदकर, गणेश पुजारी, वाहिदा शेख, ओबीसीचे प्रदेश उपाध्यक्ष सलीम नदाफ, प्रदेश सचिव इरफान शेख, अल्पसंख्यांकचे राष्ट्रीय सचिव फारूक मटके, अविनाश भडकुंबे उपस्थित होते.

# ११ नगरपरिषदा, एका नगरपंचायतीची निवडणूक सुरळीतपणे पार पाडा



**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ नोव्हेंबर-**

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २४६ नगरपरिषद व ४२ नगरपंचायती यांचा सदस्य व अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकाचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील अकरा नगरपरिषदा व एक नगरपंचायती यांचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे.

त्या निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील नगरपरिषद नगरपंचायत निवडणूक विषयक कामकाज सुरळीतपणे पार पाडून निवडणूक यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व अन्य संबंधित अधिकारी कर्मचारी यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायती सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, जिल्हा सहआयुक्त योगेश डोके यांच्यासह सर्व संबंधित नगरपालिकेचे निवडणूक निर्णय अधिकारी, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील अकरा नगरपरिषदा व एका पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेले सर्व जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांच्यावर सोपवण्यात आलेल्या जबाबदारीची सविस्तर माहिती घ्यावी. राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना, पत्र, हँडबुक याप्रमाणे दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी व निवडणूक अत्यंत शांततामय वातावरणात व निर्भयपणे होतील यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सुचित केले आहे.

**लोकसभा, विधानसभा निवडणुकीप्रमाणे माहिती संकलित करा**

सर्व नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहण्यासाठी सर्व संबंधित प्रांत अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी तहसीलदार यांनी संयुक्तपणे बैठका घ्याव्यात. याअंतर्गत काम करताना लोकसभा, विधानसभा निवडणुकी प्रमाणे माहिती संकलित करावी. यामध्ये सर्व संबंधित अधिकारी व यंत्रणांना जिल्हा निवडणूक कार्यालयाच्या वतीने आवश्यक त्या सूचना वेळोवेळी देण्यात येतील असेही आशीर्वाद यांनी सांगितले.

**जि.प., पं.स. निवडणूक कार्यक्रमही जाहीर होण्याची शक्यता : उपजिल्हाधिकारी देशमुख**

यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल संतोष कुमार देशमुख यांनी राज्य निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील ११ नगरपरिषद व एका नगरपंचायतीचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्याची माहिती देऊन त्या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणांनी व या निवडणुका पार पाडण्यासाठी नियुक्ती केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी करावयाच्या कामकाजाची सविस्तरपणे माहिती दिली. तसेच लवकरच राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**१५२ प्रभागासाठी ४९९ मतदान केंद्र निर्मिती: डोके**

नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सह आयुक्त योगेश डोके यांनी बार्शी, अकलूज, मोहोळ, पंढरपूर, अक्कलकोट, कुर्डूवाडी, करमाळा, सांगोला, मंगळवेढा, मैंदर्गी व दुधनी या नगर परिषद तर अनगर नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका कार्यक्रम जाहीर झालेला असून, या अंतर्गत १५२ प्रभागातून २८९ सदस्य निवडले जाणार तर यासाठी ४९९ मतदान केंद्र निर्माण केल्याचे सांगितले. याकरिता १२ निवडणूक निर्णय अधिकारी, १२ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आल्याचे सांगितले.

# नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी दोन दिवसात 3 अन् सदस्यासाठी ६ अर्ज दाखल!

**नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सह आयुक्त योगेश डोके**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायती यांचा सदस्य व अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकाचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील अकरा नगरपरिषदा व एक नगरपंचायती यांचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. यामध्ये नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी ३ आणि सदस्य पदासाठी ६ जणांनी आपले अर्ज दाखल केले असल्याची माहिती नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सह आयुक्त योगेश डोके यांनी दिली.

पहिल्या दिवशी पंढरपूर नगरपालिकेसाठीच फक्त १ अर्ज दाखल झाला होता तर आज दुसऱ्या दिवशी अनगर नगरपंचायत सदस्य पदासाठी ३ अर्ज तर मंगळवेढा नगरपालिका २ अर्ज दाखल झाले. तर अध्यक्षपदासाठी दुधनी नगरपालिका २ आणि अनगर १ असे ३ अर्ज दाखल झाले आहेत. असे एकूण आजतागायत ९ अर्ज दाखल झाले आहेत. इतर नगरपालिकेत आजतागायत एकही अर्ज दाखल झाला नसल्याची माहिती नगरपालिका प्रशासनाकडून मिळाली. या निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून, त्याचा निकाल ३ डिसेंबर रोजी होणार आहे. ही निवडणूक ईव्हीएमवर घेण्यात येणार आहे. त्यासाठी ४ नोव्हेंबरपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील ११ नगरपालिका आणि १ नगरपंचायतीसाठी या निवडणुकांचा धुराळा उडणार असून, अनेक इच्छुकांनी नगरसेवक होण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे. नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी ३१ ऑक्टोबरला प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार मतदान होणार आहे. दिव्यांग मतदार, तान्या बाळासह स्त्रिया, ज्येष्ठांना पहिल्यांदा मतदान करु दिले जाईल. तसेच काही मतदार केंद्र गुलाबी केंद्र असणार असून, त्यात सर्व अधिकारी या महिला असतील. या निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील नगरपरिषद नगरपंचायत निवडणूक विषयक कामकाज सुरळीतपणे पार पाडून निवडणूक यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व अन्य संबंधित अधिकारी कर्मचारी यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी बैठकीत आवाहन केले.

**जिल्हाभरातून २८९ सदस्य निवडले जाणार**

नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सह आयुक्त योगेश डोके यांनी बार्शी, अकलूज, मोहोळ, पंढरपूर, अक्कलकोट, कुर्डूवाडी, करमाळा, सांगोला, मंगळवेढा, मैंदर्गी व दुधनी या नगर परिषद तर अनगर नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका कार्यक्रम जाहीर झालेला असून, या अंतर्गत १५२ प्रभागातून २८९ सदस्य निवडले जाणार तर यासाठी ४९९ मतदान केंद्र निर्माण केल्याचे सांगितले. याकरिता १२ निवडणूक निर्णय अधिकारी, १२ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आल्याचे सांगितले.



**सोलापूर : कालभैरव जयंतीनिमित्त तुळजापूरवेस परिसरातील कालभैरव मंदिरात श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी अवंती केंद्रातर्फे १०८ स्तोत्र पठण करताना महिला.**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कर्ज असलेला गाळा विकून २८ लाखांची फसवणूक

### मयत व्यक्तीसह तिघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

कर्ज असलेला गाळा विकून २८ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी मयत व्यक्तीसह तिघांवर जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रवि नरसय्या गाजूल (वय ४०, रा. न्यु पाच्छा पेठ, अशोक चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दुर्गाबाई कारमपुरी (वय ७१), निर्मला कारमपुरी आणि दत्तात्रय कारमपुरी (वय ५४, रा. जयलक्ष्मी हौसींग सोसायटी, मित्र नगर, शेळगी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निर्मला कारमपुरी या मयत झालेल्या आहेत.

दुर्गाबाई कारमपुरी, निर्मला कारमपुरी, दत्तात्रय कारमपुरी यांच्या सोलापूर मनपा हद्दीतील टीपी स्किम सिटी सर्व्हे नं. १०४३० यांसी फायनल प्लॉट नं. २१ सब प्लॉट ५७/३ यांसी मिळकत क्र. ३४१२८६ यांची नं. ०४ क्षेत्र २०९४ चौ. मी या मिळकतीवर कर्ज होते. मिळकतीवर कर्ज असल्याचे माहिती असतानाही ही बाब लपवून ठे१न २५ जून २०१४ ते २६ सप्टेंबर २०२३ या कालावधीत गाळा नं. ४ हार प्रभाकर भंडारी यांना विक्री केला. त्यानंतर प्रभाकर भंडारी यांनी सदरचा गाळा रवि गाजूल यांना २६ सप्टेंबर २०२३ रोजी खरेदी दस्त नं. ५७६०/२३ अन्वये २८ लाख रुपयांना विकला. त्यानंतर गाजूल यांना गाळ्यावर कर्ज असल्याची बाब समजली. त्यामुळे गाजूल यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फसवणुकीबाबत फिर्याद दाखल केली आहे. पोलिस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.



# दिग्गजांना धक्का!! कही खुशी कही गम !

## सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप आरक्षण जाहीर

### अंतिम प्रभाग आरक्षण २ डिसेंबर रोजी होणार जाहीर






**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**


सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रारूप आरक्षण सोडतीने दिग्गजांना दे धक्का तर कही खुशी कही गम असे चित्र आहे. पूर्वीच्या आरक्षणात फेरबदल झाले. यानुसार प्रस्थापित अनेकांना धक्का बसल्याचे दिसून येते. या आरक्षण सोडतीनंतर शहरातील प्रभागांचे संपूर्ण आरक्षण चित्र आता स्पष्ट झाले.अंतिम प्रभाग आरक्षण दि. २ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर होणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण महिलासाठी आरक्षण निश्चित करण्याकरिता मंगळवारी सकाळी ९.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम पार पडला. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, नगरचना सहसंचालक मनीष भिष्णूरकर ,उपअभियंता महेश शिरसागर, राम चंद्र पेंटर, मिळकतकर विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर, निवडणूक कार्यालयाचे अधीक्षक ओमप्रकाश वाघमारे, संगणक विभागाच्या प्रमुख स्नेहल चपळगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही प्रक्रिया पार पाडली. या प्रक्रियेत कामगार कल्याण जनसंपर्क अधिकारी अजित खानसोळे, संदीप भोसले, प्रदीप निकते, शिवकुमार उदगीरी, गणेश कोळी, रहमान मोगल, सतीश कोळी, मतीन सय्यद, संतोष कलमगार, निर्मलकुमार शितोळे, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार यांच्यासह कर्मचारी व अधिकारी सहभागी झाले होते. नियमावलीचे वाचन व सूत्रसंचालन प्रभारी नगर सचिव प्रवीण दंतकाळे यांनी केले.

प्रत्येक टप्प्यावर सोडत आरक्षणाची घोषणा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली.



**अशी पार पडली आरक्षण सोडत प्रक्रिया :** राज्य निवडणूक आयोगानी दिलेल्या सूचनेनुसार आरक्षण सोडत काढण्यात आली.सोलापूर महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढण्याची प्रक्रिया झाली. सुरुवातीला तीन सदस्यांचे दोन प्रभाग आहेत. प्रभाग क्र. २५ व २६ पैकी कोणत्या प्रभागात महिलांच्या दोन जागा देय होतील व कोणत्या प्रभागात महिलांची एक जागा देय होईल हे सोडतीने निश्चित करण्यात आले. प्रभाग २५ ची चिठ्ठी काढण्यात आली. तिथे दोन महिला राखीव निश्चित केले. त्यानंतर प्रभाग २६ मध्ये तीन पैकी एक जागा महिला आरक्षित करण्यात आली. दुसरा टप्प्यात अनुसूचित जातीसाठी आरक्षण प्रक्रिया राबवली उतरत्या क्रमाने लोकसंख्येप्रमाणे जागा आरक्षित करण्यात आल्या. यामध्ये प्रभाग क्रमांक १, २, ४, ५, ६, १३, १५, १६, १७, २१, २२, २३, २४ , २५, २६ अशा एकूण आरक्षित १५ जागांचा समावेश आहे. ड्रम मधून अनुसूचित जातीसाठीच्या १५ पैकी आठ चिठ्ठ्या महिलांसाठी काढण्यात आल्या. एससी महिला राखीव मध्ये प्रभाग क्रमांक १३, १५, ४, ६ ,२१, २५ आणि १७ अशा चिठ्ठ्या निघाल्या आहेत. पुढील टप्प्यात अनुसूचित जमाती (एसटी) साठी प्रक्रिया घेतली. २४ ब अनुसूचित जमाती महिला आणि २६ ब अनुसूचित जमाती असे आरक्षण निश्चित करण्यात आले. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या (ओबीसी) एकूण २७ जागापैकी प्रत्येक प्रभागात एक याप्रमाणे २५ जागांचे प्रभागनिहाय वाटप करण्यात आले. उर्वरित २ जागा सोडतीने निश्चित केल्या. दरम्यान ओबीसी महिलांसाठी प्रभाग क्रमांक १४, १९, १, २, ५, १६, २२, २३, १२, ९, ३, ८, ११, ६ या एकूण १४ जागा आरक्षित झाल्या आहेत.




**मागील निवडणुकीच्या तुलनेत ओबीसींची एक जागा कमी ? :** २०१७ च्या सोलापूर महापालिका निवडणुकीत ओबीसींसाठी एकूण २८ जागा होत्या. त्यापैकी १४ जागा महिलांसाठी आरक्षित होत्या. तर यंदाच्या २०२५ च्या महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत आज झालेल्या सोडतीमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) यांच्यासाठी २७ जागा असल्याचे दिसून आले. मागील निवडणुकीच्या तुलनेत ओबीसींची एक जागा कमी आहे. तर मागील निवडणुकीत सर्वसाधारण जागा ५७ होत्या आणि यंदा त्या ५८ आहेत. दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व प्रक्रिया पार पाडण्यात आली असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले. मागील निवडणुकीत असलेल्या ओबीसींच्या जागेत यंदा एकने घट कशी काय होते ? शासनाने कसा काय नियम बदलला ? असा सवाल माजी ज्येष्ठ नगरसेवक प्रभाकर जामगुंडी यांनी उपस्थित केला आहे.

आरक्षणाची सोडत पारदर्शक ड्रम मधून महापालिका शाळा क्रमांक दोनमधील कार्तिक गायकवाड (इयत्ता सहावी) प्रसाद इंगळे (इयत्ता सहावी), साक्षी वठार (इयत्ता चौथी) अनुष्का वठार (इयत्ता सहावी) या विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठीद्वारे काढण्यात आली. दरम्यान लिपिक गणेश कोळी यांनी प्रत्येक टप्प्यावर पाच वेळा ड्रम फिरविला तर लिपिक रहमान मोगल यांनी काढलेली सोडत जाहीर रित्या दाखवली. सोडतीनंतर प्रभागनिहाय आरक्षणाची प्रसिध्दी स्थानिक वर्तमानपत्र, महापालिका वेबसाईट व विभागीय अधिकारी कार्यालय क्र. १ ते ८ येथे ठेवण्यात येत आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार या निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून शहरातील २६ प्रभागात एकूण १०२ जागां आहेत. २४ प्रभाग चार सदस्यीय तर २ प्रभाग ३ सदस्यांचा आहे. १०२ जागांपैकी ५० टक्केप्रमाणे महिलांसाठी ५१ जागा राखीव आहेत. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी एकूण १५ जागा राखीव असून यामधील ८ जागा महिलांसाठी राखीव तर अनुसूचित जमातीसाठी २ जागा राखीव असून त्यामधील १ जागा महिलेसाठी राखीव आहे. ओबीसी व सर्वसाधारण महिलांसाठी सोडतीद्वारे आरक्षण निश्चित करण्यात आले. २७ टक्के प्रमाणे ओबीसींसाठी २७ जागा राखीव आहेत. त्यामध्ये १४ महिलांसाठी व १४ जागा पुरुषांसाठी राहणार आहेत.

### काही प्रभागात बदल

दरम्यान २०१७ च्या निवडणुकीप्रमाणेच ही आरक्षण रचना राहील असे मानले जात होते परंतु काही प्रभागांमध्ये बदल झाला असल्याचे स्पष्ट आहे. महिलांसाठी आरक्षित जागा सर्वसाधारण झाली आहे. असे असले तरी एकूण चार सदस्य प्रभाग पद्धती असल्याने प्रत्येकांना संधी मिळणार असल्याचे दिसून येते.

### असे आहे महिला आरक्षण

१०२ एकूण जागेपैकी महिलांसाठी ५१ जागा राखीव आहेत. त्यामध्ये अनुसूचित जाती(एसी) १५ पैकी महिला ८, अनुसूचित जमाती (एसटी) दोन पैकी महिला १ व सर्वसाधारण एकूण ५८ पैकी महिलासाठी २८ जागा आरक्षित असणार आहेत.

### सूचना हरकती दाखल करण्यासाठी कालावधी असा

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. आता राज्य निवडणूक आयोगाकडून प्रभाग रचना आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रारूप आरक्षण सोडतीचा कार्यक्रम घेण्यात आला आहे. प्रारुप आरक्षणावर हरकती व सूचना मागविण्यासाठी विहित नमुन्यात दि. १७ नोव्हेंबर २०२५ ते २४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदत आहे. प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विचार करुन महानगरपालिका आयुक्त हे दि. २५ नोव्हेंबर २०२५ ते दि. १ डिसेंबर २०२५ या कालावधीत निर्णय घेणार असून अंतिम आरक्षण विहित नमुन्यात शासन राजपत्रात सादर करण्याचा दि. २ डिसेंबर २०२५ असा आहे.

### जागांचा तपशील असा

अनुसूचित जाती १५ जागा ( ८ महिला आरक्षित), अनुसूचित जमाती एकूण दोन जागा (एक महिला राखीव), नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) एकूण २७ पैकी १४ महिलांसाठी राखीव आहेत. सर्वसाधारण ५८ जागांपैकी २८ जागा या महिलांसाठी आरक्षित आहेत. तरी एकूण १०२ जागांपैकी ५१ जागा महिलांसाठी आहेत.

### आरक्षण सोडती प्रसंगी कमालीची उत्सुकता

हुतात्मा स्मृती मंदिरात पार पडलेल्या या आरक्षण सोडती प्रसंगी इच्छुक उमेदवार माझी नगरसेवक माजी पदाधिकारी यांची उपस्थिती होती. प्रत्येक सोडती प्रसंगी उत्सुकता शिगेला जात होती. काही ठिकाणी आरक्षण जैसे ते पडल्याने इच्छुकांनी आनंद व्यक्त केला. यावेळी माजी सभागृह नेते श्रीनिवास करली, माजी नगरसेवक अरुण भालेराव, विजयी इपाकायल, शौकत पठाण, विनोद इंगळे यांच्यासह राजकीय नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

| प्रभाग क्र. १ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. २ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. ३ | |
|---|---|
| अ | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| ब | सर्वसाधारण (ओपन) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. ४ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) महिला |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. ५ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. ६ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) महिला |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. ७ | |
|---|---|
| अ | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| ब | सर्वसाधारण (ओपन) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. ८ | |
|---|---|
| अ | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| ब | सर्वसाधारण (ओपन) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. ९ | |
|---|---|
| अ | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| ब | सर्वसाधारण (ओपन) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. १० | |
|---|---|
| अ | ना.मा.प्र (ओबीसी) |
| ब | सर्वसाधारण (ओपन) |
| क | सर्वसाधारण (ओपन) महिला |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. ११ | |
|---|---|
| अ | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| ब | सर्वसाधारण (ओपन) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. १२ | |
|---|---|
| अ | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| ब | सर्वसाधारण (ओपन) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. १३ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) महिला |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. १४ | |
|---|---|
| अ | ना.मा.प्र (ओबीसी) |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. १५ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) महिला |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. १६ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. १७ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) महिला |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. १८ | |
|---|---|
| अ | ना.मा.प्र (ओबीसी) |
| ब | सर्वसाधारण (ओपन) |
| क | सर्वसाधारण (ओपन) महिला |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. १९ | |
|---|---|
| अ | ना.मा.प्र (ओबीसी) |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. २० | |
|---|---|
| अ | ना.मा.प्र (ओबीसी) |
| ब | सर्वसाधारण (ओपन) |
| क | सर्वसाधारण (ओपन) महिला |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. २१ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) महिला |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. २२ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. २३ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) महिला |
| क | सर्वसाधारण (ओपन) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. २४ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) |
| ब | अनुसुचित जाती-जमाती (एस.टी) महिला |
| क | ना.मा.प्र (ओबीसी) |
| ड | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. २५ | |
|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) महिला |
| ब | ना.मा.प्र (ओबीसी) |
| क | सर्वसाधारण (ओपन) महिला |

| प्रभाग क्र. २६ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ | अनुसुचित जाती (एस.सी) महिला | ब | अनुसुचित जाती-जमाती (एस.टी) | क | सर्वसाधारण (ओपन) |

# औरादमध्ये महादेव मंदिरावर कळसारोहण

## श्रीशैल पीठाचे डॉ. चन्नसिध्दाराम पंडिताराध्य व काशी पीठाचे डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य यांची उपस्थिती

### ५५१ जलकुंभासह सुहासिनींची मिरवणूक




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील औराद येथील श्री महादेव मंदिरावर श्रीशैल पीठाचे डॉ. चन्नसिध्दाराम पंडिताराध्य व काशी पीठाचे डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य यांच्या उपस्थितीत कळसारोहण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमानिमित्त पाच नोव्हेंबर ते दहा नोव्हेंबर दरम्यान दररोज सायंकाळी सहा ते सात दीपोत्सव तर सायंकाळी सात ते नऊ दरम्यान जिंतूर येथील ष.ब्र. अमृतेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांचे शिवपुराणावर आधारित प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. नऊ नोव्हेंबर रोजी अय्याचार्य , लिंग दीक्षा व नंदी आणि नवगृह प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

सोमवार १० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्री जागृत गणेश मंदिरापासून ५५१ सुवासिनीं जलकुंभासह सहभागी झाल्या होत्या. यावेळी रथातून श्रीशैल पीठाचे डॉ. चन्नसिध्दाराम पंडिताराध्य शिवचार्य व काशी पीठाचे डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य यांची मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी जगद्गुरूंच्या उपस्थितीत मंदिरावर कळसारोहण करण्यात आला. या कार्यक्रमासाठी माळकवठ्याचे ष.ब्र. पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी, जिंतूर येथील ष.ब्र. अमृतेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्यासह अनेक संतगण उपस्थित होते. मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीशैल वाले यांचा डॉ. शरणाप्पा वरशेट्टी यांच्याकडून श्रीशैल व काशी पिठाच्या जगद्गुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**कार्यक्रमाने भारावून गेलो**

औरादसारख्या अध्यात्मिक गावामध्ये अशा प्रकारचे कार्यक्रम घेऊन महादेव मंदिराचे कळसारोहण करण्यासाठी आम्ही साक्षीदार ठरलो. माळकवठे मठाचे मठाधीश पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी यांचे नियोजन अत्यंत उत्कृष्टपणे व नियोजनबद्ध झाले. आगामी काळात सभा मंडप होण्यासाठी पाठपुरावा कराव्यात, अशी इच्छाही काशी पीठाचे डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य यांनी आपल्या आशीर्वाचनात केले.

महादेव हा जगाचा कल्याणकर्ता असून माणसाला आशा जरूर असावेत. पण दुराशा हे माणसाला विनाशाकडे घेऊन जाते. म्हणून माणसाने आहे, त्यामध्ये समाधान मानावेत. सृष्टीनिर्माता भगवंताचा आहे, यासाठी देवाकडे सुबुद्धी देवो अशी मागणी करावेत अशी आशीर्वचनात श्रीशैल पीठाचे डॉ. चन्नसिध्दाराम पंडिताराध्य शिवचार्य यांनी केले.

या कार्यक्रमासाठी दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांनी जगद्गुरूंचे दर्शन घेतले.यावेळी मंदिर समितीचे भाजपचे जिल्हा चिटणीस यतीन शहा, अशोक वाले, माजी उपसभापती संदीप टेळे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष महासिद्ध हंडे, राजूर सोसायटीचे सचिव राजशेखर वाले, दक्षिण पंचायत समितीचे माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## ज्ञानामृत आनंदलहरी १२६४

**थोर प्रेमाचा भुकेला ।**
**हाचि दुष्काळ तयाला ।।**

प्रेम हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. प्रेमाची गरज नाही, असा माणूस पहायला मिळणे अशक्य आहे. मुक्या प्राण्यांना प्रेमाची गरज आहे, तर चालत्या-बोलत्या माणसाला प्रेमाची गरज आहे का? असा प्रश्नच उद्भवत नाही. माणूस इतरांवर तर प्रेम करतोच, पण प्रामुख्याने तो स्वत:वरही प्रेम करतो. प्रेमामुळे जीवनाला उजाळा मिळतो. ज्याला कोणावरच प्रेम करावे वाटत नाही किंवा कोणाच्याही प्रेमाचा स्विकार करावा असे वाटत नाही, असा माणूस चालता-बोलता केवळ पुतळा आहे. त्याला कोणतेही कार्य करण्यात किंवा जीवन जगण्यात स्वारस्य उरत नाही. प्रेम मिळण्याची किंवा प्रेम देण्याची आशा जेव्हा पूर्णत: संपलेली असते, तेव्हा माणसाला जीवन जगावे वाटत नाही. याचाच अर्थ असा आहे की, माणूस प्रेमापोटी किंवा प्रेमाच्या आशेवर जीवन जगत असतो. कोणी कोणावर प्रेम करावे याला निश्चित असे बंधन, मर्यादा, जरी घातल्या गेल्या नसल्या तरी शारीरिक प्रेमापेक्षा मानसिक प्रेमाची महती जास्त असते, हे विसरता येणार नाही.



बहूतांश वेळा शारीरिक प्रेमात स्वार्थ बळावतो. त्यामुळे या प्रेमात बंधने पाळणे आवश्यक ठरते. पण मानसिक प्रेमात शरीर संपर्काचा संबंध नसल्याने माणूस मनाला वाट्टेल तेवढे प्रेम करु शकतो. हे प्रेम प्रामुख्याने आचार-विचार, वर्तन, कला, कौशल्य इत्यादीच्या अनुषंगाने असते. अध्यात्मिक क्षेत्रात शारीरिक प्रेमापेक्षा मानसिक प्रेमालाच जास्त महत्व दिले आहे. दिसायला कोण कसा आहे याचा विचार येथे न करता त्याचे आचार विचार,वर्तन कसे आहे, एवढाच विचार येथे केला जातो. त्यामुळे क्षीण होणाऱ्या शरीराची मर्यादा या प्रेमात बाधा ठरत नाही. अशा प्रेमाला साक्षात भगवंतसुध्दा भुकेला आहे. भगवंताला अशा प्रेमाचा दुष्काळ जाणवतो. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**थोर प्रेमाचा भुकेला ।**
**हाचि दुष्काळ तयाला ।।**

शारीरिक सौदर्याकडे किंवा नाशवंत धनसंपत्तीकडे पाहून प्रेम करायचे ठरवले तर कधी ना कधी त्या प्रेमाचा पूर ओसरु लागतो. पण मानसिक सौंदर्याकडे पाहून प्रेम करु गेले तर प्रेमाचा हा पूर सातत्याने वाढत जातो. संत, महात्मे व भगवंत यांच्यातील प्रेम हे मानसिक सौंदर्यावर आधारीत असल्याने ते सतत वाढतच गेल्याचे पहायला मिळते. दिसायला अत्यंत कुरुप असणाऱ्या शबरीची उष्टी बोरे खाणारे प्रभू रामचंद्र, दासीपुत्र विदुराच्या कन्या खाणारा श्रीकृष्ण किंवा अत्यंत दरिद्री असणाऱ्या सुदाम्याचे कोरडे पोहे भक्षण करणारा श्रीकृष्ण पाहिला म्हणजे मानसिक प्रेमाची महती लक्षात येते. या प्रेमात शारीरिक सौंदर्याला किंवा आर्थिक दारिद्र्याला अजिबात महत्व नसते. त्यामुळे सौंदर्याच्या किंवा धन-संपत्तीच्या क्षीण होण्याचा विपरीत परिणाम या प्रेमावर होत नाही. म्हणून माणसानेसुध्दा शरीरावर, धनसंपत्तीवर प्रेम करण्यापेक्षा आचार-विचारावर, कला-कौशल्यावर प्रेम करावे. या प्रेमात स्वार्थाला स्थान नसल्याने ईर्षा, मोह, माया, अहंकार, मीपणा इत्यादीचा अडसर प्रेमात निर्माण होत नाही. आई-वडीलांचे त्यांच्या मुलावरील प्रेम हे मुलांच्या सौंदर्यावर किंवा मुलांच्या धन-संपत्तीवर अवलंबून नसते. तरीपण ते कायम टिकून रहाते. त्याप्रमाणे आई-वडील, गुरुजन, मातृभूमी, समाज, संस्कृती, निती-नियम आदीवर आपले प्रेम टिकवायला हवे. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# भाडे थकीत असलेले २१ मेजर गाळे महापालिकेने केले सील

### ८७ गाळेधारकांनी भरले थकीत १ कोटी १४ लाख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

महापालिकेच्या मालकीच्या शहरात असलेल्या अनेक गाळेधारकांकडे कोट्यावधी रुपयांची थकबाकी असल्याने महापालिका भूमी व मालमत्ता विभागाकडून कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेत विशेष पथकाने सतत लाखो रुपयाचे गाळे भाडे थकीत ठेवणाऱ्या शहरातील विविध भागातील २१ मेजर गाळे सील केले आहे. ८७ गाळेधारकांनी थकीत १ कोटी १४ लाख रुपये भरले आहेत.

महापालिकेच्या गाळेधारकांकडे चालू आर्थिक वर्ष आणि मागील आर्थिक वर्षातील सुमारे ८ कोटी रुपयाहून अधिकची थकबाकी आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी यापूर्वी सूट देणारी योजना लागू करण्यात आली होती. यानंतरही अनेक गाळेधारकांची अद्यापही मोठी थकबाकी राहिल्याने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे यांनी कारवाईचे आदेश भूमी व मालमत्ता विभागाला दिले होते. यापूर्वी मिनी गाळेधारकांकडून मोठी थकबाकी वसूल करण्यात आली होती मात्र मेजर गाळेधारकांची थकबाकी तशीच राहिल्याची ओरड देखील होत आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी आयुक्तांच्या निर्देशानुसार दि. ३ नोव्हेंबर पासून कारवाई मोहीम सुरू करण्यात आली आहे. शहरातील विविध भागात असलेल्या महापालिकेच्या मेजर गाळेधारकांकडे एकूण ४ कोटी ५२ लाख ६३ हजार ४२ रुपये इतकी थकबाकी आहे. दि. ३ ते ८ नोव्हेंबर दरम्यान कारवाई मोहिमेत विभागाने २१ गाळेधारकांवर कारवाई करत त्यांचे गळे सील केले. त्यांच्याकडे १ कोटी ३५ लाख १४ हजार ५३ रुपयांची थकबाकी होती. तर कारवाईच्या भीतीपोटी थकबाकी ८७ गाळेधारकांनी आपल्या थकबाकी रकमेतून ८ लाख १ हजार ९९४ रुपये रोख तर १ कोटी ६ लाख ९१ हजार ३१६ रुपयांचे धनादेश असे एकूण १ कोटी १४ लाख ६७ हजार ११० रुपयांचे थकीत भाडे पालिकेकडे जमा केले.



# सौर ऊर्जा प्रकल्पाची औद्योगिक भेट : एन. बी. नवले सिंहगड कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

एन. बी. नवले सिंगगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगाव, सोलापूर येथील इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागाच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी CSE Solar Sunpark Maharashtra Pvt. Ltd., माळूंब्रा या सौर ऊर्जा प्रकल्पास शैक्षणिक औद्योगिक भेट दिली.

या भेटीचे आयोजन कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली विभागप्रमुख प्रा. आर. पी. लांडगे आणि प्रा. ए. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. भेटीदरम्यान प्रा. एम. के. पवार यांनी विद्यार्थ्यांमध्ये अनुशासन राखण्याची जबाबदारी पार पाडली.

साइटवर उपस्थित साइट इंजिनिअर राजेश कडगावकर, मॅनेजर आकाश जाधव आणि साइट इंजिनिअर विश्वनाथ कुंभार यांनी विद्यार्थ्यांना सौर ऊर्जा निर्मिती प्रक्रियेची माहिती दिली. सौर पॅनेल्सची रचना, कार्यप्रणाली, देखभाल तसेच उत्पादन नियंत्रणाची प्रक्रिया विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. भेटीच्या आयोजनात महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आकाश जाधव (मॅनेजर) आणि अभिषेक मगर यांचे सहकार्य लाभले.

# गुरुवारी व शुक्रवारी शिवसेना उबाठा मुलाखतीद्वारे उमेदवार निवडणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना उबाठा पक्ष जिल्ह्यात उमेदवार घोडेबाजार रोखण्यासाठी आणि उमेदवार निवड प्रक्रियेत पारदर्शकता येण्यासाठी पक्ष प्रमुखांच्या आदेशाने सोलापूर जिल्ह्यात शिवसेना ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वात शिवसेना उपनेते शरद कोळी, महिला उपनेत्या अस्मिता गायकवाड, शिवसेना पक्ष संघटक उद्धव कदम आणि जिल्हा संपर्क प्रमुख अनिल कोकीळ पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या या सदस्यांच्या समितीच्या माध्यमातून पुरुष आणि महिला जिल्हा प्रमुखांच्या उपस्थितीत जिल्हानिहाय इच्छुकांच्या मुलाखतीद्वारे १३ आणि १४ नोव्हेंबरला उमेदवार निवड होणार आहे. या निर्णयाचे जिल्ह्यात शिवसैनिकांकडून कौतुक होत आहे.

# दुचाकीस्वाराच्या धडकेत दुसरा दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

भरधाव दुचाकी चालवून एका दुचाकीस्वाराने दुसऱ्या दुचाकीस्वारास जोरदार धडक दिली. हा अपघात गुरुनानक चौकातील सिंधी कॉलनीजवळ झाला.

याबाबत प्रमोद गौतम पौळ (वय ४९, रा. सम्राट नगर, मजरेवाडी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमएच १३ एपी ४५८३ क्रमांकाच्या दुचाकीस्वाराविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी प्रमोद पौळ हे कामानिमित्त एमएच १३ एजी ७७७५ क्रमांकाच्या दुचाकीवरून गुरुनानक चौकाकडे जात होते. त्यावेळी सिंधी कॉलनीजवळ एमएच १३ एपी ४५८३ क्रमांकाच्या दुचाकीस्वाराने दुचाकी निष्काळजीपणे चालवून पौळ यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यामध्ये पौळ यांच्या दोन्ही पायांना मार लागून दोन्ही पाय फ्रॅक्चर झाले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार
दि. १२ नोव्हेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - कार्तिक
कृ. अष्टमी (१४.५५)
ऋतु - हेमंत
नक्षत्र- उ. फाल्गुनी (२९.४९)
योग - प्रिती (११.११)
करण - तौतिल (२७.४२)

....राहू काल....
बुधवार : दु. १२ ते १.३०

दिनविशेष - १९९८: परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांना व्हिसाशिवाय मायदेशी येण्याची सुविधा देणारी पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजीन (PIO) ओळखपत्र योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी जाहीर केले.

# काम मागणाऱ्या पेक्षा काम देणारे व्हा : प्रशांत बडवे

## विश्वकर्मा फाउंडेशन व अहिल्यादेवी संस्थेच्या वतीने 'उद्योजक व्हा' शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

महिलांमध्ये उद्योजकांचे गुण उपजतच असतात. त्यामुळे त्या चांगल्या उद्योजिका होऊ शकतात. त्यामुळे काम मागणाऱ्या पेक्षा काम देणारे व्हा, असे आवाहन प्रशांत बडवे यांनी केले.

विश्वकर्मा फाउंडेशन व अहिल्यादेवी सेवा सहकारी संस्था मर्यादित यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित उद्योजक व्हा या शिबिरात प्रमुख पाहुणे ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी पवार उपस्थित होते. कार्यक्रमास सुशांत बाबरे यांची उपस्थिती होती शिबिरातील पहिले सत्र नागेश कोकरे यांनी घेतले या सातत्यानी महिलांना उद्योग करण्यासाठी प्रेरणा मिळावी अशी काही उदाहरणे सांगितले तसेच उद्योजकीय गुण स्वत:चे SWOT अनलेसेस कसे करावे आपले स्ट्रॉग पॉईट काय आहेत आपली कमतरता काय आहे व ती कमतरता दूर करण्यासाठी काय करावे लागेल यावर मार्गदर्शन केले.



दुसऱ्या सत्रात सुहास जोशी यांनी एजन्सी लाईनमध्ये काय काय धोके असतात त्याची नियमावली काय आहे त्याचे पेमेंट कधी व कसे करू शकतात व कमीत कमी किती रुपयांमध्ये हा व्यवसाय चालू करू शकतो या विषयातील मार्गदर्शन केले तिसऱ्या सत्रात विनायक बंकापुरे यांनी गारमेंट व्यवसाया बद्दल माहिती दिली तसेच गारमेंट व्यवसायात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून व्यवसाय केला पाहिजे असे काही नाही असे सांगितले तुम्ही फक्त काजी करायचे मशीन घेऊन व्यवसाय सुरू करू शकता बटन लावण्याचा व्यवसाय सुरु करू शकता किंवा इस्त्री व पॅकिंगचा व्यवसाय सुरू करू शकता पाच ते दहा मशीन घेऊन छोट्या स्वरूपात व्यवसाय करू शकता व त्यासाठी आवश्यकता काय आहे व तो कसा करावा या विषयात मार्गदर्शन केले. चौथ्या सत्रामध्ये घरगुती उद्योग करणाऱ्या श्रुती ओगले या घरामध्ये ढोकळा, पुरणपोळी तयार करून घरपोच सेवा देतात त्यांची व तावसे जे घरामध्ये इडली तयार करून घरपोच सेवा देतात त्यांची मुलाखत हे चन्नावीर बंकुर यांनी घेतली. पाचव्या सत्रामध्ये दत्ता ते चौगुले यांनी शेतीला पूरक व प्रक्रिया उद्योग व्यवसायाची माहिती दिली तसेच मालावर प्रक्रिया केल्यानंतर त्याची किंमत अनेक पटीने वाढते याची माहिती दिली. शेवटच्या सत्रामध्ये राम सुतार यांनी विविध शासकीय योजना कर्ज प्रकरण व कर्जासाठी लागणारे कागदपत्रे या विषयातील माहिती दिली. प्रास्ताविक करताना संस्थेचे अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रशेखर सुतार यांनी केले. आभार रेखा कैगार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्रीकृष्ण गायकवाड, समर्थ कळके, लक्ष्मी मिश्किन, अनिता आयवले, पूजा कुडल यांनी परिश्रम घेतले.

## दुचाकीस्वाराच्या धडकेने दुचाकीवरील उत्पादन शुल्क विभागाचा जवान जखमी

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर.**

दुचाकीस्वाराच्या धडकेने दुचाकीवरील राज्य उत्पादन शुल्क विभागाचा जवान जखमी झाला.

याबाबत जखमी गजानन काशिनाथ ढब्बे (वय ४४, रा. वीरशैव नगर, जुळे सोलापर) यांच्या फिर्यादीवरुन एमएच १३ ईएम २४९२ च्या चालकाविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ ऑक्टोबर रोजी सातच्या सुमारास गजानन ढब्बे हे दुचाकीवरून अंत्रोळीकर नगर जात होते. त्यावेळी एमएच १३ ईएम २४९२ क्रमांकाच्या दुचाकीस्वारानेस दुचाकी निष्काळजीपणे चालवून ढब्बे यांच्या दुचाकीला जोरदार पाठीमागून धडक दिली. यामध्ये ढब्बे यांच्या पायाला जर मार लागला असून दुचाकीचे २० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच ढब्बे यांच्यासोबत बसलेल्या गजानन संपत याच्या पायाचा घोटा फ्रॅक्चर झाला आहे. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार बर्हिजे पुढील तपास करीत आहेत.

# वाढत्या वाहनांची समस्या गंभीर!...

वाढत्या शहरीकरणामुळे शहर-जिल्ह्यात दिवसेंदिवस वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार सोलापूर जिल्ह्यात सुमारे १५ लाखांच्या वर वाहनांची नोंद आहे. गेल्या काही वर्षामध्ये सोलापुरातील वाहने झपाट्याने वाढली आहेत. या आकडेवारीनुसार प्रत्येकी ३ व्यक्तींमागे १ वाहन आहे. यामध्ये खासगी वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. शहरांमध्ये जवळपास ७० टक्के वाहतूक दुचाकीने होत आहे. अन्य वाहनांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. ही संख्या अशीच वाढत राहिल्यास भविष्यात अनेक समस्यांचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सरकारने खासगी वाहनांवर वेळीच नियंत्रण आणणे आवश्यक आहे.




वाहनांच्या संख्या झपाट्याने वाढत असली तरी वाहतूक समस्या तशाच आ-हेत. वाहनांची संख्या वाढत असली, तरी त्या तुलनेत मूलभूत सुविधांचा विकास वेगाने झालेला नाही. त्यामुळे शहरामध्ये विविध रस्त्यांवरील वाहतूक कोंडीची समस्या नित्याची झाली आहे. वाह-तूक कोंडीमुळे वाहने अनेक वेळ रस्त्यावर अडकून पडतात. यामुळे प्रदूषणात वाढ होऊन इंधनाचाही अपव्यय होतो. वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी, मुख्य म्हणजे प्रदूषण न होता आणि नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे, यांसाठी कोणत्याही प्रगत देशामध्ये शहरातील सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य दिले जाते. भारतात, सोलापूरात मात्र उलट प्रकार होत आहेत. रस्ते छोटे आणि अरूंद, तर गाड्या अधिक अन झाडे न्यून होत आहेत. यामुळे वायू, ध्वनी आणि सर्वच प्रकारचे प्रदूषण वाढत आहे.

शहरांत वाहतूक कोंडी असतांनाही कर्णकर्कश 'हॉर्न' वाजवले जातात. रस्त्यांवरील फलकांवर, तसेच चारचाकी गाड्यांच्या मागील भागावर 'हॉर्न' न वाजवण्याविषयी सूचना असते. प्रत्यक्षात गाडीवर सूचना असलेले चालकही मोठ्याने हॉर्न वाजवतात. गर्दीच्या ठिकाणी असलेल्या व्यक्तीला दिवसभर कर्णकर्कश आवाजातील हॉर्न ऐकावे लागतात. यावर केवळ सूचनांच्या पलीकडे हॉर्न न वाजवण्याविषयी प्रशासनाकडून कडक धोरण अवलंबले जात नाही. हॉर्नमुळे रुग्णाईत, तसेच वृद्ध यांना होणारा त्रास लक्षात घेता ते रोखण्याची संवेदनशीलतेविषयी जनजागृतीची आवश्यकता आहे. रस्त्याच्या कडेला किती झाडे असल्यावर प्रदूषण होणार नाही याचा अभ्यास केलेला नाही. वाहने उभी करण्याची व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांकडून रस्त्याच्या कडेला कुठेही वाहने उभी केली जातात. यामुळे पुन्हा वाहतूक कोंडी होते. वरवर उपाययोजना करून समस्या सुटणार नाहीत, हे समजणे आवश्यक आहे. केवळ महसूल मिळावा, यादृष्टीने वाहने विक्रीसाठी शासनाकडे धोरण आहे; मात्र रस्त्यावर येणाऱ्या गाड्यांच्या दृष्टीने सरकारचे असे निश्चित असे धोरण नाही आणि नियोजनही नाही. 'यामुळे निर्माण होर्णाया समस्या सोडवण्यासाठी सरकार ठोस भूमिकाही घेत नाही.

शहराचा एकत्रित विकास करताना शहराच्या दृष्टीने महत्त्वाचे अंग असलेल्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाही अभ्यास होणे आवश्यक आहे. रस्त्यावर कुठून आणि किती माणसे येतात ?, वाहने कुठल्या दिशेने जातात ? हा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी आवश्यक असलेला पायाभूत अभ्यासच होत नाही. त्यामुळे वाहतूक समस्येवर मात करता येत नाही. रस्ते करतांना कितीतरी झाडे तोडली जातात. त्यातील किती झाडे पुन्हा लावली जातात ? याचा प्रदूषणाच्या दृष्टीने अभ्यास व्हायला हवा.

शहरात शाळांच्या तसेच कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत रस्त्यांवर वाहतुकीची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. दिवसेंदिवस हे प्रमाण वाढतच आहे. यावर वेळीच नियंत्रण आणले नाही, तर अमर्याद वाहनांनी रस्त्यावरून वाहतूक करणे आणि चालणेही त्रासदायक ठरेल.

रस्त्यावर चालण्याचा पहिला हक्क पादचाऱ्याचा असतो. राज्यातील शहरांमध्ये पादचाऱ्यासाठी स्वतंत्र पादचारी मार्ग आहेत, मात्र बहुतांश पादचारी मार्गांवर दुकानदार आणि विक्रेते यांचे अतिक्रमणच झालेले आढळते. खासगी संपत्ती असल्यासारखे ते पादचारी मार्गाचा वापर करतात. पालिकेचा अतिक्रमण प्रतिबंधक विभाग आणि पोलीस त्यांच्याकडून चिरीमिरी घेऊन कारवाई करत नाहीत. त्यामुळे 'पादचारी मार्ग जणू विक्रेत्यांसाठीच केलेले आहेत का ?' अशी स्थिती निर्माण झाली आहे.

वाहतूक समस्येमुळे गर्दी, ध्वनी आणि वायू प्रदूषण या समस्यांसह शारीरिक समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. शहरांमध्ये गर्दीत गाडी चालवल्यामुळे, तसेच गतीरोधक आणि रस्त्यांवरील खड्डे यांमुळे पाठ, मान यांचे दुखणे, हॉर्नच्या आवाजामुळे कानठळ्या बसणे आदी अनेक विकार दिवसेंदिवस वाढत आहेत. अनेक पोलीस नियम मोडणाऱ्या लोकांकडून चिरिमिरी घेऊन कारवाई न करता सोडून देतात. वाहतुकीच्या नियमांचा भंग झाल्यास वाहन पकडले गेल्यावर 'चिरीमिरी देऊन सुटणे', हा उपाय नाही. परंतु, हे प्रकार नित्याचेच झाले आहेत. प्रत्येक वेळी व्यवस्थेला दोष देऊन चालत नाही. व्यवस्था सुधारण्यासाठी नागरिक आणि प्रशासन या दोघांचा सहभाग अन सरकारची इच्छाशक्ती महत्त्वाची आहे. वाहतुकीला शिस्त लागण्यासाठी नागरिक आणि प्रशासन या दोन्ही घटकांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यासाठी वाहतूक व्यवस्थेतील सर्व घटकांचा विचार घेऊन वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी एक सर्वंकष धोरण निश्चित करून त्यावर कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. सुधारणांचा विचार झाला पाहिजे. प्रशासनाने वाहतुकीशी संबंधित सर्वच समस्या टप्प्याटप्प्याने सोडवून आदर्श वाहतूक व्यवस्था निर्माण करावी, ही जनतेची अपेक्षा !

## महत्वाचे...



### तालुकास्तरीय टॅलेंट हंट स्पर्धेत लक्ष्मीनगर जि.प.शाळा अव्वल

**सांगोला, दि. ११ नोव्हेंबर-**

सांगोला पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित सांगोला तालुक्यातील विद्यार्थी गुणवत्ता शोध चाचणी (टॅलेंट हंट) स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. या स्पर्धेत जि.प.प्राथमिक शाळा, लक्ष्मीनगर मधील इ.२ च्या पियुष राजेंद्र नरळे याने कथाकथन स्पर्धेत आदर्श न्यायाधीश छत्रपती शिवराय ही कथा सादर करून द्वितीय, तर इ. ४ च्या मुलींच्या गटाने समूह गीत गायन स्पर्धेत हिरवी छाया हिरवी माया हे पर्यावरण विषयक लोकप्रिय लोकगीत गाऊन तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी प्रवेश मिळविला. या यशाबद्दल गट शिक्षण अधिकारी सुयोग नवले, विस्तार अधिकारी कुमठेकर, केंद्रप्रमुख धनंजय महाजन, मुख्याध्यापक संजय महाजन, लक्ष्मीनगरच्या सरपंच राणी बाड यांनी यशस्वी मुलांचे व शाळेचे अभिनंदन केले.




### लखख प्रकाशात उजळले मंगळवेढयातील श्री गणेश मंदिर

**मंगळवेढा, दि. ११ नोव्हेंबर-**

सुबक व आकर्षक दीपोत्सव २०२५ ही रांगोळी,सुमारे दोन हजार पणत्यांचा लखख प्रकाश,गणेश विहिरीतील थर्माकोलचे ब्रम्हकमळ, फटाक्यांची आतषबाजी, भजनसंध्या कार्यक्रम आदींमुळे मंगळवेढयातील श्री गणेश मंदिर परिसर गणेशभक्तांच्या गर्दीने गजबजून गेला होता. निमित्त होते, कार्तिक संकष्टीनिमित्त श्री गणेश परिवाराने आयोजित केलेल्या दीपोत्सवाचे. सांगलीच्या श्री गणपती पंचायतन संस्थानचे मंगळवेढयात श्री गणेश मंदिर असून गेल्या वीस वर्षापासून दीपोत्सवाचे आयोजन केले जाते. सायंकाळी सर्व पुरोहितांकडून श्री गणेशाची विधिवत पूजाअर्चा करून मंत्रोपचारात श्री गणेशाची आरती करण्यात आली. चळे (ता.पंढरपूर) येथील भजनरत्न अमित मोरे व सहकार्यांच्या भजनसंध्या या कार्यक्रमास मंगळवेढेकरांनी उत्स्फुर्त दाद दिली. या कार्यक्रमामुळे सायंकाळचे वातावरण भक्तीमय बनले होते. मंदिर परिसरात कळसापासून गाभार्यापर्यंत असंख्य दिव्यांनी पूर्ण मंदिर सजविण्यात आले. मंदिर परिसरामध्ये देवयानी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कोमल घोडके, शितल घोडके, मनस्वी रायबान, श्रावणी रायबान, ऋतुजा घुले, वैष्णवी ताटे, श्रावणी करकरकर, ऋतुजा करमरकर, आलिशा मुल्ला, यशश्री क्षीरसागर, माही बजाज, रेवती राऊत, मुनीर मुल्ला, कन्हैया बजाज,मल्हार देशमुख, चैतन्य वेदपाठक व सहकार्यांनी आकर्षक रांगोळी काढली होती. दीपोत्सव २०२५ ही रांगोळी तसेच पेंटर सदाशिव जामदार यांनी थर्माकोलच्या सहाय्याने बनविलेले विहिरीतील ब्रम्हकमळ सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.



### ओंकार साखर कारखान्याच्या २५ हजार साखर पोत्यांचे पूजन

**पिलीव, दि. ११ नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याच्या या हंगामातील २५००५ पोत्याचे पूजन कारखान्याचे संचालक प्रशांतराव बोत्रे-पाटील हस्ते करण्यात आले. ओंकार साखर कारखाना परिवाराचे संचालक प्रशांतराव बोत्रे पाटी ल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना बोत्रे पाटील म्हणाले की ओंकार परिवाराचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील, संचालिका रेखा बोत्रे-पाटील यांच्या मार्गदर्शनखाली २०२६ या गळीत हंगामात आधिकारी व कर्मचारीवर्ग यांनी नियोजन केल्याने सुरूवातीपासून नवीन व जुना कारखाना पूर्ण क्षमतेने चालू असून उपपदार्थ प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. त्यामुळे या परिसरातील संपूर्ण ऊसाचे नियोजन बध्द गाळप केले जाईल तरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला परिपक्व ऊस ओंकार साखर कारखान्याला घालावा, असे आवाहन बोत्रे-पाटील यांनी केले. यावेळी जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे, चीफ इंजीनियर तानाजीराव देवकते, प्रोसेसिंग मॅनेजर समाधान गायकवाड, इलेक्ट्रिक विभाग प्रमुख धनाजीराव पवार, मेजर मोहन घोडके, केन मॅनेजर शरद देवकर एच् आर मॅनेजर निलेश गुरव, ओ. एस. रमेश आवताडे, ऊस उत्पादक शेतकरी रामभाऊ मगर, नितीन जाधव उपस्थित होते.

### मंगळवेढा शहर परिसरातून २७ हजारांच्या शेळयांची चोरी

**मंगळवेढा, दि. ११ नोव्हेंबर-**

मंगळवेढा शहर परिसरातील २७ हजार किंमतीच्या तीन शेळया चोरून नेल्याची घटना घडली असून याप्रकरणी एका स्कार्पिओ गाडीच्या अज्ञात चालकाविरूद्ध चोरीचा गुन्हा मंगळवेढा पोलिसात दाखल झाला आहे. फिर्यादी महादेव मुदगुल यांचा सांगोला नाका परिसरात दि.९ च्या मध्यरात्री २.३० च्या दरम्यान घरासमोरील जागेत बांधलेल्या २७ हजार रूपये किंमतीच्या तीन शेळया महिंद्रा कंपनी स्कार्पिओ गाडी क्र.एम.एच. ०२, सी व्ही ५८५८ वरील अज्ञात चालकाने स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता चोरून घेवून गेला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलिस हवालदार दत्तात्रय व्हरे हे करीत आहेत.

# अक्कलकोट तालुक्यात २७ रस्ते मंजूर

## माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रेंच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.११ नोव्हेंबर-**

मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत अक्कलकोट तालुक्यात एक किमी अंतराचे २७ रस्ते मंजूर केले असल्याची माहिती माजी गृहराज्यमंत्री शिंदे शिवसेना नेते सिध्दाराम म्हेत्रे यांनी दिली.

रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्याकडे माजी मंत्री म्हेत्रे यांनी सदर पाणंद रस्त्याची मागणी केली होती. त्यानुसार मंजुरीचे पत्र मिळाले आहे. शेतकऱ्यांना थेट शेतात जाण्यासाठी या रस्त्याचा वापर करून शेत माल ने आण करण्यासाठी उपयोग होईल. अक्कलकोट विधानसभा मतदार संघातील शेत पाणंद रस्ते खराब झाले असून त्या रस्ते कामांना मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत हालहल्ली मैं, येथील अप्पासाहेब पाटील शेती ते परमेश्वर पुजारी शेतापर्यंत चिक्केहल्ली येथील लक्ष्मी मंदिर ते सोमनाथ दसाडे शेत पर्यंत. इब्राहिम पुर, येथील संजय पाटील शेत ते मुमताज शेख शेत पर्यंत उडगी येथील सिद्रामप्पा येळमेळी शेत ते शरणप्पा येळमेळी शेत, हंद्राळ, येथील सिद्धाराम तुप्पद शेत ते राम पुजारी शेत, सदलापूर ते हिरोळी रस्ता, सदलापूर, अंदेवाडी (ज) येथील भीमाशंकर बिराजदार शेत ते श्रीशैल पाटील, बिजगेर येथील भीमाशंकर बिराजदार शेत ते महादेव बिराजदार शेत. तळेवाड येथील हनुमान मंदिर ते रुडेवाडी, चिचोळी (मै) ते दूधनी रस्ता, चिचोळी (मे), पाणी टाकी ते लिंबीतोटे वस्ती, नागणसुर, अक्कलकोट रोड ते संगोळगी शिवार, सलगर,कंटेहल्ली येथील



बसवराज जकापुरे शेत ते दस्तगीर जमादार शेत पर्यंत,मिरजगी येथील खाजण्या वस्ती ते दत्तात्रय जुना जकापुरपर्यंत, तडवळ येथील निगप्पा केम शेट्टी शेत ते मनोज कुलकर्णी शेत पर्यंत,हन्नूर येथील बसवराज परत्नल शेत ते श्रीशैल भरम शेट्टी शेत पर्यंत,हन्नूर येथील विश्वनाथ भरमशेट्टी शेत हे शिवानंद इरवाडकर शेत पर्यंत,हन्नूर येथील वाडेकल वस्ती ते तिपन्ना घोडके शेत पर्यंत, स्वामी शेत ते गणि शेत पर्यंत, चप्पळगांव येथील बसवराज अचलेर शेत ते कदम शेत पर्यंत, नन्हेगांव येथील मोदींचे मुस्लिम कबरस्तान, नन्हेगांव येथील कृष्णा वाडेकर शेत पर्यंत, डोंबरजवळगे येथील इस्माईल शेख शेत, परमेश्वर पाटील शेत ते नारायणकर शेत महबूब शिवरे ते दर्गा पर्यंत, चुंगी येथील सुरेश मानेसे ते निंगाप्पा कोळी शेत पर्यंत, कुरनुर येथील चिदानंद मोरे शेती नागोबा मंदिर पर्यंत, कुरनुर येथील तानाजी शिंदे शेत ते निंगाप्पा इंडे शेत पर्यंत, आदी गावांतील रस्त्यांचा एक किमी अंतराचे मातोश्री ग्राम समृध्दी पाणंद रस्ते अंतर्गत २७ रस्त्यांना मंजुरी मिळाली आहे. याबद्दल माजी गृह राज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, शंकर म्हेत्रे यांनी शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र राज्य रोजगार हमी मंत्री शिवसेना नेते ना. भरत गोगावले यांचे आभार मानले व तालुक्याच्या विकासकामांसाठी अशीच भरीव निधी द्यावी यापुढेही देत राहावे अशी मागणी केली.

### उमरड येथे अपघात टाळण्यासाठी गतीरोधकची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.११ नोव्हेंबर**

उमरड (ता.करमाळा) येथील कुंभेजफाटा ते करपडीफाटा या नवीन रोडवर गावात योग्य ठिकाणी गतिरोधक असण्याची गरज व्यक्त केली जात आहे. उमरड गाव हे



दोन्ही बाजूने तीव्र उतारखाली असल्याने या रस्त्याने वाहतूक करणारी वाहने भरधाव वेगाने येत आहेत. गावठाणातून मेन रोडकडे येणाऱ्या रस्ताच्या जवळ तसेच पूर्व सोगाव रोडच्या जवळ आणि प्राथमिक व माध्यमिक शाळा रोडवर गतिरोधकची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या रोडने भिगवण,बारामती व पुणे शहरांकडे जाणारा जवळचा मार्ग म्हणून पाहिले जात आहे. या रस्त्याने मोठ्या प्रमाणावर ऊस व केळीची वाहतूक सुरू असते. गुणवत्ता पूर्ण या रस्त्यावर जोराची वाहतूक सुरू आहे. गावातील अपघात टाळण्यासाठी वेळीच पाऊल उचलून सार्वजनिक बांधकाम विभागाने सबंधिक कॉन्ट्रॅक्टरला सूचना करून गावठाण जवळ गतिरोधक तयार करावेत. अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.



# केळीचे भाव घसरल्याने शेतकरी अडचणीत

## एक्स्पोर्ट केळी दहा ते बारा तर स्थानिक दोन ते चार रुपये किलोने विक्री

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.११ नोव्हेंबर**

करमाळा तालुक्यात बहुतांश शेतकऱ्यांनी ऊस पिकाला पर्याय म्हणून जास्त उत्पादन देणारे पीक म्हणून केळीची लागवड केली. मात्र याच केळीने केळी उत्पादक शेतकरी पुरता अडचणीत आणला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील वातावरण केळी पिकासाठी पोषक असल्याने पाण्याची उपलब्धता असणाऱ्या ठिकाणी केळी पीक घेतले जाते.त्यात उजनी धरण क्षेत्रांत उसाच्या बरोबर केळी लागवड शेतकऱ्यांनी केली.मात्र यंदा जास्त प्रमाणावर पाऊस झाल्याने केळीची गुणवत्ता बिघडली व उत्पादनात मागणीच्या प्रमाणात वाढ झाल्याने केळीला अत्याल्प दर मिळत आहे. यामुळे शेतकरी चिंतेत आहे. जास्त पैसे देऊन केळीची रोपे खरेदी केली व खत दुकानदारांना उत्पादनंतर पैसे देण्याचे ठरले मात्र केळीला दरच नसल्याने खत व ओषध दुकानदारांची उधारी कशी द्यायची ही मोठी अडचण निर्मान झाली आहे. यंदा कोरोना काळापेक्षाही केळीला कमी भाव मिळत आहे. उत्पादन खर्च जास्त व उत्पन्न कमी अशी दयनीय अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे.त्यामुळे सुरू केळीवर शेतकरी रोटावेटर फिरवून बाग मोडत आहेत. खोडवा केळीला नेण्यासाठी स्थानिक व्यापारी शेतात यायला तयार नाहीत. आणि आले तर एक-दोन रुपये किलोने केळीची मागणी केली जात आहे

> केळीला पावसाळ्यात वाचवण्यासाठी खत व औषधांचा खूप खर्च झाला आहे. कर्ज काढून पिकं आणली मात्र कवडीमोल किंमतीने भाव मिळाल्याने केळीचा खर्चही निघत नाही.त्यामुळे खर्चाचा मेळ कसा बसवायचा या चिंतेत आम्ही आहोत
> **- चांगदेव चौधरी,** केळी उत्पादक शेतकरी, उमरड

> यंदा केळीची आवक मोठ्या प्रमाणावर आहे.त्या तुलनेत मागणी मात्र कमी आहे.सततच्या पावसाने केळीची गुणवत्ता कमी झालेली आहे.थोड्याच दिवसात केळीच्या दरात वाढ अपेक्षित आहे.
> **- देवा जानकर,** केळी व्यापारी, टेंभुर्णी

### आदर्श आचारसंहितेचे पालन करा: पो. नि. बालाजी कुकडे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बार्शी शहरात लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी बार्शीकर नागरिकांना आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

पोलीस निरीक्षक कुकडे यांनी सांगितले की, सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणे, वाद निर्माण करणारे मजकूर प्रसारित करणे अथवा अफवा पसरविणे हे कायद्याने गुन्हा असून अशा प्रकरणांवर पोलिसांकडून कायदेशीर कारवाई करण्यात येईल. आपापसात भांडण-तंटे, वाद निर्माण करणारे कृत्य टाळावेत, अन्यथा प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे काही जणांवर तडीपारीची कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बार्शी शहरात अवैध दारु विक्री, उघड्यावर मद्यपान करणारे किंवा समाजविघातक वर्तन करणाऱ्यांवर पोलिसांकडून मोहीम राबवून कारवाई केली जाणार आहे. पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी नागरिकांना शांततेत निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे, आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे व पोलीस प्रशासनास कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी मदत करण्याचे आवाहन केले आहे.

### तरुणास मारहाण करणाऱ्या दोघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

सिध्देश्वर मंदीर येथे महाविद्यालयीन तरूणास मारहाण करणाऱ्या दोघांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत प्रज्वल जगदेवप्पा धनुरे (वय १९, रा. सन सिटी, दमाणी नगर, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन नचिकेत रावल (रा. येवला, नाशिक) आणि अमोल रसाळ (रा. अहिल्यानगर, सध्या रा. भवानी पेठ) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धनुरे हा नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात शिकत आहे. धनुरे याची नचिकेत रावल आणि अमोल रसाळ याच्याशी ओळख आहे. ९ नोव्हेंबर रोजी सिध्देश्वर मंदीर येथे नचिकेत रावल व अमोल रसाळ यांची धनुरे हा बदनामी करतो या गैरसमजुतीतून धनुरे यास मिरहाण केली. रावल याने चाकू दाखवून धनुरे यास ठार मारण्याची धमकी दिली. तसेच हातातील कड्याने धनुरे याच्या कपाळावर मारून त्यास जखमी केले. सहायक पोलिस निरीक्षक जाधव पुढील तपास करीत आहेत.

# सपोनि दिलीप ढेरे यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ नोव्हेंबर-**

कर्तव्यनिष्ठेचा आदर्श ठेवत नागरिकांच्या सेवेत उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांना 'एकता महिला मंच' आयोजित उत्कृष्ट सेवा गौरव राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले. काही तांत्रिक कारणामुळे ढेरे यांना पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी उपस्थित राहता आले नव्हते. त्यामुळे एकता महिला मंचच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी बार्शी तालुका पोलीस स्टेशन येथे हा गौरव समारंभ पार पाडला.

पोलीस स्टेशनच्या प्रांगणात आयोजित या विशेष सत्कार समारंभात, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे आणि त्यांच्या पत्नी मनीषा ढेरे यांना सपत्नीक सन्मानित करण्यात आले. एकता महिला मंचच्या पदाधिकाऱ्यांनी ढेरे यांना सन्मानचिन्ह, शाल आणि फेटा प्रदान करून त्यांचा सत्कार केला.

गौरव समारंभ यशस्वी करण्यासाठी बार्शी तालुका पोलीस स्टेशन आणि एकता महिला मंचचे अनेक सदस्य उपस्थित होते. यावेळी सत्काराच्या वेळी पोलीस उपनिरीक्षक वळसने, पोलीस उपनिरीक्षक घोळवे, पोलीस हवालदार केकाण, पोलीस हवालदार मंगरुळे, पोलीस हवालदार राहुल बोंदर, पोलीस हवालदार अभिजीत गाटे उपस्थित होते.

तसेच एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर यांच्यासह एकता महिला मंचच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती होती. मंचाच्या रेश्मा मुकटे, गीतांजली जोशी, लक्ष्मी सुतार, नुरजहा शेख, पद्मजा आवटे, स्वाती चव्हाण, वनमाला कोळी, आशा विभुते, सानिया सय्यद, रत्नमाला कोळी, सुरेखा कोळी उपस्थित होते.

#### संघर्षातून यशाकडेचा प्रवास



कोल्हापूर जिल्ह्यातील ढेरेवाडी (ता. राधानगरी) हे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे मूळ गाव. त्यांचे वडील ऊसतोड कामगार होते आणि अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून त्यांनी शिक्षण पूर्ण केले. सन २०१३ मध्ये त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात ७ वा क्रमांक मिळवत पोलीस उपनिरीक्षक) पदी निवड मिळवली. नक्षलग्रस्त भागात सेवा: प्रशिक्षणानंतर त्यांची पहिली नेमणूक थेट गडचिरोली येथे झाली, जिथे त्यांनी सी-६०' (उ-६०) कमांडो पथकात ३० महिने सेवा दिली. शौर्य आणि पराक्रम: गडचिरोली येथे नक्षलवाद्यांसोबत झालेल्या ५ चकमकींमध्ये त्यांनी पराक्रम गाजवला आणि ३ नक्षलवाद्यांचे मृतदेह हस्तगत करण्यात यश मिळवले. महत्त्वाचे सन्मान: त्यांच्या अतुलनीय शौर्याबद्दल त्यांना पोलीस महासंचालक पदक, महाराष्ट्र शासनाचे विशेष सेवा पदक, आणि केंद्र शासनाचे खडतर सेवा पदक यांसारख्या महत्त्वाच्या पदकांनी गौरविण्यात आले. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांमध्ये स्थानिक गुन्हे शाखेमध्ये (LCB) कार्यरत असताना अनेक गुंतागुंतीच्या गुन्ह्यांची यशस्वी उकल करून त्यांनी आपले तपास कौशल्य सिद्ध केले. बार्शीतील मोठी कारवाई: बार्शीत API म्हणून काम करताना त्यांनी सोन्याच्या दुकानातील चोरीचा छडा लावून अंतरराज्य टोळीला पकडले. त्यांनी बार्शीत जवळपास ७०० किलो गांजा जप्त करण्याची, तालुका स्तरावरील सर्वात मोठी कारवाई केली, ज्यामुळे अवैध धंद्यांना मोठा चाप बसला. बार्शी तालुक्यातील सुर्डी बँक रॉबरीतील आरोपींना त्यांनी अवघ्या ४५ मिनिटांत पकडून आपली तत्परता दाखवली. वर्तमान स्थिती: सध्या ते बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी म्हणून कर्तव्यनिष्ठेने कार्यरत आहेत. त्यांचा जीवनप्रवास जिद्द असेल तर यश नक्कीच मिळते या उक्तीची साक्ष देतो.

# अक्कलकोटमध्ये नगराध्यपदासाठी होणार रस्सीखेच

## सर्वच पक्षात सुरू आहेत राजकीय डावपेच

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि ११ नोव्हेंबर-**

अक्कलकोटचे नगराध्यक्षपद सर्वसाधारण असल्याने सर्वच पक्षांत इच्छुकांची संख्या वाढली आहे. अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधल्याने या पदासाठी चांगलीच रस्सीखेच होणार हे मात्र निश्चित आहे.

वॉर्डनिहाय आरक्षण जाहीर झाल्याने इच्छुक उदंड झाले आहेत. कोणाला उमेदवारी मिळणार हे अवघ्या दोन दिवसांत समजणार आहे. अक्कलकोट व दुधनी येथे भाजपाविरुद्ध शिवसेना शिंदे गट व काँग्रेस एकत्र लढणार की स्वतंत्र लढणार हे पहावे लागणार आहे. मैंदर्गीत भाजप कमळ चिन्हावरच लढणार असल्याचे सांगितले जात आहे. नगराध्यक्ष पदाकरिता गुडघ्याला बाशिंग बांधलेल्यांकडून काही जणांची राजकीय कोंडी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. भाजपाविरोधी नेत्यांना एकत्र करून आघाडी करण्याचेही प्रयत्न सुरु आहेत मात्र आ.कल्याणशेटी यांच्या करिष्म्यापुढे त्यांचा कितपत निभाव लागणार हे काळच ठरवेल.

भाजपाकडून नगराध्यक्ष पदाकरिता माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, माजी उपनगराध्यक्ष महेश हिंडोळे, काँग्रेसकडून माजी नगराध्यक्ष डॉ. सुवर्णा



मलगोंडा, अशपाक बळोरगी तर शिवसेना शिंदे गटाकडूनचे उमेदवार गुलदस्त्यात आहेत. भाजपाचे माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी यांनी अद्याप भूमिका जाहीर केलेली नाही. मात्र भाजपकडून महेश हिंडोळे यांना उमेदवारी जर मिळाली नाही तर बसलिंगप्पा खेडगी हे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असतील अशी चर्चा आहे.

आमदार कल्याणशेट्टी यांच्या कार्यकाळातील विकासकामे, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यात आलेले यश ही भाजपाची जमेची बाजू आहे. याचा लाभ निश्चितच सत्ताधाऱ्यांना मिळणार आहे. काँग्रेसचे माजी राज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याने त्याचा फायदा नगरपालिका निवडणुकीत होणार की नाही हे लवकरच स्पष्ट होणार आहे. काँग्रेस एकाकी पडल्याने तालुक्यात दयनीय अवस्था झाली असली तरी आजपर्यंतच्या निवडणुका पाहता काँग्रेस विरुद्ध भाजप अशाच झाल्या आहेत, मात्र ही निवडणुक व्यक्ती की पक्ष श्रेष्ठ अशी होणार याकडे लक्ष लागून राहिले आहे. अक्कलकोट शहराची लोकसंख्या सुमारे ४० हजारांच्या आसपास आहे. येथे लिंगायत समाजाची निर्णायक मते असल्याने प्रत्येक पक्षाने लिंगायत समाजाचा उमेदवार देण्याचा प्रयत्न राहणारच आहे त्याचबरोबर इतर समाजात देखील मते ही महत्त्वाची ठरणार आहेत. मैंदर्गी नगर परिषद नगराध्यक्ष पद हे अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव असल्याने येथे स्थानिक गट एकत्र येत कोणता उमेदवार देणार तर भाजपा स्वतंत्र निवडणूक लढवून लोकसभा निवडणूक २०१९ चा पॅटर्न राबविणार असल्याची चर्चा सुरू आहे. दुधनी येथे नगराध्यक्ष पद सर्वसाधारण जागेसाठी राखीव असल्याने येथे भाजपा विरुद्ध शिवसेना शिंदे गट अशी लढत होण्याची शक्यता आहे. अक्कलकोट नगरपरिषदेवर गतकाळात भारतीय जनता पार्टीची सत्ता होती तर नगराध्यक्षा सह १६ नगरसेवक भाजपाचे निवडून आले होते. काँग्रेस ८, राष्ट्रवादी १, अपक्ष १ पक्षीय बलाबल होते. यंदा मात्र प्रत्येक प्रभागात भारतीय जनता पार्टी कडून इच्छुकांची भाऊ गर्दी दिसणार आहे. शिवसेनेकडून गत वेळेस तीन उमेदवारांनी निवडणूक लढविली मात्र त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते. यंदा मात्र भाजपा विरुद्ध काँग्रेस, शिंदे गट शिवसेना अशी लढत होणार का हे देखील पहावे लागणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अक्कलकोटमध्ये भाजपा इच्छुकांच्या मॅरॉथॉन मुलाखती

### प्रत्येक वार्डात किमान डझनभर इच्छुक

**अक्कलकोट, दि. ११ नोव्हेंबर-**

अक्कलकोट नगर पालिकेच्या निवडणुकीकरिता भाजपा कार्यालयात पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्यासह भाजपा पदाधिकारी व निरिक्षक यांच्या उपस्थितीत मॅरॉथॉन मुलाखाती घेण्यात आल्या. यावेळी इच्छुकांची प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी २५ नगरसेवकपदांसाठी व नगराध्यक्षपदासाठी इच्छुकांच्या मुलाखाती घेण्यात आल्या. प्रभाग क्र. १ पासून ते प्रभाग क्र. १२ पर्यंत प्रत्येक प्रभागात इच्छुकांची संख्या प्रचंड होती.






## महत्त्वाचे



### एसपीएम स्कूलची समूहनृत्य अंतिम फेरीत प्रशंसनीय कामगिरी

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई, घटक संस्था बालरंग भूमी परिषद, मुंबई, शाखा यांच्यावतीने हरीभाई देवकरण प्रशालेत महाराष्ट्रातील लोककलांवर आधारित जल्लोष लोककलेचा हा बालकलावंतांचा महोत्सव उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सोलापूर जिल्हा शाखेतील विविध शाळांनी सहभाग घेतला. त्यामध्ये एसपीएम स्कूल येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेले पोतराज हे लोकनृत्य विशेष आकर्षण ठरले. पारंपरिक वेशभूषा, नृत्य व सादरीकरणामुळे प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या उल्लेखनीय सादरीकरणाबद्दल एसपीएमच्या विद्यार्थ्यांना प्रशंसनीय उत्तेजनार्थ पारितोषिक प्रदान करण्यात आले. शाळेच्या प्राचार्या संगीता कोळी यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनीही सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यासाठी विद्यार्थ्यांना शाळेच्या शिक्षिका अश्विनी जानराव आणि श्रुतिका कामुनी यांचे मार्गदर्शन लाभले.

### मंगळवेढा-मरवडे मार्गावर कत्तलखान्याकडे जाणारा जनावरांचा टेंम्पो पकडला

**मंगळवेढा, दि. ११ नोव्हेंबर-**

मंगळवेढा-मरवडे मार्गावर कत्तलखान्याकडे जनावरे घेवून जाणारा टेंम्पो गो-रक्षकांनी पकडून ५ लाख १५ हजारांच्या किंमतीच्या जनावरांचा जीव वाचवला असून या प्रकरणी सिद्धाराम पुजारी, बिराप्पा पुजारी (रा.हत्ताळी), आकाश तोरवे (टाकळी), सिरसू आंगडे (रा. लोणी) या चौघांविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी पोलिस अमलदार विनायक जाधव हे दि.२ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता डायल क्रमांक ११२ वर कर्तव्यावर असताना १०.४३ वाजता मोबाईलवरून गोपाळ सुगंधे यांनी कॉल करून सांगितले की मंगळवेढा-मरवडे रोडवरील एका चहा कॅन्टीनपासून थोडयाच अंतरावर आम्ही गो-रक्षकांनी कत्तलखान्याकडे जनावरे घेवून जाणारा टेंपो क्र. के.ए.२८, बी ६३४३ हा अडवला असून आम्हाला पोलिस मदत हवी आहे. असा कॉल येताच सदर ठिकाणी सहाय्यक फौजदार देढे व अन्य पोलिस कर्मचारी घटनास्थळी पोहचले असता तेथे गो रक्षक प्राणीमित्र अमोल चौगुले (रा. कुरूल, यशवंत सुर्वे रा.मोडनिंब) या दोघांनी जनावरांचा टेंम्पो थांबवल्याचे निदर्शनास आले. हा टेंम्पो पोलिसांनी ताब्यात घेवून ५ लाख १५ हजार किंमतीच्या देशी खिलार गायी असल्याचे दिसून आले. पोलिस अंमलदार विनायक जाधव यांच्या फिर्यादीवरून वरील चौघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### फर्निचर दुकानातून रोकड चोरणाऱ्यास अटक

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

रंगभवन येथील फर्निचर दुकानाच्या ड्रॉव्हरमधून ४९ हजारांचा मुद्देमाल चोरून नेणाऱ्यास सदर बझार पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून १०० टक्के मुद्देमाल जप्त केला. अभिषेक अर्जुनसिंग गुंगेवाले (वय २१, रा. महात्मा फुले झोपडपट्टी, सिद्धार्थ चौक, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत आबीन अब्दुल रहिमान शेख (वय ४२, रा. जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आबीन शेख यांचे रंगभवन येथील रिलॅक्स ऑन या फर्निचर दुकानांमधील ड्रॉवर मधून १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी फिर्यादीची नजर चुकवून काऊंटरच्या ड्रॉवर मधून रोख ३४ हजार रुपये व १५ हजार रुपयांचा एक मोबाईल हँडसेट असा ४९ हजारांचा मुद्देमाल अज्ञात इसमाने चोरून नेला होता. सदर बझार पोलिस ठाण्यातील हवालदार सागर सरतापे व संतोष पापडे यांना मिळालेल्या माहितीवरून अभिषेक गुंगेवाले यास ताब्यात घेऊनत्याच्याकडून चोरीस गेलेले रोख ३४ हजार रुपये व १५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल हँडसेट जप्त केला. ही कारवाई ही पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस उपायुक्त परिमंडळ विजय कबाडे, सहाय्यक पोलीस उपायुक्त दिलीप पवार मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर, पोलीस निरीक्षक भालचंद्र ढवळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर काटे यांच्या नेतृत्वाखाली हवालदार सागर सरतापे, संतोष पापडे, हणमंतु पुजारी, विशाल बोराडे, अनमोल लट्टे यांनी पार पाडली.

### अल्पवयीन मुलीवर दुष्कर्म केल्याप्रकरणी युवकास उच्च न्यायालयातून जामीन

**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

पंढरपूर तालुक्यातील अल्पवयीन मुलीवर दुष्कर्म केल्याप्रकरणी दिगंबर कुमार शिवपालक (वय २४, रा. उंबर पागे, ता. पंढरपूर) यास कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार दिघे यांनी जामीन मंजूर केला. ९ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री दहा वाजाचे सुमारास पीडिता हि तिचे आई वडिलांसोबत जेवण करून घरात झोपली होती. पहाटे ४ वाजाचे सुमारास पीडितेच्या आईस जाग आली त्यावेळी पीडिता हि घरात दिसून आली नाही. त्यावर पिडीतेच्या आईने कोणीतरी अज्ञात कारणावरून पिडीतेला फूस लावून पळून नेले आहे अशी फिर्याद करकंब पोलीस ठाण्यात दिली होती. पोलिसांनी सदर गुन्ह्याचा तपास केला असता दिगंबरने पिडीतेस आत्महत्या करण्याची भिती दाखवून आई-वडिलांच्या रखवालीतून तीस घराच्या बाहेर काढून तीस मोटर सायकल वर बसून वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिचे वर दुष्कर्म केले असे निष्पन्न झाले. त्यावरून दिगंबर यास पोलिसांनी अटक अटक केली होती. या गुन्ह्यात जामीन मिळवा म्हणून दिगंबरने दाखल केलेला अर्ज पंढरपूर येथील सत्र न्यायालयाने फेटाळल्यानंतर दिगंबरने कोल्हापूर उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. या अर्जाच्या सुनावणीच्या वेळी वकिलांनी मांडलेला युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायालयाने २० हजार रुपयांच्या जातमुचुलक्यावर जामीन मंजूर केला. यात सरकार तर्फे अॅड विजयालक्ष्मी कामात यांनी अर्जदार आरोपीतर्फ अॅड. रितेश थोबडे यांनी काम पाहिले.

## पूल नसल्याने जगण्याची लागलीय 'वाट'

### वाळूज ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांचा नदीतून दररोज धोकादायक प्रवास



**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि. ११ नोव्हेंबर-**

देशभर स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव सुरू असताना वाळूज (ता. मोहोळ) येथील ग्रामस्थांना मात्र अजून मूलभूत सुविधांसाठीच झगडावे लागत आहे. येथील नदीवरील पुलाची वाट पाहून थकलेल्या ग्रामस्थांच्या जगण्याचीच 'वाट' लागली आहे.

पुलाच्या अभावामुळे गावकऱ्यांना पावसाळ्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. नदीला पूर आल्यावर वाहतूक बंद होते, येथील ग्रामस्थांना दैनंदिन दळणवळणासाठी वाळूज गाठावे लागते. परंतु, नदीला पावसाळ्यात पूर आल्यानंतर अडकून बसावे लागत आहे. विद्यार्थ्यांना शाळेला जाणे-येणे अवघड होते. परिणामी विद्यार्थ्यांना शाळेत जाता येत नाही अशा स्थितीत विद्यार्थी काय शिक्षण घेणार? असा प्रश्न पालकातून होत आहे. वाळूज हे भोगावती आणि नागझरी नद्यांच्या संगमावरील गाव. वर्षानुवर्षे निवडणुकीच्या काळात लोकप्रतिनिधी येतात, लवकरच पूल उभा राहील अशी आश्वासने देतात आणि निवडणुका संपताच ती आश्वासने विसरतात. दरवेळी आशा निर्माण होते आणि पुन्हा तीच निराशा. भोगावती नदीमुळे गावाची दोन भागात विभागणी झाली आहे. वाळूज-कळमण-सोलापूर रस्त्यावर अद्यापही पूल बांधला नाही. गावाचा पूर्वभाग नदीच्या पलीकडे जाधववस्ती असून या नदीवर पूल नसल्याने पावसाळ्यात तसेच बंधाऱ्याची दारे टाकून पाणी अडविल्यानंतर ग्रामस्थांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो. गावातील बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून आहेत. पुलाअभावी शेतमाल बाजारात नेण्यासाठी शेतकऱ्यांना लांबचा पर्यायी मार्ग वापरावा लागतो. त्यामुळे वाहतूकखर्च वाढतो आणि वेळ व श्रम दोन्ही वाया जातात. पूल नसल्याने पिकांची विक्री करताना आम्हाला नुकसान होते, आजारी रुग्णांना दवाखान्यात नेणे अशक्य बनते,गावातील ग्रामस्थांना पर्याय नसल्यामुळे नदीमधूनच वाट शोधत पुढे जावे लागत आहे.

या नदीवरील पुलाचे बांधकाम करून शेतकरी, विद्यार्थी, महिला रुग्ण,कामगार, ग्रामस्थांची अडचण दूर करावी अशी मागणी ग्रामस्थांकडून वारंवार होत आहे, पण लोकप्रतिनिधी आणि शासनाकडून याकडे अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मागण्यांनंतरही या नदीवर पूल बांधकामाची प्रक्रिया सुरू झालेली नाही.

वाळूजच्या भोगावती-नागझरी संगमावर पूल नाही प्रश्न असा आहे की, लोकप्रतिनिधींनी ही वस्तुस्थिती किती वेळा पाहिली आणि किती वेळा विसरली? आणि हा केवळ एका गावाचा प्रश्न नाही हा शासनाच्या निष्क्रियतेचा, लोकप्रतिनिधींच्या बेफिकीरीचा दुर्लक्षित वास्तवाचा चेहरा आहे. ग्रामस्थांनी वारंवार मागणी करूनही जर शासन आणि प्रशासकीय यंत्रणा दुर्लक्ष करत असतील, तर ही केवळ प्रशासनाची अपयशकथा नसून, लोकशाहीवरील विश्वासालाही धक्का आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही आमच्या गावात पूल नाही, ही खेदजनक गोष्ट आहे. हे शासन आणि लोकप्रतिनिधी दोघांचं अपयश आहे.

- **सुधीर मोटे**, ग्रामस्थ

पावसाळा सुरू झाला की आमचं आयुष्य थांबतं. नदीला पूर आला की गावाशी संपर्क तुटतो. प्रत्येकवेळी जीवावर खेळून होडीतून प्रवास करावा लागतो. आमच्या शेतीमालाचं नुकसान होतं. बाजारात पोहोचण्यासाठी लांब वळसा घ्यावा लागतो आणि ट्रॅक्टरचं भाडं दुप्पट लागतं,होडीतून प्रवास करताना मुलांना घेऊन जाणं म्हणजे भीतीदायक प्रसंग असतो. शासनाने तातडीने पूल बांधकामाची प्रक्रिया सुरू करावी.

**-आण्णासाहेब कादे,** ग्रामस्थ.

शासन आणि लोकप्रतिनिधींच्या निष्क्रिय भूमिकेमुळे ग्रामस्थांमध्ये असंतोष आहे. संयम संपत चालला आहे शासनावरील विश्वास डळमळीत झाला आहे.



### आदिला नदी खोलीकरण, रुंदीकरण हाच पूरनियंत्रणावर उपाय : पर्यावरणतज्ज्ञ नारायणपेठकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

पूरनियंत्रणासाठी आदिला नदीचा शास्त्रीय अभ्यास करण्याची गरज अधोरेखित करताना नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण हेच दीर्घकालीन व परिणामकारक उपाय आहे, अशी माहिती पर्यावरणतज्ज्ञ अनिल नारायणपेठकर यांनी दिली. कृती समिती बैठक समितीचे अध्यक्ष राजकिरण चव्हाण, डॉ. उत्कर्ष वैद्य, प्रवीण तळे, शिरीष गोळवलकर, अरविंद मोटे आणि ओंकार सावंत यांच्या उपस्थितीत झाली. त्यावेळी ते बोलत होते. नदीच्या पाण्याचा निचरा सुरळीत होईल आणि पूरस्थितीवर नियंत्रण मिळवता येईल. पावसाळ्यातील पाण्याचा प्रवाह, नदीतील गाळाची साठवण, तसेच पाण्याचा जमिनीत मुरण्याचा वेग या सर्व घटकांचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. समितीच्या माध्यमातून आदिला नदी संवर्धनासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनातून उपाययोजना राबवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## शिक्षणाधिकारी २०० शाळांना देणार अचानक भेट

### कमी निकालांच्या शाळांच्या वाढणार अडचणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ नोव्हेंबर-**

माध्यमिक शिक्षण विभागाकडून दहावी, बारावीत कमी निकाल लागलेल्या आणि पालक, विद्यार्थ्यांनी तक्रारी केलेल्या जिल्ह्यातील जवळपास २०० शाळांची तपासणी अचानक करण्यात येणार आहे. त्यामुळे कमी निकाल लागलेल्या आणि तक्रारी असलेल्या शाळांच्या अडचणी वाढणार आहेत.

प्रत्येक तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी यांना तालुक्यातील १० ते १५ शाळांना अचानक भेटी देऊन शाळांची तपासणी करण्याच्या सूचना माध्यमिक शिक्षण विभागाने दिल्या आहेत. त्यानुसार १५ नोव्हेंबर ते जानेवारी २०२६ अखेरपर्यंत धडक मोहीम चालू राहणार असल्याची माहिती माध्यमिक शिक्षण विभागाने दिली आहे.

**सीबीएससी शाळांची तपासणी**

शहर व जिल्ह्यातील सीबीएससी शाळांकडून मोठ्या प्रमाणात प्रवेश शुल्क आकारणे, प्रवेश शुल्क न दिलेल्या विद्यार्थ्यांना शाळेत बसू न देणे, परीक्षा शुल्क न भरल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित ठेवणे, अशा तक्रारी पालकांकडून आल्या आहेत. त्यामुळे या शाळांची तपासणी होणार असून, त्याचा अहवाल सीबीएससीच्या दिल्ली बोर्डाकडे पाठविण्यात येणार आहे.

दहावी, बारावीचा कमी निकाल लागलेल्या आणि पालक, विद्यार्थ्यांच्या तक्रारी असलेल्या शाळांची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम घेण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकाऱ्यांसह इतर अधिकाऱ्यांचे पथक तयार करण्यात येणार आहे. ते पथक तालुक्यातील शाळांना अचानक भेटी देऊन तपासणी करणार आहे. शाळांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

- **सचिन जगताप,** माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर

**शाळांवर होणार कारवाई**

शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश देण्यासाठी किंवा पुढील वर्गात जाण्यासाठी देणगी अथवा पैशाची मागणी संस्थेकडून करण्यात येत असेल तर त्या संस्थेवर कॅपिटेशन फी प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करण्याचा अधिकार शिक्षण विभागाला आहे. त्यामुळे शैक्षणिक संस्थेने प्रवेश अथवा इतर गोष्टीसाठी देणगी देऊ नये, असे आवाहन केले आहे. तरीही शाळांकडून देणगी अथवा पैशाची मागणी केल्यास शाळांवर कारवाई होणार आहे.

## श्रीक्षेत्र अरणच्या मंदिरास पोलीस महानिरीक्षक फुलारींची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.११ नोव्हेंबर-**

माढा तालुक्यातील श्रीक्षेत्र अरण येथील श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिरास कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी भेट देऊन समाधीचे दर्शन घेतले.

या भेटीदरम्यान त्यांनी मंदिर परिसराची पाहणी करून सावता महाराजांची विहीर, मंदिर तसेच शेती याबाबत सविस्तर माहिती घेतली. समाधीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, कांदा मुळा भाजी, अवघी विठाबाई माझी या अभंगातून सावता महाराजांनी कर्मातून ईश्वराची पूजा करण्याचा जो संदेश दिला, त्याची अनुभूती आज समाधीच्या दर्शनाने झाली आहे. याप्रसंगी संत सावता महाराजांचे वंशज सावता महाराज वसेकर, प्रभु महाराज माळी, सोलापूर स्थानिक गुन्हे शाखा वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप, पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. अरण येथील संत शिरोमणी सावता महाराज समाधी स्थळ हे भक्ती आणि श्रध्देचे केंद्र असून, हजारो भक्त येथे दर्शनासाठी येत असतात.



## पिलीव परिसरात गुलाबी थंडीची चाहूल

### रब्बी पिकांसाठी थंडी पोषक

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव,दि. ११ नोव्हेंबर-**

दरवर्षी दिवाळीलाच सुरू होणारी थंडी यंदा महिनाभर लांबली असून दोन दिवसांपासून पिलीव (ता. माळशिरस) परिसरात थंडीची चाहुल सुरू झाली आहे. ही थंडी रब्बी पिकांनी पोषक असल्याचे बोलले जात आहे.

शुक्रवार पासुन हळुहळू थंडी जाणवू लागली. खरेतर अचानकच वातावरणात एवढा बदल झाला की अवघ्या दोनच दिवसांत पारा एकदमच खाली आला. थंडीने चांगलीच हुडहुडी भरल्याने शेतात शेकोटया पेटलेल्या दिसु लागल्या आहेत. पिलीव परीसरात गेल्या दोन दिवसात अचानकच हवेत प्रचंड गारवा वाढला आहे. रात्री सात-आठ वाजल्यापासून थंडीची तीव्रता वाढली आहे. अचानकच पडलेल्या ह्या थंडीमुळे सकाळी शाळा, कॉलेजला जाणारे विद्यार्थी तसेच राञी शेतात पिकांना पाणी देण्यासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांना याचा चांगलाच त्रास होत आहे. रब्बी हंगामातील गहु, ज्वारी, हरभरा या पिकांसाठी खरेतर थंडी आवश्यक असते. या पिकांच्या वाढीसाठी थंडी पोषक असते.पण यंदा थंडी थोडी उशीरा पडल्यामुळे गहु ,हरभरा पिकांची पेरणी थांबली होती. ती आता थंडी पडल्यामुळे वेग घेईल. यामुळे शेतकऱ्यांमध्ये सध्या समाधानाचे वातावरण आहे.

## ८० अंगणवाड्यांसाठी ११ कोटींचा निधी मंजूर

### जागा उपलब्ध झाल्यास नवीन अंगणवाड्यांचे बांधकाम होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. ११ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील ८० नवीन अंगणवाडी बांधकामासाठी ११ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. मात्र, ज्या गावात अंगणवाडी बांधकामासाठी जागा उपलब्ध आहे, अशा गावातच या बांधकामास मंजुरी देण्यात येत आहे. त्यामुळे जागा उपलब्ध असलेल्या गावात नवीन अंगणवाड्यांचे बांधकाम होणार आहे.

१२५ जुन्या अंगवाड्यांची दुरुस्तीच्या कामाचे नियोजन सन २०२५-२६मध्ये होणार आहे. जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागाला ११ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. या ११ कोटींच्या खर्चासाठी महिला बालकल्याण विभागाकडून नियोजन देखील केले आहे. त्यासाठी नवीन अंगणवाडी बांधकामासाठी ११ लाख २५ हजार मंजूर होणार आहेत. तर जुन्या अंगणवाडी दुरुस्तीसाठी एक लाख रूपये दिले जाणार आहेत, अशी माहिती महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी दिली.

गाव पातळीवरून जेवढे प्रस्ताव आले होते. त्यातील जागा उपलब्ध असलेल्या गावातील प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे त्या गावात नवीन अंगणवाडीचे बांधकाम होणार आहे. दरम्यान महिला बालकल्याण विभागाकडून नवीन अंगणवाडीचे इमारत बांधकामाचे नियोजन केले आहे.

मात्र, जिल्ह्यातील अनेक गावात अंगणवाडी बांधकामासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने तसेच तेथे अंगणवाडीची स्वतंत्र इमारत नसल्याने अंगणवाड्या शाळा, समाज मंदिर, खासगी इमारती आदी ठिकाणी भरवावी लागणार असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसत आहे. त्यामुळे मंजूर निधीतून नवीन अंगणवाडी बांधकाम होणार आहे.

**मंद्रुपच्या अंगणवाडयांचे बांधकाम होणार ?**

दहा ते पंधरा वर्षापासून ग्रामपंचायतीच्या स्थानिक राजकारणामुळे मंद्रुपमधील अंगणवाड्यांना जागा न मिळाल्याने नवीन अंगणवाडी बांधकाम रखडले आहे. त्यामुळे मुलांना सभागृहात शिक्षण घ्यावे लागत आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनाही त्रास होत आहे. यावेळी तरी अंगणवाड्यांसाठी जागा मिळणार का ? हे पाहावे लागेल.

**मुलांना मिळणार हक्काचा निवारा**

अनेक अंगणवाड्यांना स्वताची इमारत नसल्याने ऊन व पावसातलहान मुले उघड्यावरच शिक्षणाचे धडे घेत आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही मुलांना हक्काची इमारत मिळत नाही. मात्र आता जिल्हा नियोजन समितीकडून जिल्ह्यातील ८० अंगणवाड्यांना बांधकामासाठी निधी मिळणार असल्याने मुलांना हक्काचा निवारा मिळणार आहे.

- **श्रीकांत भरले,**
सामाजिक कार्यकर्ते, हत्तूर, तालुका दक्षिण सोलापूर